सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | शनिवार, २५ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ४८ । पाने १२ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | ■ dainiktarunbharat.com ■ epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निर्गुण प्रकट करणाऱ्या घटना मोजक्या शब्दांत सांगितल्या पाहिजेत. शब्दाची निवड अशी असावी की वाचताना प्रत्यक्ष घटनेचे चित्र डोळ्यासमोर चलचित्राच्या रूपात उभे राहिले पाहिजे.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# आपचे सात खासदार फुटले

## ● दोन तृतीयांश सदस्यांचा गट भाजपात सामील ● केजरीवाल यांना मोठा धक्का

◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

शुक्रवारी आम आदमी पार्टीत मोठा राजकीय भूकंप आला असून राज्यसभेतील दहापैकी सात खासदारांनी 'आप'चा राजीनामा देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. दोन तृतीयांश खासदारांचा गट फुटल्याने आम आदमी पार्टीला धक्का बसला आहे. राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल, हरभजन सिंग, विक्रजीत सिंग साहनी, राजिंदर गुप्ता, विक्रम साहनी आणि आपच्या दिल्लीतील राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला.

शुक्रवारी चार वाजता झालेल्या पत्रकार परिषदेत खासदार राघव चड्ढा यांनी आप सोडल्याची आणि भाजपात प्रवेश करीत असल्याची घोषणा केली. ''आम्ही, राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे दोन-तृतीयांश सदस्य, भारताच्या संविधानाच्या तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यसभेत आपचे १० खासदार आहेत. त्यापैकी दोन-तृतीयांशपेक्षा जास्त सदस्य या निर्णयात आमच्यासोबत आहेत. त्यांनी स्वाक्षरी केली असून शुक्रवारी सकाळी आम्ही स्वाक्षरी केलेले पत्र आणि कागदपत्रे राज्यसभा अध्यक्षांकडे सादर केली आहेत,'' असे चड्ढा यांनी सांगितले. तसेच आपचे आणखी नेते भाजपात सामील होऊ शकतात, असे संकेतही त्यांनी दिले.

पत्रपरिषदेत राघव चड्ढा पुढे म्हणाले, ज्या 'आप'ला मी माझ्या रक्ताने आणि घामाने वाढवले आणि माझ्या तारुण्याची १५ वर्षे समर्पित केली, तो पक्ष आता आपली तत्त्वे, मूल्ये आणि नीतिमत्तेपासून भरकटला आहे. हा पक्ष आता राष्ट्रीय हितासाठी नव्हे, तर वैयक्तिक फायद्यासाठी काम करत आहे. चुकीच्या पक्षात योग्य व्यक्ती असल्याची भावना मनात निर्माण झाली होती. (वृत्तसंस्था)



राघव चड्ढा यांना पेठा भरविताना भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन. यावेळी उपस्थित खासदार संदीप पाठक, अशोक मित्तल आणि मान्यवर

### राज्यसभा सदस्यत्व रद्द करा : आप

**भाजपात सामील झाल्यामुळे राघव चड्ढा, अशोक मित्तल आणि संदीप पाठक यांना त्यांच्या राज्यसभा सदस्यत्वातून अपात्र ठरवण्यात यावे. कारण संविधानाच्या दहाव्या अनुसूचीनुसार हे त्यांच्या पक्ष सदस्यत्वाचा स्वेच्छेने राजीनामा देण्यासारखे आहे. यासंदर्भात आम आदमी पक्ष (आप) राज्यसभा सभापतींना पत्र सादर करणार आहे. या पत्रात भाजपात सामील झालेल्या आप खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी करण्यात येणार आहे, अशी माहिती आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी दिली.**

### भाजपा मुख्यालयात स्वागत


**भाजपामध्ये सामील झाल्यानंतर राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल भाजपा मुख्यालयात पोहोचले. तिथे या तिघांनी भाजपा अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.**

### पंजाबी जनतेचा विश्वासघात



**भाजपाने पुन्हा एकदा पंजाबी जनतेचा विश्वासघात केला आहे. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांनी पंजाबचा विश्वासघात केला आहे, अशी टीका आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी केली आहे.**

### पाठीत खंजीर खुपसला



**भाजपा, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी उत्कृष्ट काम करणाऱ्या आपला तोडण्याचा प्रयत्न केला आहे. या सात खासदारांनी पंजाबच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, अशा जळजळीत शब्दात आपचे खासदार संजय सिंह यांनी टीका केली.**

# यंदा देशात मान्सून लवकरच

## भारतीय हवामान विभागाची भविष्यवाणी



◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

यावर्षी एप्रिल महिन्यापासून देशाच्या बहुतांश भागांमध्ये तीव्र उष्णता जाणवत आहे. उत्तर, मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांमध्ये तापमान ४३ ते ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) येत्या काही दिवसांत आणखी उष्णतेच्या लाटांचा इशाराही दिला आहे. मात्र, तीव्र उष्णतेच्या वातावरणात दिलासादायक बातमी समोर आली आहे. नवीन अंदाजानुसार, या वर्षीचा नैर्ऋत्य मान्सून नेहमीपेक्षा लवकर दाखल होऊ शकतो. मे महिन्याच्या अखेरपर्यंत दक्षिण भारतातील अनेक भागांमध्ये चांगला पाऊस पडू शकतो.

युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्टिंगनुसार, मान्सून लवकर दाखल होण्याचे संकेत मिळत आहेत. गतवर्षी, २०२५ मध्ये केरळमध्ये २७ ते २९ मे दरम्यान मान्सून दाखल होण्याचा अंदाज होता, परंतु विलंब झाला होता. त्याचप्रमाणे, या वेळीही मान्सून नियोजित वेळेपेक्षा लवकर येण्याची चिन्हे आहेत. अंदमान आणि निकोबार बेटांवर सर्वात आधी मान्सून येतो. यावेळी येथे मान्सून १८ ते २५ मे दरम्यान सुरू होण्याची शक्यता आहे. हवामान मॉडेलनुसार, सध्या हिंद महासागरातून येणारे बाष्पयुक्त वारे बंगालच्या उपसागरावर आणि अंदमान समुद्रावर तयार होत असून त्यांची तीव्रता वाढत आहे. (वृत्तसंस्था)

### हिंद महासागर द्विध्रुव मान्सूनच्या बाजूने

**हवामानावर परिणाम करणारे काही प्रमुख घटकही यावर्षी मान्सूनच्या बाजूने असल्याचे दिसत आहे. यापैकी एक म्हणजे हिंद महासागर द्विध्रुव (आयओडी). जेव्हा हिंद महासागराच्या पश्चिम भागातील पाणी पूर्व भागापेक्षा जास्त उष्ण असते, तेव्हा त्याला सकारात्मक आयओडी म्हटले जाते. अशा परिस्थितीत, अधिक आर्द्रता भारताकडे वाहते आणि मान्सून सामान्यतः अधिक जोरदार असतो. यावेळी आयओडी मान्सूनच्या बाजूने असू शकतो, असा अंदाज आहे.**

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरणीचे सत्र सुरूच

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशी मोठी विक्री दिसून आली. आयटी क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या जोरदार घसरणीमुळे निफ्टी २३,९०० च्या खाली आला. जागतिक स्तरावर पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि त्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम म्हणून शुक्रवारी दिवसभर बाजारात मंदीचे सावट राहिले. शुक्रवारी व्यवहाराअंती सेन्सेक्स ९८२.७१ अंकांनी, म्हणजेच १.२७ टक्क्यांनी घसरून ७६,६८१.२९ वर बंद झाला. तसेच निफ्टी २७५.१० अंकांनी, म्हणजेच १.१४ टक्क्यांनी घसरून २३,८९७.९५ वर स्थिरावला. या संपूर्ण आठवड्यात सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये प्रत्येकी २ टक्क्यांची घट नोंदवली गेली. यामुळे गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या वाढीला ब्रेक लागला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकातही प्रत्येकी १ टक्क्यांची घसरण झाली. क्षेत्रनिहाय कामगिरीचा विचार करता, आयटी निर्देशांक ५ टक्क्यांनी कोसळला. इन्फोसिसने जाहीर केलेले कमकुवत मार्गदर्शन या घसरणीस कारणीभूत ठरले. यामुळे आयटी निर्देशांक जून २०२३ नंतरच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. याशिवाय आरोग्य सेवा, कन्झ्युमर ड्युरेबल, रिअल्टी, टेलिकॉम आणि फार्मा क्षेत्रातील निर्देशांकातही १ टक्क्यांहून अधिक घसरण झाली.



### मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवा

**नवी दिल्ली :** काँग्रेससह ७३ विरोधी खासदारांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात राज्यसभेत महाभियोग प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रपतींना सादर केले आहे. याबाबत माहिती देताना, काँग्रेसचे संपर्क प्रभारी जयराम रमेश म्हणाल, राष्ट्रपतींना उद्देशून लिहिलेल्या पत्रात खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरून हटवण्याची मागणी केली आहे. महाभियोगाच्या मागणीतील प्रमुख मुद्दे खासदारांनी सादर केलेल्या पत्रात मुख्य निवडणूक आयुक्तांवर सिद्ध झालेल्या गैरवर्तनाचा आरोप करण्यात आला आहे. हे गैरवर्तन १५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यानंतर केलेल्या कृती आणि अकृतींशी संबंधित आहे.

### आणखी एका भोंदूविरुद्ध गुन्हा

**नाशिक :** अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीदरम्यानच, महाराष्ट्रातील नाशिक पोलिसांनी एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली तसेच स्वतः ला 'देवपुरुष' म्हणवून घेणाऱ्या आणखी एका व्यक्तीविरुद्ध एफआयआर दाखल केला. हे कथित गुन्हे २०२४ मध्ये घडले असले, तरी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी समुपदेशन केल्यानंतर त्या महिलेने तक्रार दाखल केली. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, त्या महिलेने बुधवारी महेशगिरी उर्फ महेश दिलीप काकडे याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली.

# गेमिंग क्षेत्राचा महाराष्ट्र पॅटर्न!

### युवकांसाठी रोजगाराची नवी दालने

**मुंबई, २४ एप्रिल**

आजच्या डिजिटल युगात गेमिंग क्षेत्र हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे एक प्रभावी माध्यम ठरत आहे. याच संधीचे सोने करत, महाराष्ट्राने पुन्हा एकदा आघाडी घेतली आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने भारतात प्रथमच आयोजित करण्यात आलेली 'डिजिटल गेम डेव्हलपर स्पर्धा' युवकांसाठी गेम-चेंजर ठरणार असून, या उपक्रमामुळे महाराष्ट्र जागतिक गेमिंग क्षेत्रात मोठी भरारी घेणार आहे, असा ठाम विश्वास कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ या संकल्पनेला बळ देण्यासाठी सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आता गेमिंग आणि डिजिटल क्षेत्रातील जागतिक केंद्र बनण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. केवळ नोकरी शोधणारे नाही, तर रोजगाराच्या संधी निर्माण करणारे गेम डेव्हलपर्स घडवणे हे आमचे ध्येय आहे, असे लोढा म्हणाले. महाराष्ट्र आणि तमिळनाडू या दोन्ही राज्यांतील विद्यार्थ्यांच्या या सहभागामुळे भविष्यात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती घडण्याचे संकेत मिळत आहेत. या उपक्रमामुळे राज्यातील हजारो युवकांना आता जागतिक स्तरावर आपली चमक दाखवण्याची संधी मिळणार आहे. (वृत्तसंस्था)



### पाच हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रशिक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, या उपक्रमात सुमारे ५,००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, ज्यापैकी ५०० विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पक गेम प्रोजेक्ट्स सादर केले आहेत. त्यांना जागतिक दर्जाचे युनिटी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# हिंदूंनी कधीही आक्रमण केले नसल्याने माफी मागण्याची गरज नाही : होसबळे

◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही वर्चस्ववादी संघटना नसून, ती हिंदू संस्कृतीवर आधारित राष्ट्रभक्त संघटना आहे. हिंदूंनी आपल्या प्रदीर्घ इतिहासात कधीही कोणत्या देशावर आक्रमण केले नाही किंवा कुणाला गुलाम बनवले नाही, त्यामुळे हिंदूंना कोणाचीही माफी मागण्याची गरज नाही, असे ठाम प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी येथील हडसन युनिव्हर्सिटीत आयोजित एका विशेष कार्यक्रमात होसबळे यांनी जागतिक राजकारण, हिंदू धर्म आणि संघ विचारांवर सविस्तर भाष्य केले. ते म्हणाले, हिंदू संस्कृती ही सर्वांना सामावून घेणारी आहे. हिंदूंनी कोणावरही आमची विचारधारा लादली नाही. हिंदू धर्माने जगाला 'वसुधैव कुटुंबकम्' हा विचार दिला. हिंदूंच्या गौरवशाली इतिहासाबद्दल आम्हाला अभिमान असून, माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. संस्कृतीवर बोलताना सरकार्यवाह म्हणाले की, संस्कृती आणि आधुनिकता हे एकमेकांचे शत्रू नसून, ते हातात हात घालून चालू शकतात. सनातन परंपरा या शाश्वत आहेत आणि त्या काळानुसार अधिक समृद्ध होत जातात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संघर्ष आणि कार्याबद्दल होसबळे म्हणाले की, मोदींचा प्रदीर्घ काळ संघाशी संबंध राहिला असून, संघाने दिलेल्या संस्कारांमधूनच मोदींचे नेतृत्व घडले आहे. नरेंद्र मोदी संघातच वाढले असून, त्यांनी संघाचे विचार सरकारद्वारे प्रत्यक्षात आणले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाबद्दल होसबोले म्हणाले, हे वर्ष आमच्यासाठी केवळ उत्सवाचे नाही आत्मचिंतनाचे आहे. आम्ही अजूनही आमचे ध्येय पूर्ण केलेले नाही; अजून खूप मोठे कार्य बाकी आहे. (वृत्तसंस्था)




अमेरिकेतील हडसन युनिव्हर्सिटीत आयोजित कार्यक्रमात बोलताना होसबळे

### आपण भारत म्हणूनच संबोधले पाहिजे

**देशाच्या नावाबाबत बोलताना त्यांनी भारत या शब्दाचा आग्रह धरला. जगात अशा कोणत्या देशाची दोन नावे आहेत का? आपण आपल्या देशाला भारत म्हणूनच संबोधले पाहिजे, असे होसबळे म्हणाले. सामाजिक सलोख्यावर भाष्य करताना त्यांनी मुस्लिमांना आवाहन केले की, त्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नद्यांची पूजा करावी तसेच शरीर आणि मनाच्या स्वास्थ्यासाठी प्राणायाम् आणि सूर्यनमस्काराचा अंगीकार करावा.**

# पेटीएमचा बँकिंग परवाना रद्द

### रिझर्व्ह बँकेची कारवाई




◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शुक्रवारी पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेड (पीपीबीएल) विरुद्ध एक मोठे पाऊल उचलले आहे. बँकेचा बँकिंग परवाना तात्काळ प्रभावाने रद्द करण्याचा आदेश जारी केला आहे. या निर्णयामुळे, बँक कोणत्याही ग्राहकाच्या खात्यात नवीन ठेवी स्वीकारू शकणार नाही किंवा क्रेडिट व्यवहार करू शकणार नाही. या निर्णयाचा थेट परिणाम बँकेच्या लाखो ग्राहकांवर होणार आहे.

रिझर्व्ह बँकेने बँकेच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आरबीआयने म्हटले आहे की, बँकेच्या व्यवस्थापनाची सर्वसाधारण पद्धत ठेवीदारांच्या तसेच सार्वजनिक हिताच्या विरोधात आहे. परिणामी, पेटीएम पेमेंट्स बँकेला कोणताही बँकिंग व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे. आरबीआयने असेही म्हटले की, बँक बंद करण्यासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला जाईल. आरबीआयने आदेशात म्हटले की, बँक बंद झाल्यावर पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेडकडे तिची संपूर्ण ठेव देयता परतफेड करण्यासाठी पुरेशी तरलता आहे. पेटीएम पेमेंट्स बँकेला ११ मार्च २०२२ पासून नवीन ग्राहक जोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# परवाना हवा तर मराठीतच बोला

## राज्य सरकारकडून कायदा करण्याचा प्रस्ताव !



◆ **मुंबई, २४ एप्रिल**

महाराष्ट्राची राजधानी मुंबईसह संपूर्ण राज्यात सार्वजनिक वाहतुकीचे साधन असलेल्या रिक्षा आणि टॅक्सी चालवण्यासाठी आता परप्रांतीय दादागिरीला लगाम बसणार आहे. प्रवाशांशी होणारा भाषिक संघर्ष टाळण्यासाठी आणि मराठी भाषेच्या अस्मितेसाठी राज्य सरकारने एक अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे रिक्षा-टॅक्सीचा परवाना हवा असेल, तर चालकाला मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असणे कायद्याने अनिवार्य करण्यात आले आहे. परिवहन विभागाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मध्ये ऐतिहासिक बदल प्रस्तावित करून परप्रांतीय चालकांसाठी मराठी भाषेचा स्पीड ब्रेकर लावला आहे.

आता परिवहन विभागाने नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठवला आहे. यानुसार, परवाना देणाऱ्या प्राधिकरणाला चालकाचे चारित्र्य पडताळणी करण्यासोबतच, त्याला मराठी भाषेचे ज्ञान आहे का, हे तपासण्याचे अधिकार मिळणार आहेत. केवळ कामचलाऊ मराठी चालणार नाही, तर प्रवाशांच्या सूचना समजून घेण्याइतपत मराठीचे ज्ञान असणे आता अनिवार्य असेल. केवळ नवीन परवानाच नव्हे, तर मीटर असलेल्या ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या परवाना नूतनीकरणाच्या वेळीही ही भाषिक चाचणी घेतली जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### ...हा तर प्रवाशांचा मूलभूत अधिकार

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या निर्णयाचे समर्थन करताना स्पष्ट केले की, सार्वजनिक वाहतुकीत स्थानिक भाषेला प्राधान्य मिळणे हा प्रवाशांचा मूलभूत अधिकार आहे. सरकारची ही भूमिका म्हणजे भाषिक दरी मिटवण्यासाठी उचललेले एक निर्णायक पाऊल आहे. शासनाने या मसुद्यावर ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवल्या असून, अधिसूचना अंतिम झाल्यानंतर मराठी न येणाऱ्या चालकांचे परवाने थेट धोक्यात येणार आहेत.**

### व्यावसायिक एलपीजी पुरवठा ७० टक्के पूर्ववत

◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले, व्यावसायिक एलपीजी पुरवठा जवळपास ७० टक्के पूर्ववत झाला आहे. एप्रिल महिन्यात आतापर्यंत १,४७,००० टनांहून अधिक व्यावसायिक एलपीजी विकला गेला आहे. पाच-किलोच्या सिलेंडरची विक्रीही सुरळीतपणे सुरू आहे. केवळ एका दिवसात गुरुवारी ८१,००० हून अधिक पाच किलोचे सिलेंडर विकले गेले आहे, असा दावाही त्यांनी केला.



युरिया पुरवठा पूर्ववत होण्याबाबत आणि संकट निवारण योजनेबाबत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा म्हणाल्या, युरिया खत कारखान्यांना पुरवठा ९५ टक्क्यांपर्यंत पूर्ववत झाला आहे. संकट निवारण योजनेंतर्गत मंत्रालय आणि सरकारने संकट सुरू झाल्यापासून मागणी आणि पुरवठ्याचे सक्रियपणे व्यवस्थापन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### 'बाळुमामाचा अवतार' म्हणवणाऱ्या भोसलेला अटक; फसवणूक, अपहार, लैंगिक शोषणाचे आरोप

**करमाळा, दि. २४ एप्रिल -**

स्वतःला बाळूमामाचा अवतार असल्याचा दावा करणारा स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु मनोहर भोसले उर्फ मनोहर मामाला सोलापूर ग्रामीण पोलिसांनी पुण्यातील मांजरी परिसरातून ताब्यात घेतले आहे. फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार तसेच महिलांच्या लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपांमुळे ही कारवाई करण्यात आली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर ग्रामीण पोलिसांनी छापेमारी करत मनोहर मामाला अटक केली. सध्या पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. मनोहर मामावर भक्तांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळणे, चमत्कारांच्या नावाखाली फसवणूक आणि महिलांचे शोषण केल्याचे आरोप आहेत. त्याच्या चमत्कारांमुळे त्याची ओळख तयार झाली होती. धक्कादायक बाब म्हणजे विविध राजकीय पक्षांतील काही नेते आणि सनदी अधिकारीही दरबारात हजेरी लावत असत. मोठे पद किंवा राजकीय फायद्यासाठी त्याचा सल्ला घेतला जात असल्याचेही सांगितले जात आहे. समृद्धी महामार्गाच्या बांधकामातून कोट्यवधींची कमाई केलेल्या एका निवृत्त सनदी अधिकाऱ्याने नांदेड लोकसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी हेलिकॉप्टरने या बाबाच्या दरबारात हजेरी लावल्याचीही माहिती समोर आली आहे. मामाच्या अटकेनंतर आता या प्रकरणात आणखी कोणते धागेदोरे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त तीन हजार पाण्याच्या बाटल्या वाटप

**श्रीपूर, दि . २४ एप्रिल**

श्रीपूर येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ज्ञानेश्वर सुरवसे, शैलेश साबळे व दादासाहेब सावंत यांच्या संकल्पनेतून भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर जयंती निमित्त सामाजिक उपक्रम राबवत तीन हजार शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. श्रीपूर येथील पत्रकार बी. टी. शिवशरण, आटपाडी कॉलेजचे प्राचार्य तसेच श्रीपूर भिमरत्न तालीम संघाचे संस्थापक उत्तम मोटे, प्रवीण गाडे, संजय खरे, ब्रिमा सागरचे कामगार प्रतिनिधी दावल शिवशरण, संजय भोसले यांच्या हस्ते वाटप केले. श्रीपुरमध्ये २३ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध संघटनांच्या वतीने शहरातील मुख्य रस्त्यावरून आकर्षक देखावे, नयनमनोहर विद्युत रोषणाई, लेझर शोच्या माध्यमातून अभूतपूर्व मिरवणूक काढण्यात आली होती. जयंती निमित्त परिसरातून हजारो अनुयायी या मिरवणूकीत सामील होत असतात. चार तास चालणाऱ्या या मिरवणुकीत सामील झालेल्यांना या माध्यमातून पिण्यासाठी पाणी मिळल्याने चांगली सोय झाली.

### इनामदार गुरुजी पुण्यतिथीनिमित्त रविवारी गुलाल कार्यक्रमाचे आयोजन

**सोलापूर, दि. २६ (प्रतिनिधी) :**

सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज यांचे पट्टशिष्य इनामदार गुरुजी यांच्या ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त सम्राट चौक येथील श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यानिमित्त मंदिरामध्ये फुलांच्या माळांनी सजावट केली आहे. वैशाख शुद्ध दशमी, रविवार दि. २६ एप्रिल रोजी दुपारी १२.०० वाजता मंदिरात गुलालाचा विशेष कार्यक्रम आहे. सकाळी धार्मिक विधी, गुरुगीता पारायण तसेच सकाळी ११ ते १२ या वेळेत भजनाचा कार्यक्रम आहे. दुपारी १२ वाजता गुलाल कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप आहे. कार्यक्रमाचे आयोजन मंदिर ट्रस्टतर्फे केले असल्याचे मंदिर ट्रस्टचे मुख्य ट्रस्टी मोहन बोड्डू यांनी सांगितले.



### डॉ. सतीश कोपूरवाड यांनी स्वीकारला जिल्हा आरोग्य अधिकारी पदाचा पदभार

**सोलापूर, दि. २४ एप्रिल**

सोलापूर जिल्ह्याचे नूतन जिल्हा आरोग्य अधिकारीपदी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी शुक्रवारी दि. २४ एप्रिल रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी या पदाचा पदभार स्वीकारला. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मावळते जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. पदाची सूत्रे त्यांच्याकडे सुपूर्द केली. पदभार स्वीकारण्यापूर्वी डॉ. कोपूरवाड यांनी पंढरपूर येथे कुटुंबासमवेत जाऊन श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले. जनसेवेच्या कार्यासाठी आशीर्वाद घेऊन ते सोलापूर येथील कार्यालयात दाखल झाले. याप्रसंगी मावळते जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभ ठेवला होता. डॉ संतोष नवले यांच्या कार्यकाळात आरोग्य विभागात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचारीवृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य विस्तार अधिकारी आणि जिल्हा आरोग्य कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिका सेवक पदभरतीचा प्रस्ताव फेरसादर करण्याचा निर्णय

### स्थायी समितीच्या सभेत विविध चार विषयांना मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

महापालिकेत पद भरतीसंदर्भातील प्रस्ताव फेरसादर करण्याचा निर्णय शुक्रवारी झालेल्या महापालिका स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आला.

समितीच्या सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली समितीची सभा झाली. सभापटलावर एकूण पाच विषय होते. यामध्ये महापालिकेच्या विविध प्रकारच्या निधी मुदत ठेवीमध्ये गुंतवण्याचा तातडीचा प्रस्तावदेखील होता.महापालिकेचा आकृतीबंध २८ डिसेंबर २०२१ रोजी व सेवा प्रवेश नियम दिनांक १५ डिसेंबर २०२२ रोजी मंजूर झालेला आहे. त्यानुसार अ, ब, क, ड अशा चार वर्गनिहाय एकूण मंजूर पदांची संख्या ४६१२, एकूण भरलेली पदे ३३२० तर एकूण रिक्त पदे १२९६ इतकी आहेत. महानगरपालिकेने सरळ सेवा पदभरती २०२३ नुसार ३१ संवर्गातून ३०२ पदाकरीता पदभरती प्रक्रिया राबविलेली असून ३०२ पैकी केवळ १३७ उमेदवार कार्यरत आहेत. दरम्यान, हा विषय फेरसादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.



महानगरपालिकेकडील विविध संवर्गातील तांत्रिक पदाची आवश्यकता असून ती पदे रिक्त राहिल्यामुळे शहरातील विकास कामे, नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवेमध्ये व्यत्यय निर्माण होत आहे. आय.बी.पी.एस. (इन्स्टीटयुट ऑफ बैंकिंग पर्सोनल सिलेक्शन) या यंत्रणेला रिक्त पदे भरण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यासंदर्भातील प्रस्ताव महापालिका आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर केला होता. या विषयावर समितीमध्ये चर्चा होवून तो फेरसादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरी घनकचरा व तत्सम उपाय योजनेंतर्गत, शहरातील सार्वजनिक शौचालयातील एकूण ४५ ठिकाणी एमएसईबी कनेक्शन घेणे, मीटर बसविणे, सर्विस केबल पुरवठा करणे या संदर्भातील मक्तेदाराला दिलेली वर्कऑर्डर संदर्भातील विषय आयुक्तांनी पाठविला होता, त्यास सभेने मंजुरी दिली.

केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय स्वच्छ वायु योजना फेज-२ अंतर्गत मनमीत ब्लॉसम ते सैफुल क्रॉस रोड रस्ता करण्याकामी मक्तेदार अजयकुमार घोडके यांना दि. २०-१२-२०२३ ने कार्यारंभ आदेश दिले होते. काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर खड्डे पडले असल्याने व रस्ता नादुरुस्त झालेला असल्याने या मक्तेदाराची महानगरपालिकेकडील नोंदणी रद्द करून त्यांचे नाव मक्तेदारांच्या काळ्या यादीत समाविष्ट केले होते. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने दि.६/११/२०२५ रोजी निकाल दिला आहे. न्यायालयाचे आदेश व विधान सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार या मक्तेदाराचे नाव काळ्या यादीतून वगळण्यासाठी आयुक्तांनी स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवला होता. त्यास सभेने मंजुरी दिली.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्र.क्र. २१ अंत्रोळीकर नगर भाग १ व २ मधील व परिसरात अंतर्गत ड्रेनेजचे चेंबर बदलणे व नवीन ड्रेनेज लाईन घालणे याबाबत मक्तेदार श्री. स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शनला दिलेली वर्कऑर्डर महापालिका आयुक्तांनी स्थायी समितीकडे माहितीस्तव पाठविली होती. या विषयालाही मंजूर देण्यात आली.

# दोघा एमडी ड्रग्ज तस्करांना चार दिवसाची पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

मेफेड्रोन (एमडी ड्रग्ज) विकण्यासाठी सोलापुरात आलेल्या सुफियान शब्बीर फुलारी (वय २१ रा. सय्यद नगर, हडपसर पुणे), तौसिफ फरीद सय्यद (वय २७ रा. कसबा पेठ, पुणे) या दोघांना जेल रोड पोलिसांनी बुधवार रोजी पाठलाग करून अटक केली होती. अटक केलेल्या या दोघा आरोपींना शुक्रवारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता दोघाना चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडे केलेल्या तपासात सोलापुरात ड्रग्जचे रिटेलर विक्रेते असल्याची माहिती पुढे येत आहे.




दरम्यान जेलरोड पोलीस ठाण्याचे पथक एका आरोपीला सोबत घेऊन पुढील तपास करण्यासाठी मुंबई येथे रवाना झाले आहे. जेलरोड पोलिसांनी पाठलाग करून बुधवार रोजी सुफियान फुलारी, तौसिफ सय्यद या दोघांना अटक केली होती. या दोघांजवळ १ लाख ५० हजार रूपये किंमतीचा ४६.९३ ग्रॅम एमडी ड्रग्ज मिळाले होते. दोघांनी हे ड्रग्ज मुंबई येथून आणल्याचे सांगितले. हे ड्रग्ज नेमके कोणाकडून आणले होते. याचा तपास करण्याकरीता तौसिफ सय्यद याला घेऊन पोलिसांचे पथक आज शुक्रवारी मुंबईला रवाना झाले आहे. दोघांनी या पूर्वी सोलापुरात ड्रग्ज किती वेळा आणले आहे. हे ड्रग्ज कोणा कोणाला विक्री करण्यात आली आहे. ड्रग्ज कसा मागवला जातो, तो कोणाकडे येतो? तेथून तो कोणाला विकला जातो याची सखोल माहिती घेतली जात आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे करीत आहेत



# ९५ टक्के अतिक्रमण काढले

### मुख्याधिकारी डाके; नागरीकांनी स्वतः हुन अतिक्रमण काढण्याचे आवाहन

### तीर्थक्षेत्र अक्कलकोट अतिक्रमणमुक्त झाल्यास शहराच्या सौंदर्यात भर पडेल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ एप्रिल .**

गेल्या दोन दिवसात अक्कलकोट शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांवरील ९५ टक्के अतिक्रमणे काढली आहेत, अशी माहिती अक्कलकोट नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली. तसेच नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढण्याचे आवाहनही केले.

अक्कलकोट नगरपालिकेने बुधवार, गुरुवार सलग दोन दिवस सर्वात मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबविली. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर परिसरातील अन्नछत्र मंडळासमोर, ३ मीटर प्रस्तावित मंगरुळे चौकापासून अन्नछत्र मंडळापर्यत रस्त्यावर अडथळा असलेली सर्व निवासी विनापरवाना घरे दुकाने जनाजा मज्जीद, माणिक पेठ परिसरातील आदी ९५ ट्क्के अतिक्रमण अनधिकृत बांधकाम दुकाने काढली आहेत. पाच टक्के न्याय प्रविष्ठ निवासी घरे लॉज बांधकाम बाकी आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोटची भुमी अधिक सुंदर अतिक्रमणमुक्त असावी. भाविकांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये. पर्यटक, स्वामी भक्त अधिक काळ राहिल्यास येथील व्यवसाय, रोजगार वाढेल, पर्यटक वाढतील. यासाठी शहर सुंदर ठेवण्याची प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. नागरिकांनी स्वतःहुन अतिक्रमण काढावे, असे आवाहनही डाके यांनी केले आहे.

भाविकांच्या वाढत्या संख्येमुळे नव्याने नागरी सुविधा, रस्ते विकासाची निकड निर्माण झाली आहे. अक्कलकोट विकासासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मोठा विकास निधी मंजुर करुन घेतला. हत्ती तलाव सुशोभीकरण चालु आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोट झपाट्याने बदलत आहे. महाराष्ट्रात एक मॉडेल बसस्थानक बनेल असे अक्कलकोट बसस्थानकाचे काम प्रगतीपथावर मल्लीकार्जुन मंदिराचे जीर्णोध्दार काम प्रगतीपथावर आहे . तीर्थक्षेत्र अक्कलकोट सुंदर अतिक्रमण मुक्त भाविकाना त्रास होणार नाही असे स्वच्छ सुंदर ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे . नागरिकांनी अतिक्रमण स्वतःकाढुन नुकसान टाळावे नगर पालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी केले आहे .

# माझ्या काळातील कामांवर बोलण्याचा नगराध्यक्षांना अधिकार नाही : मुलाणी

### भिसे-मुलाणींमध्ये वार -पलटवाराचे सत्र सुरूच

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २४ एप्रिल-**

**मुलाणीचे भिसेंवर पलटवार**

- * माझ्या काळातील दोनशे पंच्च्याहत्तर कोटींच्या कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट पुर्ण
- * भिसेंकडून मुलाच्या माध्यमातुन मलिदा खाण्याचा प्रकार
- * मुलाने लोकवस्ती नसलेल्या ठिकाणच्या कामांसाठी निधी का आणला

माझ्या कार्यकाळात कुर्डूवाडी शहरात तीनशे नव्हे दोनशे पंच्च्याहत्तर कोटींची विकासकामे झाली. सर्व कामांची स्ट्रक्चरल ऑडीटही पुर्ण झाल्याने त्यांच्यावर शंका घेण्याचे कारण नाही. नगराध्यक्षा जयश्री भिसे यांना यावर बोलण्याचा अधिकारच नाही. उलट त्यांच्याकडून मुलाच्या माध्यमातून मलिदा खाण्याचा प्रकार सुरु असल्याचा प्रतिवार कुर्डूवाडीचे पुर्व नगराध्यक्ष समीर मुलानी यांनी दै.तरूण भारतशी बोलताना केला.

कुर्डूवाडी नगरपालिकेत सध्या शिवसेनेच्या नगराध्यक्षा जयश्री भिसे व राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते पुर्व नगराध्यक्ष समिर मुलाणी यांच्यामध्ये शहराच्या विकास कामावरून शाब्दीक वार पलटवार सुरू आहेत. समिर मुलाणी यांनी पत्रकार परिषद घेवून कर्तुत्वशुन्य नगराध्यक्ष असा उल्लेख करून वादाला सुरवात केली. या पत्रकार परिषदेचे सविस्तर वृत्त दै.तरूण भारतने प्रकाशित केले आहे. याला प्रत्युत्तर म्हणून नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी गुरवारी पत्रकार परिषद घेवून मुलानींच्या काळातील तीनशे कोटीची विकासकामे कशी निकृष्ठ दर्जाची झाली याचा लेखाझोकाच सादर केला. त्यावर शुक्रवार पुन्हा पत्रकार परिषद घेत मुलानी यांनी भिसे यांच्यावर घणाघाती टीका केली.

नगराध्यक्षांच्या चिरंजीवाने शहराबाहेर जिथे एकही लोकवस्ती नाही अशा ठिकाणी रस्ते व गटारीसाठी दोन ते सहा कोटीपर्यंत निधी शासनाकडून कशासाठी आणला? नगराध्यक्षा जनतेची दीशाभूल करत असून चिरंजीवाच्या माध्यमातून मलीदा खाण्याचा प्रयत्न करू नये असा सनसनाटी आरोप केला. नगराध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळातील शंभर दिवसात वीसपैकी एकाही नगरसेवकांच्या वार्डातील विकासासंबंधीच्या बासष्ठ विषयांपैकी एकही विषय सभेमध्ये घेतला नाही. कुर्डू बेंद ओढ्यापुढील रस्ता हा माझ्या शेतात जाण्यासाठी बनवला नसून डी.पी.आर.मध्ये मंजूर असल्याने बनवला असल्याचे स्पष्ट केले.

नगराध्यक्ष आपल्या मुलाच्या माध्यमातून मलिदा खाण्याचे काम करू लागल्या आहेत असे त्यांनी शेवटी ठणकावून सांगीतले.

> माझ्या काळात २७५ कोटी मंजूर झाले होते. त्यातील फक्त भुयारी गटाराच्या ७० कोटींच्या कामाचे उद्घाटन झाले. मी केलेल्या काही कामांना ६ ते ७ वर्ष झाली आहेत. त्यामुळे त्याची देखरेख व दुरुस्तीची कामेही प्रशासनाने करावयाची असतात.
>
> **- समीर मुलानी, पुर्व नगराध्यक्ष, कुर्डूवाडी.**

# फसवणुकीच्या गुन्ह्यातील एक वर्षापासून फरार आरोपी अटक



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २४ एप्रिल -**

वेळापूर येथील पोलिसांनी फसवणुकीच्या गुन्ह्यातील एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपीस अटक केली आहे

वेळापूर पोलीस ठाण्यात यासंदर्भात ७ जून २०२५ रोजी गुन्हा दाखल केला होता. यातील फिर्यादी राजकुमार बापू जाधव (रा. वेळापूर, ता. माळशिरस) यांना आरोपी सिताराम नारायण महांकाळ (रा. सोलापूर) याने देशी दारू दुकानाचा परवाना हस्तांतरण करून देण्याबाबत विश्वास संपादन केला. त्यासाठी आरोपीने फिर्यादीकडून तब्बल ३० लाख रुपये घेतले. मात्र दारू दुकानाचे हस्तांतरण न करता व पैसे परत न देता फिर्यादीची फसवणूक केल्याचे समोर आले होते.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी सुमारे एक वर्षापासून फरार होता. पोलिसांना गोपनीय माहितीनुसार आरोपी सोलापूर येथे नव्या पत्त्यावर राहत असल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि आशिष कांबळे तसेच पोहेकॉ संदिप पाटील, पोहेकॉ यशवंत आनंदपुरे, पोहेकॉ प्रविण हिंगणगावकर, स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणचे पोहेकॉ भोसले, पोहेकॉ गाजरे आणि सायबर पोलीस ठाण्याचे पोहेकॉ मेटकरी यांनी केली.

# प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र माती परीक्षण प्रयोगशाळा

### जिल्हा परिषद कृषी विषय समितीच्या पहिल्या सभेत ठराव मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल**




सोलापूर जिल्हा परिषद कृषी विभागाच्या नवनिर्वाचित विषय समितीची पहिली सभा (दि. २४) जिल्हा परिषद येथील शिवरत्न सभागृहात पार पडली. सभेत प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र माती परीक्षण प्रयोगशाळा काढण्याच निर्णय घेण्यात आला.

सभेच्या अध्यक्षस्थानी कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी होते. बैठकीत शेतकरी हिताचे अनेक महत्त्वपूर्ण विषय चर्चेला घेण्यात आले आणि विविध ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. पहिल्याच सभेत शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस भूमिका घेतल्याने उपस्थित सदस्यांनी समाधान व्यक्त केले. जिल्ह्यातील शेती विकास, तांत्रिक सुविधा आणि शेतकरी सक्षमीकरणासाठी समिती आगामी काळात अधिक प्रभावीपणे काम करणार असल्याचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी यावेळी सांगितले.

> ट्रॅक्टरचलित अवजारांची किंमत जास्त असल्याने त्यांच्या खरेदीसाठी वाढीव अनुदान आणि जास्तीत जास्त लाभार्थी संख्येसाठी अतिरिक्त लक्षांक मंजूर करण्याचा ठराव करण्यात आला. हा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मांडण्याचेही निश्चित केले. बैठकीत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कृषी साहित्य, अवजारे खरेदी आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विभागीय अधिकाऱ्यांनी यासंदर्भातील माहिती सभेपुढे मांडली.

सभेच्या प्रारंभी सर्व नवनिर्वाचित सदस्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते सदस्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कृषी क्षेत्रातील प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यात सध्या माती परीक्षणासाठी केवळ एकच प्रयोगशाळा उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना माती परीक्षणासाठी मोठा प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र माती परीक्षण प्रयोगशाळा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर झाला. युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती गॅस पुरवठा साखळीवर परिणाम होत आहे. यासाठी पर्याय म्हणून शेतकऱ्यांना बायोगॅस संयंत्र उभारणीसाठी शासनाकडून वाढीव निधी, अतिरिक्त लक्षांक आणि अनुदान उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

> डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या योजनांतर्गत अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांना विविध अनुदानाचा लाभ दिला जातो. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक प्रचार-प्रसिद्धी आणि जनजागृतीबाबत सूचना देण्यात आल्या.

कृषि निविष्ठा परवान्यांचे अधिकार २०१८ पासून राज्य शासनाने काढून घेतल्याने शेतकरी, विक्रेते आणि संबंधित घटकांची गैरसोय होत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे निविष्ठा परवाने देण्याचे अधिकार पूर्ववत जिल्हा परिषद कृषी विकास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावेत, असा ठराव मंजूर केला.



उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जाऊ नयेत यासाठी संजय राऊत प्रयत्न करत आहेत. आपला पत्ता कट होऊ नये यासाठी ते उद्धव ठाकरेंचा पत्ता कट करण्याच्या प्रयत्नात आहेत. यामुळे उबाठात राऊत विरूद्ध ठाकरे, असा वाद सुरू आहे.
- **नवनाथ बन,** भाजपा प्रवक्ते


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २५ एप्रिल २०२६




केवळ ऑटो-टॅक्सी वाल्यांना मराठी सक्ती का? कॉर्पोरेट सेक्टर तसेच मोठ्या कंपन्यामध्ये काम करणारे सर्व मराठीमध्ये बोलतात का? स्विगी, झोमॅटोचे डिलिव्हरी बॉय मराठी बोलतात का? सर्वांना मराठी शिकवण्याचा प्रयत्न सरकारतर्फे झाला पाहिजे.
- **संजय निरुपम,** शिवसेना नेते



# इराणवर हल्ल्यासाठी सज्ज

## इस्रायलचा इशारा, अमेरिकेच्या आदेशाची प्रतीक्षा

**तेल अवीव, २४ एप्रिल**

इस्रायल इराणविरुद्ध लष्करी कारवाई तीव्र करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आदेश मिळताच इराणवर हल्ले सुरू केले जाईल. आतापर्यंत केलेल्या हल्ल्याच्या तुलनेत हे हल्ले अधिक तीव्र असेल आणि राजधानी तेहरान बेचिराख होईल असा इशारा इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी दिला आहे.



अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धविरामाच्या पृष्ठभूमीवर इस्रायल हल्ल्याची नवी योजना आखत असून, अमेरिकेसोबत प्रस्तावित करार बारगळल्यास मध्यपूर्वेत पुन्हा युद्ध सुरू होण्याची शक्यता बळावली आहे. इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, आम्ही हल्ल्यासाठी सर्व लक्ष्ये निवडली आहेत. अमेरिकेकडून आदेश मिळताच इराणवर तीव्र हल्ले चढवले जाईल. गरज पडल्यास आक्रमक तसेच बचावात्मक दोन्ही प्रकारच्या कारवाया सुरू केल्या जाईल. इराण आपल्या लोकांवर कडक नियंत्रण ठेवतो आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्स व बसिज यांसारख्या संघटनांमार्फत दबाव आणला जात आहे. तेलाचे दर वाढावे या हेतूने इराण रणनीती आखत आहे, परंतु त्यांचे डाव यशस्वी होणार नाही. इराणचे नेते सध्या कमकुवत स्थितीत आहेत, आणि त्यांना निर्णय घेण्यात अडचण येत आहे. जर परिस्थिती आणखी बिघडली, तर पुढील लष्करी कारवाई अधिक धोकादायक आणि प्राणघातक असेल, ज्यामुळे इराणचा पाया हादरण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

### एकता हीच आमची ताकद : खामेनेई



**इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांनी जनतेसाठी जारी केलेल्या लिखित संदेशात म्हटले की, शत्रूचे सर्व डावपेच अपयशी ठरले असून, देशवासियांची एकता हीच आपली ताकद आहे. शत्रूची माध्यमे इराणी लोकांच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. जनतेने या धोक्यापासून सावध राहावे. लोकांच्या एकजूटतेमुळे शत्रूला मोठा धक्का बसला आहे. देशाच्या नेतृत्वात कोणतीही फूट नाही. इराणमधील कट्टरपंथी व मध्यममार्गी यांच्यात मतभेद असल्याचा दावा निराधार आहे.**

### इराणला सर्व बाजूंनी वेढा घालण्याची तयारी

**समुद्रातील सुरुंग हटवणे, इराणी नौका दिसताक्षणी उद्ध्वस्त करणे, होर्मुझमधील जलमार्गात नाकाबंदी अधिक मजबूत करणे आणि इराणचे तेल उत्पादन ठप्प करण्यासाठी योग्य पावले उचलण्याचे आदेश ट्रम्प यांनी सैन्याला दिले आहे. इराणला सर्व बाजूंनी वेढा घालून त्यांची आर्थिक नाकाबंदी करणे हा यामागील उद्देश असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणसोबत संपूर्ण करार होईपर्यंत दबाव कायम राहील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.**

### खामेनेईची प्रकृती चिंताजनक

**तेहरान, २४ एप्रिल**

इराण सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांची प्रकृती चर्चेचा विषय ठरला आहे. युद्धाच्या सुरुवातीच्या टप्प्यात झालेल्या जखमांमुळे ते अद्याप सार्वजनिकरित्या समोर आलेले नाहीत तसेच त्यांचा आवाजही लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. त्यांच्या सर्व सूचना आणि संदेश लेखी स्वरूपातच दिले जात असल्याची माहिती समोर येत आहे.

वृत्तांनुसार, त्यांच्या पायावर अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्याने कृत्रिम पायाची गरज भासू शकते, अशी माहिती पुढे आली आहे. एका हातावरही शस्त्रक्रिया झाली असून यातून ते हळूहळू सावरत आहेत. चेहऱ्यावर आणि ओठांवर भाजल्याच्या जखमा असल्याने त्यांना बोलण्यात अडचणी येत असून पुढील काळात शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते. सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचा ठावठिकाणा पूर्णपणे गुप्त ठेवण्यात आला आहे. वरिष्ठ लष्करी अधिकारी किंवा सरकारी पदाधिकारीदेखील त्यांना थेट भेटत नसल्याचे सांगितले जाते. शत्रूराष्ट्रांकडून त्यांचे स्थान शोधले जाऊ नये यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे. (वृत्तसंस्था)

# यूएसएस बुश युद्धनौका आखातात दाखल




**दुबई, २४ एप्रिल**

अमेरिकेने पश्चिम आशियाई रणांगणावर यूएसएस जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश ही विमानवाहू युद्धनौका तैनात केली आहे. या कॅरियर स्ट्राइक ग्रुपमध्ये ६,००० हून अधिक नौदल सैनिक आहेत. होर्मुझवरील नियंत्रण अधिक मजबूत करण्यासाठी या युद्धनौकेची तैनाती करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

अमेरिकेने इराणसोबतचा संघर्षविराम वाढवला असला तरी, दोन्ही देशांमधील तणाव कायम आहे. दरम्यान, अमेरिकेच्या लष्कराने जाहीर केले की यूएसएस जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश ही विमानवाहू युद्धनौका पश्चिम आशियाई प्रदेशात दाखल झाली आहे, त्यामुळे या प्रदेशात तैनात असलेल्या अमेरिकेच्या युद्धनौकांची एकूण संख्या तीन झाली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणविरुद्ध संभाव्य कारवाईचा भाग म्हणून युद्धनौका होर्मुझ जलमार्गात तैनात राहणार आहे. ही युद्धनौका अमेरिकी नौदलाच्या निमिट्झ-श्रेणीतील अणुशक्तीवर चालणारी आहे. ही या श्रेणीतील १० वी युद्धनौका आहे. (वृत्तसंस्था)

### युद्धनौकेची वैशिष्ट्ये

- वजन : अंदाजे १०४,००० मेट्रिक टन
- लांबी : एकूण १,०९२ फूट
- वेग : ३० नॉट्सपेक्षा जास्त
- तैनात : लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर
- एकूण कर्मचारी : ५,०००-६,००० सैनिक

### करार होईपर्यंत होर्मुझवर नियंत्रण

**ट्रम्प यांनी म्हटले की, जोपर्यंत इराण करारास सहमत होत नाही तोपर्यंत अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपले नियंत्रण कायम ठेवेल. हा मार्ग बंद ठेवण्याचा उद्देश इराणच्या अर्थव्यवस्थेवर दबाव आणणे हा आहे. जर आपण हा मार्ग खुला केला, तर इराण दररोज सुमारे ५०० दशलक्ष डॉलर्स कमवेल.**

# पीएफचे पैसे काढण्याची सुविधा होणार सुलभ

**नवी दिल्ली, २४ एप्रिल**

कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीबाबत महत्त्वाचा बदल होत असून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या नव्या सुधारित प्रणालीमुळे पैसे काढण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

निवृत्ती किंवा गरजेच्या वेळी उपयोगी पडणारा हा निधी आता अधिक वेगाने आणि सोप्या पद्धतीने मिळू शकणार असल्याची माहिती समोर आली आहे. पूर्वी या निधीसाठी बँकेत जाऊन दीर्घ रांगा लावाव्या लागत आणि अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत असे. मात्र नव्या व्यवस्थेमुळे ही संपूर्ण प्रक्रिया घरबसल्या पूर्ण करता येणार आहे. विशेष म्हणजे, येत्या काळात निधी काढण्यासाठी स्वयंचलित यंत्रांद्वारे तसेच डिजिटल व्यवहाराच्या माध्यमातून पैसे मिळण्याची सोय उपलब्ध होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या सुविधेअंतर्गत खात्यातील एकूण रकमेपैकी सुमारे ७५ टक्के रक्कम काढण्याची परवानगी दिली जाणार असून उर्वरित रक्कम खात्यात ठेवावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

# सम्राट चौधरी बहुमत चाचणीत पास

### विश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर



बिहार विधानसभेचे अध्यक्ष प्रेम कुमार यांचे स्वागत करताना मुख्यमंत्री सम्राट चौधरी

**पाटणा, २४ एप्रिल**

बिहारचे पहिले भाजपा मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी सभागृहात आपले बहुमत सिद्ध केले आहे. आरजेडी नेते तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षाने मतदानाची मागणी केली नाही. त्यानंतर अध्यक्षांनी सम्राट चौधरींचा विश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर झाल्याचे घोषित केले. यापूर्वी, सभागृहात विश्वास प्रस्तावावर एनडीए आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांमध्ये गरमागरम चर्चा झाली.

दरम्यान, २५ ते ३० पुन्हा नितीश, असे म्हणत भाजपाने नितीश कुमारांना संपवले, असा आरोप करत तेजस्वी यादव यांनी प्रस्तावाला विरोध केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री सम्राट चौधरी म्हणाले, नितीश कुमारांना कोणीही हटवू शकत नाही. मी आज त्यांच्याच इच्छाशक्तीमुळे मुख्यमंत्री झालो आहे. तेजस्वीवर निशाणा साधत सम्राट चौधरी म्हणाले, सत्ता ही कोणाचीही जन्मसिद्ध देणगी नसते. जर नितीश कुमार नसते, तर लालू कदाचित आमदार झाले असते, पण नेते झाले नसते. लालूंच्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळाची आठवण करून देताना ते म्हणाले, लालू यादव यांनी आरएसएससमोर नतमस्तक होऊन पहिली हळद स्वीकारली होती.

विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री विजय कुमार चौधरी म्हणाले, सम्राट चौधरी यांचे मुख्यमंत्री होणे ही एक ऐतिहासिक घटना आहे. एनडीएची दुसरी पिढी सत्तेवर येणे ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. आघाडीवरील जनतेचा विश्वास कायम ठेवणे ही एक मोठी उपलब्धी आहे. संधी न मिळाल्याने विरोधी पक्षनेत्याला निराश वाटणे स्वाभाविक आहे. विरोधी पक्षाची स्थिती अशीच राहिल्यास भविष्यात संधी मिळणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. (वृत्तसंस्था)

### लालूंनी बिहारला लुटले

**लालू प्रसाद यांच्यावर हल्लाबोल करत मुख्यमंत्री सम्राट चौधरी म्हणाले, ते सर्वात तरुण मुख्यमंत्री झाले पण त्यांनी बिहारला लुटले. त्यांच्या राजवटीत बिहारची काय अवस्था झाली होती, हे जनतेला माहीत आहे. नितीश कुमार यांना कोणीही राजकारणातून किंवा लोकांच्या हृदयातून काढू शकत नाही. नितीश कुमार नेहमी म्हणायचे की, आता जनतेला बिहारची काळजी घ्यावी लागेल.**

# पवन खेडांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**गुवाहाटी, २४ एप्रिल**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीने दाखल केलेल्या खटल्यात काँग्रेस नेते पवन खेडा यांना धक्का बसला आहे. गुवाहाटी उच्च न्यायालयाने शुक्रवारी खेरा यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. खेडा यांनी रिनिकी भुयान सरमा यांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या संदर्भात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता.

न्यायमूर्ती पार्थिव ज्योती सैकिया यांच्या एकल न्यायासनाने २१ एप्रिलला दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवला होता. एकल न्यायासनाने शुक्रवारी आपला निकाल दिला. सुनावणीदरम्यान, खेडा यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले की, खेडा यांच्या पळून जाण्याचा कोणताही धोका नाही आणि कोठडीतील चौकशी चुकीची आहे. त्यांनी त्यांच्या अटकेच्या गरजेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे आरोप जास्तीत जास्त फौजदारी मानहानीच्या कक्षेत येऊ शकतात, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### हे प्रकरण मानहानीच्या पलीकडचे

**पवन खेडा यांच्या याचिकेला विरोध करताना आसामचे महाधिवक्ता देवजित लोन सैकिया यांनी असा युक्तिवाद केला की, हे प्रकरण मानहानीच्या पलीकडचे आहे. या प्रकरणात फसवणूक आणि बनावटगिरी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे, ज्यात कागदपत्रे आणि मालकी हक्काच्या दस्तऐवजांमध्ये फेरफार केल्याचा आरोप आहे. त्यामुळे कोठडीतील चौकशी आवश्यक आहे.**

## चित्रपट वार्ता

### शिल्पाने घेतले बाबा विश्वनाथाचे दर्शन



**वाराणसी :** चित्रपट अभिनेत्री शिल्पा शेट्टी दोन दिवस काशीमध्ये आहे. तिने बाबा विश्वनाथांचे दर्शन घेतले. यानंतर ती मिर्झापूरला गेली. तिथे विंध्यवासिनी मातेला 'चुनरी' अर्पण केली. शिल्पा शेट्टी तिची आई सुनंदा शेट्टी यांच्यासह काशीला पोहोचली. काशी येथे एका दुकानात बनारसी साड्या पाहून त्यांनी कारागिरांकडून त्यांच्या विणकामाच्या बारकाव्यांची माहिती घेतली. शिल्पा शेट्टी म्हणाल्या की, बनारसी साड्यांची ओळख जगभरात आहे. त्यांनी साडीचा फोटो काढला आणि साडीसोबत सेल्फीही घेतला. यानंतर तिने लस्सीचा स्वाद घेतला. बाबा विश्वनाथांचे दर्शन घेतल्यानंतर त्या शयन आरतीमध्ये सहभागी झाल्या. सुमारे एक तास त्या मंदिरात होत्या.

### 'राका'मध्ये असणार हॉलिवूड संगीत




**मुंबई :** अल्लू अर्जुन आणि दीपिका पादुकोण अभिनीत 'राका' चित्रपटाच्या संगीताबाबत संगीत दिग्दर्शक साई अभ्यंकर यांनी खास माहिती दिली आहे. एटली दिग्दर्शित या चित्रपटाचे संगीत केवळ भारतीय प्रेक्षकांपुरते मर्यादित राहणार नाही, तर त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्याची तयारी सुरू आहे. 'राका'चे संगीत सध्या सुरुवातीच्या पण महत्त्वाच्या टप्प्यात आहे. अनेक गाणी तयार केली गेली आहेत. आता गीतांवर, मांडणीवर आणि अंतिम निर्मितीवर काम सुरू आहे. ॲटलीचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन पारंपरिक नसून खूप प्रायोगिक आहे. प्रत्येक ट्रॅकला वेगळी ओळख दिली जात आहे, असे साईने सांगितले. चित्रपटाचे संगीत खास बनवण्यासाठी टीम आंतरराष्ट्रीय गायक, संगीत निर्माते आणि गीतकारांसोबत काम करत आहेत.

### 'जेलर-२'चे चित्रीकरण पूर्ण



**मुंबई :** सुपरस्टार रजनीकांत यांच्या 'जेलर-२' चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. प्रोडक्शन कंपनी सन पिक्चर्सने संपूर्ण टीमसोबत केक कापताना अभिनेत्याचे फोटो शेअर केले आहेत. यावेळी दिग्दर्शक नेल्सन दिलीप कुमार, रजनीकांत आणि चित्रपटात त्यांच्या मुलाची भूमिका साकारणारे वसंत रवी देखील उपस्थित होते. चित्रपट जूनमध्ये प्रदर्शित होईल, असे रजनीकांत यांनी काही काळापूर्वी मीडियाला सांगितले होते. तथापि, निर्माते लवकरच चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत घोषणा करतील. तर, ॲमेझॉन प्राइम व्हिडीओने चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतरचे स्ट्रीमिंग हक्क १६० कोटी रुपयांना विकत घेतले आहेत. 'जेलर २'चे दिग्दर्शन नेल्सन यांनी केले आहे.

# भारताचे परराष्ट्र धोरण बदलले

## अमेरिकेचे माजी राजदूत केन जस्टर यांचे मत

**वॉशिंग्टन, २४ एप्रिल**

गेल्या दहा वर्षांत भारताच्या परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल झाले आहे. भारत आता व्यापार आणि परराष्ट्र धोरणात अधिक मोकळेपणा दाखवत आहे. आशियाई आणि शेजारी देशांशी संबंध अधिक दृढ करत होत असले तरी, प्रमुख करारांपासून अजूनही अंतर ठेवत असल्याचे मत भारतातील अमेरिकेचे माजी राजदूत केन जस्टर यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.



अलिकडच्या काळात भारताची भूमिका अधिक खुली आणि सक्रिय दिसत आहे. जस्टर यांच्या मते, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पहिल्या दोन कार्यकाळांच्या तुलनेत भारत आता व्यापाराबाबत अधिक मोकळेपणा दाखवत आहे. त्यांनी यावर जोर दिला की, भारत आता आशियाई देशांशी आपले संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्नशील आहे, विशेषतः बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या शेजारी देशांशी संबंध सुधारण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. (वृत्तसंस्था)

### आर्थिक हित जोपासण्याचा प्रयत्न

**जस्टर यांचे विधान अशावेळी आले आहे, जेव्हा भारत आणि अमेरिका व्यापार करारावर वाटाघाटी करत आहेत. या विधानांवरून असे दिसून येते की, भारत आपली जागतिक भूमिका मजबूत करू पाहत आहे आणि आशिया तसेच जगाच्या इतर भागांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पण त्याचवेळी, तो आपले आर्थिक हित लक्षात घेऊन काळजीपूर्वक निर्णय घेत आहे.**

# सुरक्षा परिषदेच्या रचनेत व्यापक सुधारणांची गरज

**संयुक्त राष्ट्रात भारताची भूमिका**

**न्यू यॉर्क, २४ एप्रिल**

सध्याची जागतिक रचना कालबाह्य झाली असून, आफ्रिकेतील देशांसह विकसनशील देशांना संयुक्त राष्ट्रांतील सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी प्रतिनिधित्व मिळणे काळाची गरज आहे. सध्याच्या जागतिक व्यवस्थेत विकसनशील देशांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे आणि सुरक्षा परिषदेच्या रचनेत व्यापक सुधारणा करणे गरजेची असल्याची भूमिका भारताने मांडली.

न्यू यॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, सध्याच्या जागतिक व्यवस्थेत विकसनशील देशांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. सुरक्षा परिषदेची सध्याची रचना आधुनिक वास्तवापासून खूप दूर आहे आणि तातडीने सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. विकसनशील देशांचा, विशेषतः आफ्रिकन देशांचा, स्थायी सदस्यत्व श्रेणीमध्ये समावेश करणे गरजेचे आहे. चर्चेसंदर्भात एक्सवरील पोस्टमध्ये जयस्वाल यांनी सांगितले की, भारत-संयुक्त राष्ट्र विकास भागीदारी निधी आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा यांसारख्या उपक्रमांद्वारे विकसनशील देशांना पाठिंबा देण्यासाठी भारत सातत्याने प्रयत्नशील आहे. जोपर्यंत आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांमध्ये सुधारणा होऊन त्या सर्वसमावेशक होत नाहीत, तोपर्यंत जागतिक विकासाचे उद्दिष्ट अपूर्णच राहील. यातून केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर संपूर्ण विकसनशील जगासाठी जागतिक स्तरावर एक खंबीर आवाज म्हणून उदयास येण्याचा भारताचा निर्धार आहे. (वृत्तसंस्था)

### मायक्रोसॉफ्टची स्वेच्छा निवृत्ती, मेटाची कपात

**वॉशिंग्टन, २४ एप्रिल**

जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात पुन्हा एकदा मोठ्या बदलांची चाहूल लागली आहे. मायक्रोसॉफ्ट आणि मेटा प्लॅटफॉर्म्स या आघाडीच्या कंपन्या कर्मचारी संख्येत कपात करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात वाढत्या गुंतवणुकीमुळे इतर खर्च आटोक्यात ठेवण्याची गरज निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. माहितीनुसार, मेटा कंपनीने आपल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी सुमारे दहा टक्के कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. ही प्रक्रिया पुढील काही दिवसांत सुरू होणार असून हजारो पदे रिक्त ठेवण्याचाही निर्णय कंपनीने घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नोकऱ्यांवर गदा येण्याची शक्यता आहे. दुसरीकडे मायक्रोसॉफ्टने कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छा निवृत्ती योजना जाहीर केली आहे. (वृत्तसंस्था)

# कृत्रिम बुद्धिमत्तेला मानवी संवेदनांची जोड द्या

## तंत्रज्ञान व नीतिमत्तेचा समतोल राखण्याचे राज्यपालांचे आवाहन

**मुंबई, २४ एप्रिल**

येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मशीन लर्निंगचा आहे, यात शंका नाही. परंतु, तंत्रज्ञानाच्या धावपळीत मानवी मूल्ये हरवली तर ते समाजासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेला अधिक संवेदनशील बनवून, त्यामध्ये दया, अनुकंपा आणि सहानुभूतीचा अंतर्भाव करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी येथे केले. मुंबईतील ॲटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीच्या सेंटर फॉर इनोव्हेशनचे उद्घाटन आणि ओ.पी. जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित गव्हर्निंग एआय या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते.

कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध असणे आणि त्याचे ठोस उद्दिष्ट नसणे हे धोक्याचे असते. तसेच, विज्ञानाला जर मानवी मूल्यांची जोड नसेल, तर ते प्रगतीऐवजी विनाशच ओढवू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या जय अनुसंधानच्या मंत्राचा उल्लेख करत राज्यपाल म्हणाले की, सध्याचे युग हे विज्ञान आणि नवोन्मेषाचे आहे, परंतु हे संशोधन करताना सर्वसामान्यांच्या हिताचा आणि समाजाच्या शेवटच्या घटकाचा विचार होणे



विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्यपाल

आवश्यक आहे. विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक संपन्नता नसून, प्रत्येकाला सुख आणि आरोग्य मिळवून देणे हा आहे. यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये दुर्बल घटकांबाबत सहानुभूती निर्माण करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाला वेळी ॲटलास स्किलटेक विद्यापीठाच्या संस्थापिका डॉ. इंदू शहानी, कुलगुरू डॉ. राजन वेळूकर, सिरील श्रॉफ, रॉनी स्क्रूवाला यांच्यासह मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

### नामशेष होणाऱ्या कलांना विद्यापीठांनी नवसंजीवनी द्यावी

**आधुनिकीकरणाच्या रेट्यात आज हजारो पारंपरिक कला आणि हस्तकला नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. एक कला लुप्त होणे म्हणजे आपली सांस्कृतिक ओळख गमावणे होय, याकडे लक्ष वेधत राज्यपाल म्हणाले की, दुर्मिळ कला केवळ संग्रहालयात बंदिस्त करून चालणार नाही, तर त्यांना नवसंजीवनी देण्याचे काम विद्यापीठांनी केले पाहिजे. नामशेष होणाऱ्या कलांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेतला तरच आपली समृद्ध संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचू शकेल. या कार्यासाठी त्यांनी ॲटलास स्किलटेक विद्यापीठाला आवाहन केले.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला...

अमेरिका हा जगातील सर्वांत जुना लोकतांत्रिक देश आणि वर्तमानातली एकमेव जागतिक महाशक्ती. आर्थिक, लष्करी आणि औद्योगिक प्रगतीत अमेरिकेची बरोबरी कुणीही अद्याप करू शकलेले नाही. सर्व क्षेत्रांतील अद्ययावत तंत्रज्ञान त्या देशाकडे आहे. अमेरिकेचा व्हिसा हा जगातील सर्वाधिक शक्तिशाली व्हिसा समजला जातो. मानवी मूल्ये तसेच कायदेशीर आणि घटनात्मक अधिकारांचे जेवढे जतन आणि संवर्धन अमेरिकेत आतापर्यंत होत होते, तेवढे खचितच जगातील अन्य कोणत्याही देशात होत असावे. पण गेल्या काही दिवसात अमेरिकेची ही ओळख पुसून टाकण्याचे 'पवित्र' कार्य त्या देशाच्या राष्ट्रपतींनीच हाती घेतले आहे. डोनाल्ड ट्रम्प हे त्यांचे नाव. त्यांच्या काळात मानवतेचे मारेकरी अशी अमेरिकेची नवी ओळख जगात निर्माण झाली आहे. ट्रम्प यांची वागणूक अतिशय विचित्र, विक्षिप्त, बेमुर्वत आणि आढ्यताखोर आहे. आपल्या वागणुकीने त्यांनी शत्रूंना आणखी कट्टर शत्रू केले आणि पारंपरिक मित्रांनाही शत्रू बनण्यास भाग पाडले.

रेडियो होस्ट मायकल सॅवेज यांची एक भारतविरोधी पोस्ट ट्रम्प यांनी रिपोस्ट केली. यात सॅवेज यांनी भारतविरोधी विषारी फुत्कार सोडले होते. सॅवेज यांची पोस्ट ट्रम्प यांनी रिपोस्ट केली, याचा अर्थ सॅवेज यांच्या भारतविरोधी मताशी आणि भूमिकेशी ट्रम्प महाशय सहमत आहेत, असाच निघतो. एरवीही ट्रम्प कधी काय बोलतील वा त्यांच्या तोंडातून कशी आणि कोणती मुक्ताफळे बाहेर पडतील, याचा अंदाज करता येत नाही. अमेरिकेला सभ्य आणि लोकशाहीवादी राष्ट्राध्यक्षांची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. या सर्व राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकेची मान उंचावली. एखादा अपवाद वगळता अमेरिकेचा प्रत्येक राष्ट्राध्यक्ष व्यक्ती म्हणूनही चांगल्या वळणाचा असे. ट्रम्प यांची तुलनाच पूर्वीच्या कुण्या राष्ट्राध्यक्षांशी करता येत नाही इतके हे महाशय 'थोर' निघाले. ट्रम्प यांनी आपल्या वाहियात आणि वाचाळ वक्तव्यांनी तसेच कृतीने स्वत:सोबत अमेरिकेची प्रतिष्ठाही पायदळी तुडवली. आंतरराष्ट्रीय समुदायाला वारंवार अडचणीत टाकले. आजपर्यंतच्या इतिहासात एवढा नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला अध्यक्ष अमेरिकेला मिळाला नाही. अध्यक्ष म्हणून आपण काय बोलावे, कसे वागावे, याचा कोणताही मागमूस यांच्या वर्तनात नाही. एखादा वेडा इसम तरी बरा वागेल, एखादा विक्षिप्त किंवा टग्या माणूसही कदाचित बरे वर्तन करेल. त्यांनाही लाजविणारी भाषा जगाला सभ्यतेचे धडे देणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वापरत आहेत. ट्रम्प यांनी आपल्या वागणुकीने समस्त अमेरिकी जनतेचीही मान खाली झुकवली आहे. आम्ही कोणते पाप केले, की म्हणून असा अध्यक्ष आमच्या पदरी पडला, अशी तक्रारही आता अमेरिकी जनता करू शकत नाही. कारण या जनतेनेच त्यांना दुसऱ्यांदा निवडून दिले. त्यांनी आपल्या चुकीची पुनरावृत्ती केली. अमेरिकेच्या विद्यमान प्रतिमा भंजनासाठी ट्रम्प जेवढे जबाबदार आहेत, तेवढीच अमेरिकेच्या मतदारांचीही जबाबदारी आहेच. आता किमान पावणेतीन वर्षे अमेरिकेन जनतेला ट्रम्प कितीही मान्य नसले, पटत नसले तरी सहन करावे लागणार आहे. अमेरिकन जनतेला एवढा काळ तरी हे न पटणारे सौभाग्य आपल्या माथ्यावर मिरवावे लागणार आहे.

'खोटं बोल पण रेटून बोल' यावर ट्रम्प यांचा विश्वास आहे. आपण जे बोलतो, त्यावर अमेरिकी जनता आणि जगाचा सहज विश्वास बसतो, असा त्यांचा समज आहे. खरे तर तो त्यांचा गैरसमज आहे. एव्हाना अमेरिकेची जनता आणि उर्वरित जगालाही ट्रम्प नावाची चीज किती विचित्र आणि फालतू आहे, हे कळून चुकले आहे. उचलली जीभ लावली टाळूला अशाच धर्तीची ट्रम्प यांची सर्व विधाने असतात. कधी महिला पत्रकाराला तुम्ही देखण्या आहात असे म्हणणे आणि कधी एखाद्याच्या मृत्यूची बातमी आली तर बरे झाले, तो गेला, असे उद्गार काढणे ही त्यांची सभ्यता. अशी कित्येक उदाहरणे सापडतील. जन्मजात नागरिकत्व अमेरिकेशिवाय दुसरा कोणताही देश देत नाही, असे ट्रम्प म्हणाले. पण जगातील ३६ देश त्यांच्या देशात जन्मलेल्याला नैसर्गिक स्वरूपात नागरिकत्व देतात, हे वास्तव ते लपवून ठेवतात. खोटे बोलताना आपण अमेरिकेसारख्या देशाचे अध्यक्ष आहोत, याचेही भान ट्रम्प यांना राहात नाही वा ते ठेवत नाहीत. अध्यक्षपदाचा ट्रम्प यांचा पहिला कार्यकाळ दुसऱ्या कार्यकाळापेक्षा खूप चांगला होता, असे म्हणावे लागते. दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प यांचे वर्तन आधीच मर्कट त्यात मद्य प्याला असे झालेले दिसते.

लहरी आणि विक्षिप्त वर्तन व वक्तव्यांमध्ये भर म्हणून ट्रम्प यांनी अमेरिकेतच नाही तर जगातही हिंसेचे तांडव सुरू केले. अमेरिकेने याआधीही जगातील अनेक लहान-मोठ्या देशावर आक्रमण करीत त्यांचा घास घेतला. अमेरिकेने आपल्या पाशवी महत्त्वाकांक्षेपोटी हातात छडी घेऊन जगाला धडा शिकविण्याचा प्रयत्न अनेकदा केला. ट्रम्प यांनी तर त्यात मोठीच आघाडी घेतली. अख्खे आखात त्यांनी संकटात टाकले. जगातील इतर देशांनाही त्रास दिला. अशा पद्धतीने जगात अशांतता निर्माण करणारे ट्रम्प शांततेच्या नोबल पुरस्कारावर दावा करतात, हा फारच मोठा विनोद म्हटला पाहिजे. जगातील सगळ्यात विकृत, विचित्र व विक्षिप्त राष्ट्रप्रमुख म्हणून एखादी स्पर्धा घेतली तर त्यात ट्रम्प यांची अव्वल नंबरवर निवड झाल्याशिवाय राहणार नाही. सामान्यपणे कोणत्याही देशाच्या राष्ट्रप्रमुखाला मुत्सद्देगिरीने वागावे लागते. मुत्सद्देगिरीची भाषा बोलावी लागते. खरा राजकीय नेता तोच असतो, ज्याला काय बोलावे, यापेक्षा काय बोलू नये, हे कळते. राजनयिक वा मुत्सद्यांनाही काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे कळायला हवे. आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे काही पायंडे आहेत, तसे ते राष्ट्रप्रमुखपदावर बसलेल्या व्यक्तींनी कसे बोलावे, वागावे याबद्दलही आहेत. त्यांचा लवलेशही ट्रम्प यांच्या वर्तनात नाही. त्यांनी चीन आणि भारताबाबत नुकतेच जे विधान केले, त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. चीन आणि भारत यांचा उल्लेख ट्रम्प यांनी 'नरकाचे प्रवेशद्वार' असा केला. या वक्तव्यातून ट्रम्प यांनी चीन आणि भारतातील जनतेचा घोर अपमान केला. चीन हा अमेरिकेचा मित्र नसला, तरी भारत हा अमेरिकेचा मित्र आहे. जेव्हा जेव्हा शक्य होते, तेव्हा भारताने अमेरिकेला पाठिंबा दिला. अमेरिकेचा जो गाडा आज आपल्याला सुरळीत चालल्यासारखा दिसतो त्यामागे अमेरिकेतील भारतीय नागरिकांचे मोठे योगदान आहे. अमेरिकेच्या समाजजीवनातून भारतीय नागरिक वगळले, तर अमेरिकेचा डोलारा खाली कोसळायला वेळ लागणार नाही. अशा देशाचा उल्लेख ट्रम्प यांनी नरकाचे प्रवेशद्वार असा केला, याबद्दल समस्त भारतीयांनी चवताळून उठले पाहिजे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यात चीनने अमेरिकेविरुद्ध इराणला मदत केली. म्हणजे चीन त्या युद्धात अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या विरोधात उतरला. पण भारताने अशी कोणतीच भूमिका घेतली नाही. खरे तर इराणही भारताचा मित्रदेश आहे आणि अमेरिकाही मित्र आहे. भारताने या युद्धात कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेता संतुलित आणि संयमी भूमिका घेतली, याची जाणीव अमेरिकेने ठेवायला हवी होती.

ट्रम्प यांच्या उन्मत्त आणि युद्धखोर मानसिकतेने अमेरिकेतील त्यांची लोकप्रियता झपाट्याने खाली घसरली आहे. जोपर्यंत ते अमेरिकेचे अध्यक्ष आहेत, तोपर्यंत ते स्वत:ची आणि अमेरिकेचीही जगातील प्रतिमा काळवंडणार आहेत आणि या ना त्या पद्धतीने विविध देशांना-समुदायांना संकटात टाकणार आहेत, हे नक्की. अमेरिकन जनतेच्या वतीने तिथल्या राजकारण्यांनी त्यांच्याविरुद्ध अविश्वास आणून त्यांना अध्यक्ष पदावरून पदच्युत केले पाहिजे. अन्यथा ट्रम्प अमेरिकेलाच नव्हे तर जगालाही महाग पडतील, हे नक्की.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# भाजपाला शोंदेश आणि दीदीला संदेश





पश्चिम बंगालच्या राजकारणात २०२६ च्या विधानसभा निवडणुकीकडे केवळ सत्तासंघर्ष म्हणून पाहता येणार नाही तर या निवडणुकीत बंगाली जनतेला प्रायश्चित्त करावं लागणार आहे. बंगालची भूमी ही हिंदू संस्कृतीसाठी ओळखली जाते. पण ज्या भूमीने राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत दिले, ज्या भूमीने आधुनिक काळात जिहादी अत्याचार पचवले, ती भूमी पुढे कम्युनिस्टांच्या ताब्यात गेली. कम्युनिस्ट, हिंदुत्व या दोन विरोधार्थी विचारधारा असल्या, तरी त्या 'विचारधारा' आहेत, हे मानावं लागेल. पण कम्युनिस्टांच्या अत्याचारातून मुक्त होण्याची गरज जेव्हा बंगालला भासली तेव्हा बंगाली जनतेने वरवर प्रादेशिक अस्मितेचा बुरखा पांघरलेल्या पण 'सत्ता' सोडून कोणतीच विचारधारा नसलेल्या ममता दीदीची निवड केली आणि इथेच बंगाली जनता फसली. दीदीने मा, माटी, मानुष अशी हाक दिली. प्रादेशिक अस्मिता ही अशी फसवी असते. दक्षिण भारतात ही फसवी अस्मिता अत्यंत प्रबळ आहे. महाराष्ट्राने मात्र या फसव्या अस्मितेला फारसा थारा दिला नाही. कारण मराठी माणसाच्या रक्तात हिंदवी स्वराज्य आहे.

आता बंगालमध्ये २३ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यातील १५२ मतदारसंघांतील मतदानाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. सुमारे ९१.७८ टक्के इतके विक्रमी मतदान झाले आहे. हा बदलाचा आणि प्रस्थापित सत्तेविरुद्धच्या रोषाचा संकेत असल्याचे म्हटले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्या टप्प्यानंतर केलेल्या दाव्यांनी बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी १५२ पैकी ११० जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला असून सर्वात महत्त्वाचे म्हणजे बंगालच्या इतिहासात पहिल्यांदाच एकही मृत्यू न होता निवडणूक पार पडल्याचे नमूद केले आहे. हे वक्तव्य अत्यंत घातक आहे. कारण बंगालमध्ये निवडणुकीच्या काळात अनेक मृत्यू होतात आणि हे मृत्यू म्हणजे राजकीय बळी असतात व सत्ताधारी पक्ष हा अत्याचार राजरोसपणे करीत असतो; मात्र स्वतःला पुरोगामी, संविधानप्रेमी म्हणवून घेणारे नालायक लोक टाळ्या वाजवत असतात.

पहिल्या टप्प्यात १५२ जागांसाठी मतदान झाले; ज्यामध्ये प्रामुख्याने उत्तर बंगाल आणि जंगल महाल या क्षेत्रांचा समावेश होता. उत्तर बंगाल हा गेल्या काही वर्षांपासून भाजपाचा बालेकिल्ला राहिला आहे, तर जंगल महालमध्ये तृणमूल आणि भाजपामध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळते. ९१.७८ टक्के मतदानाचा अर्थ असा होतो की, ग्रामीण भागातील मतदारांनी मोठ्या संख्येने बाहेर पडून आपला हक्क बजावला आहे. अमित शाहांनी केलेला ११० जागांचा दावा हा याच पृष्ठभूमीवर आधारित आहे. बंगालमध्ये निवडणुकीच्या काळात होणारा हिंसाचार हा नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे, परंतु यावेळी कडक सुरक्षा व्यवस्था आणि निवडणूक आयोगाच्या नियोजनामुळे हिंसाचार रोखण्यात यश आले, हे भाजपासाठी मोठे यश मानले जात आहे. यावेळच्या निवडणुकीत 'एसआयआर' म्हणजेच विशेष सघन पुनरीक्षण हा सर्वात मोठा 'गेम चेंजर' ठरला आहे. कलकत्ता उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेमुळे बंगालच्या मतदार यादीतील मोठ्या प्रमाणावरील त्रुटी दूर करण्यात आल्या. सुमारे ९० लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली किंवा त्यांची पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेचा परिणाम असा झाला की, अनेक वर्षांपासून असलेल्या 'बोगस' मतदानावर लगाम लावला गेला. तृणमूल काँग्रेसने आरोप केला की, या प्रक्रियेत अल्पसंख्यक मतदारांना लक्ष्य करण्यात आले आहे, परंतु 'एसआयआर'मुळे मतदार यादी 'स्वच्छ' झाली असून याचा थेट फायदा भाजपाला मिळण्याची शक्यता आहे.

आता मुस्लिम मतदारांबाबत म्हणायचे झाले, तर पहिल्या टप्प्यात उत्तर बंगालमधील उत्तर दिनाजपूरसारखे काही जिल्हे वगळता मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण तुलनेने कमी आहे. या टप्प्यात प्रामुख्याने राजबंशी, आदिवासी आणि मागासवर्गीय मतदारांचा प्रभाव जास्त आहे. पहिल्या टप्प्यात मुस्लिमबहुल मतदारसंघांची संख्या सुमारे १५ ते २० च्या आसपास आहे. येथे भाजपाला हिंदू मतांच्या एकत्रीकरणाचा फायदा मिळण्याची अपेक्षा आहे. २९ एप्रिल रोजी होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यात खरी कसोटी लागणार आहे. या टप्प्यात मुर्शिदाबाद, मालदा आणि दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांचा समावेश आहे, जे तृणमूल काँग्रेसचे बालेकिल्ले मानले जातात. या भागात मुस्लिम लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या मतदारसंघांची संख्या मोठी आहे. दुसऱ्या टप्प्यात सुमारे ४० ते ५० जागा मुस्लिमबहुल आहेत. मात्र, 'एसआयआर'मुळे या भागातील मतदार याद्यांमध्ये झालेला बदल आणि ओवेसी-कबीर (आम जनता उन्नयन पार्टी) युतीमुळे होणारी मुस्लिम मतांची फाटाफूट दीदींसाठी चिंतेची बाब ठरू शकते तसेच निवडणूक आयोगाचे शून्य सहनशीलता धोरण आणि १०० टक्के वेबकास्टिंगमुळे यावेळी बंगालमध्ये पारदर्शक निवडणूक होत आहे.

वरील बाबी लक्षात घेतल्या तर हे स्पष्ट होते की, बंगालची राजकीय हवा बदलत आहे. मात्र निवडणुकीचा दुसरा टप्पा भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. ओवैसींनी जर चमत्कार केला आणि दुसऱ्या टप्प्यातही ९० टक्के मतदान झाले. उर्वरित ५० टक्के जागांवर हिंदू मोठ्या प्रमाणात उतरले तर भाजपाला सत्तास्थापन करण्याची संधी मिळू शकते. पण अनेकांना हे जितकं सोपं वाटतंय तितकं सोपं नाही. ममता दीदीचं सर्वात मोठं शस्त्र म्हणजे भीती होय! जर भाजपा सत्तेत नाही आली तर भाजपा आपल्या कार्यकर्त्यांना व मतदारांना संरक्षण देऊ शकेल काय? ही भीती बंगाली जनतेच्या मनातून जोपर्यंत निघत नाही, तोपर्यंत बंगालमध्ये चमत्कार होणार नाही. पहिल्या टप्प्यात ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. याचा अर्थ ही भीती काही प्रमाणात निघालेली आहे किंवा लोकांच्या मनात दीदीविषयी चीड आहे, असा होऊ शकतो. मागच्या निवडणुकीत भाजपाला ८० चा आकडा पार करता आला होता. बंगालच्या सत्तेवर विराजमान व्हायचे असेल तर २९४ पैकी १४८ जागा भाजपाला जिंकाव्या लागणार आहेत. म्हणजे भाजपाला आधीच्या ८० जागांवर हक्क सांगत सुमारे आणखी ७० जागा हव्या आहेत. म्हणूनच अमित शाह म्हणतात त्याप्रमाणे भाजपाला पहिल्या टप्प्यात ११० जागा जिंकाव्याच लागणार आहेत. कारण दुसरा टप्प्याचा सुमारे ५० टक्के भाग दीदीच्या हातात आहे. तरी पहिल्या टप्प्याचं मतदान पाहिलं की भाजपाला शोंदेश म्हणजेच मिठाई मिळण्याची शक्यता आहे आणि हा दीदीसाठी संदेश म्हणजेच एक सूचना आहे की, 'दीदी तुझी सत्ता आता डळमळीत झाली आहे.' येत्या ४ मे रोजी कळेल की, अमित शाह आणि नरेंद्र मोदी हे दीदीला आपल्या विजयाचा शोंदेश द्यायला जातील की...?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# बुलढाणा जिल्ह्यात पर्यटन विकास करा

मागासलेला जिल्हा म्हणून विदर्भातील बुलढाणा जिल्हा ओळखला जातो. या जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. मात्र, सिंचनाच्या पुरेशा सुविधा नसल्याने कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त आहे. पावसाच्या पाण्यावरच शेतकऱ्यांना अवलंबून राहावे लागते. शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय काही शेतकरी करतात. पण, त्यांची संख्या अलिकडच्या काळात कमी झाली आहे. या जिल्ह्यात कोणताही मोठा उद्योग नाही. आमदार डॉ. संजय कुटे यांनी विधानसभेत कृषी उत्पादनांवर आधारित उद्योग बुलढाणा जिल्ह्यात उभारण्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. उद्योगांसोबतच पर्यटन क्षेत्रासाठी हा जिल्हा उपयुक्त ठरू शकतो.

बुलढाणा जिल्ह्यात जागतिक कीर्तीचे खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आहे. हे सरोवर उल्कापातामुळे नैसर्गिकरीत्या तयार झाले आहे. त्यामुळे सरोवराचा अभ्यास व निरीक्षण करण्यासाठी देश-विदेशातील अभ्यासक व पर्यटक मोठ्या संख्येत लोणारला भेट देतात. सरोवरासोबतच या शहरात धारातीर्थ, हेमाडपंथी स्वामी मंदिर आदी ठिकाणे आहेत. लोणारपासून जवळच मेहकर तालुक्यात हिवरा आश्रम येथे स्वामी विवेकानंद आश्रम हे आध्यात्मिक केंद्र आहे. शुकदास महाराजांनी हा आश्रम स्थापन केला आहे. राज्यातील भाविकांचे हे श्रद्धास्थान आहे. या जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने गेल्या कित्येक दिवसांपासून रखडलेला लोणार-हिवरा आश्रम हा सी-प्लेन प्रकल्प सुरू करण्याचा विचार केला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळून अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळणार आहे. यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या आहेत. खाजगी निविदाधारकांच्या माध्यमातून या प्रकल्पात ४६६ ते ४९० कोटींची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. सरकारवर कोणताही आर्थिक भार न पडता हा प्रकल्प कार्यान्वित केला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. ९ ते १९ आसनी सिंगल किंवा टिन इंजीन विमाने हिवरा आश्रम ते लोणार सरोवर उड्डाण घेणार आहेत. यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील हिवरा आश्रम व लोणार ही दोन पर्यटनस्थळे जागतिक पर्यटन केंद्र म्हणून नावारूपाला येणार आहेत. लोणार सरोवर हे जगभरातील अभ्यासक, शास्त्रज्ञ आणि पर्यटकांचे आकर्षण केंद्र राहिले आहे.

याशिवाय श्री संत गजानन महाराजांच्या पावन वास्तव्याने पुनित झालेली शेगाव नगरी तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्र आहे. श्री गजानन महाराजांचे मंदिर हे भक्तांची सेवा, शिस्त, स्वच्छता साठी देशभरात प्रसिद्ध आहे. भक्तांना आजही श्रींचे अनुभव येतात. त्यामुळे भाविक मोठ्या संख्येत शेगावला येतात. मध्य रेल्वे व राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे हे तीर्थक्षेत्र देशात नावारूपाला आले आहे. अध्यात्म आणि पर्यटनाची सांगड घालणारा आनंद सागर प्रकल्पामुळे येथील पर्यटनाला चालना मिळाली.

याशिवाय मेहकर आणि देऊळगाव राजा येथील बालाजी मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यात्रा महोत्सवात राज्यभरातील भाविक सहभागी होतात. सिंदखेड राजा हे छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ व माँ जिजाऊ यांचे जन्मस्थळ आहे. माँ साहेबांच्या जन्मदिनी देशभरातील शिवभक्त येथे येऊन माँ साहेबांपुढे नतमस्तक होतात. बुलढाणापासून जवळच अजिंठा लेणी आहे. येथे लेणी निरीक्षणासाठी देश-विदेशातील पर्यटक व अभ्यासक वर्षभर भेट देतात. संग्रामपूर तालुक्यात अंबाबरवा हे अभयारण्य आहे. जंगल सफारीची हौस असलेल्यांसाठी हे चांगले ठिकाण आहे. बोथा येथे ज्ञानगंगा अभयारण्य आहे. या जंगलात बिबट, अस्वल, नीलगाय, हरीण आदी वन्य प्राणी वास्तव्यास आहेत. जंगल भ्रमंतीचा आनंद पर्यटकांना मिळू शकतो. याशिवाय अनेक लहान-मोठी पर्यटनस्थळे आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या सर्व पर्यटनस्थळे व तीर्थक्षेत्रांचा व्यवस्थित प्रचार व प्रसार केल्यास बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळू शकते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटन उद्योग सुरू होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते. पर्यटकांची संख्या वाढल्यास हॉटेल, टॅक्सी, गाईड व्यवसायाला चालना मिळेल. रोजगार निर्मितीतून अर्थव्यवस्थेला उभारी मिळू शकते. तेव्हा, शासनाने बुलढाणा जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी कृती आराखडा तयार करावा. लहान-मोठे व मध्यम प्रकल्पांवर नौकानयन व इतर सुविधा उपलब्ध केल्यास शासनाच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात महसूल जमा होऊ शकतो. जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील. परिणामी हाताला काम मिळाल्याने त्यांची क्रयशक्ती वाढेल. तेव्हा, महाराष्ट्र शासनाने पर्यटन उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हा तर सैतानाने वेद वाचण्यासारखा प्रकार!



काँग्रेसच्या नेत्या प्रियांका वढेरा यांनी नुकताच एक सवाल उपस्थित केला आहे. त्या संसदेत उभे राहून उन्नाव, हाथरस आणि मणिपूरमधील अन्यायाचे काय, असा प्रश्न उपस्थित करतात. स्वतःला महिलांच्या मसिहा म्हणवून घेतात. ज्यांच्या पक्षाचा संपूर्ण इतिहासच महिलांच्या अब्रूची आणि सन्मानाची धूळधाण उडवण्यावर आधारित आहे, त्यांनी आज महिला सुरक्षेबद्दल बोलणे म्हणजे कावळ्याने शूचितेची भाषा करण्यासारखेच म्हणावे लागेल. ज्या पक्षाच्या कारकीर्दीत महिलांच्या सन्मानावर वारंवार गदा आली, ज्यांच्या राजकीय वारशावरच महिला अत्याचारांच्या घटनांचे डाग आहेत, त्या पक्षाच्या नेत्यांनी आज नैतिकतेचा आव आणत महिला सुरक्षेचे धडे देणे म्हणजे जणू 'सैतानाने वेद वाचण्यासारखा' प्रकार आहे.

### सत्तेसाठी सोयीचा इतिहास

प्रियांका वढेरा आज ज्या उन्नाव, हाथरस आणि मणिपूरच्या घटनांचा उल्लेख करीत आहेत, त्या नक्कीच निषेधार्ह आहेत आणि त्यावर कायद्याने कडक कारवाई झालीच पाहिजे. पण, त्याच वेळी प्रश्न पडतो की, काँग्रेसच्या ६०-७० वर्षांच्या सत्ताकाळात घडलेल्या शेकडो घटनांवर प्रियांका वढेरा आणि त्यांचे 'राजघराणे' गप्प का होते? दिल्लीत निर्भया प्रकरण घडले, त्याआधी युवक काँग्रेसच्या नेत्या नयना साहनी हत्येचं गाजलेलं तंदूर प्रकरण तेव्हा याच काँग्रेसच्या काळात दिल्लीतील महिला किती सुरक्षित होत्या? नलिनी श्रीकरणपासून ते मथुरा बलात्कार प्रकरणापर्यंतचा इतिहास काँग्रेसचा 'महिला सन्मान' किती दांभिक होता, हे सांगायला पुरेसा आहे. देशातील महिलांवर अत्याचार होत असताना सत्तेत असणाऱ्यांना तेव्हा 'मसिहा' आठवत नव्हता का? तेव्हा महिलांचा आवाज काँग्रेसच्या सत्तेच्या गल्लीत चिरडला जात नव्हता का? बरं उन्नाव, हाथरस, मणिपूरची आठवण यांना विसरू देत नाही. मात्र, त्याचवेळी या वढेरा बाईंना कलकत्याच्या एम. जी. कर रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी ३१ वर्षीय डॉक्टर तरुणीवर बलात्कार व खून झाला, तेलंगणातील हैदराबादमध्ये २७ वर्षीय पशुवैद्यक तरुणीवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली, आरोपींनी टोल प्लाझाजवळ दुचाकीला पंक्चर झाल्याचे भासवून मदतीच्या बहाण्याने तिला पळवून नेले. नंतर जळित मृतदेह उड्डाणपुलाखाली सापडला. पण तेलंगणात सत्ता काँग्रेसची असल्यानं त्याची आठवण वढेरांना येत नाही.

### 'उबाठा' गट आणि महाराष्ट्रातील महिला सुरक्षा

आता वळूया महाराष्ट्राकडे. प्रियांका वढेरांना मणिपूर, उन्नाव, हाथरसमधील महिलांची काळजी वाटते, पण त्यांना महाविकास आघाडीच्या काळात, विशेषतः 'उबाठा' (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या सत्ताकाळात महाराष्ट्रात काय चालले होते, हे दिसत नाही का? त्यावेळी याच महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर येथे एका दलित तरुणीला भररस्त्यात जिवंत जाळले गेले होते. मुंबईतील साकीनाका परिसरात पाशवी बलात्कार... अशा बलात्काराच्या घटना बऱ्याच झाल्यात. हिंगणघाट येथे शिक्षिकेवर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा गृहखाते कोणाकडे होते आणि मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर कोण बसले होते? 'उबाठा' गटाच्या सत्ताकाळात महिला अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरू असताना हेच तथाकथित पुरोगामी नेते गप्प का होते? शिवाय कंगना राणावत, नवनीत राणा, केतकी चितळे यांच्याबाबतीत तर सत्तेचा माज दाखवला गेला आणि स्वप्ना पाटकरांच्या बाबतीत यांच्या संजय राऊतांनी तर लायकीच दाखवली. तेव्हा यांना 'महिलांचा सन्मान' आठवत नव्हता. संजय राऊत दररोज सकाळी उठून ज्या पद्धतीने महिला नेत्यांबद्दल आणि विरोधकांबद्दल अर्वाच्च भाषा वापरतात, तो काय महिलांचा सन्मान आहे? ज्यांच्या पक्षातील लोक महिलांना धमकावतात, त्यांच्या मुखातून महिला सुरक्षेची भाषा म्हणजे शुद्ध ढोंग आहे. ज्यांनी सत्तेच्या लाचारीसाठी हिंदुत्वाशी तडजोड केली आणि वारंवार महिलांचा अपमान केला, त्यांना दुसऱ्यांवर बोट उचलण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही.

### महिला आरक्षण : एक ऐतिहासिक पाऊल

मोदी सरकारने आणलेले विधेयक महिला आरक्षणाचे नव्हतेच, असे धादांत खोटे वक्तव्य प्रियांका वढेरा करीत आहेत. महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर करून महिलांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे धाडस कोणी केले? काँग्रेसने इतकी वर्षे सत्तेत राहूनही जे काम केले नाही, ते पंतप्रधान मोदींनी केले. प्रियांका वढेरांनी केलेल्या टीकेतून केवळ त्यांची हताशा दिसते. जेव्हा स्वतःचे अपयश लपवता येत नाही, तेव्हा विरोधकांवर चिखलफेक करणे ही काँग्रेसची जुनीच पद्धत आहे. प्रियांका वढेरांनी विचारले की, मणिपूरमध्ये निर्वस्त्र करण्यात आलेल्या महिलांना भाजपाने कधी विचारले का? वढेरांच्या या भूमिकेनंतर आता प्रश्न असा उपस्थित होतो की, काँग्रेसच्या काळात जेव्हा काश्मीरमध्ये काश्मिरी पंडितांच्या महिलांवर अत्याचार झाले, तेव्हा तुमच्या सरकारने त्यांना विचारले होते का? भंडाऱ्याच्या खैरलांजीमधील सुरेखा आणि त्यांची १७ वर्षीय मुलगी प्रियांका यांच्यावर बलात्कार करून रस्त्यावर निर्वस्त्र धिंड काढली होती, तेव्हा कोणाचं राज्य होतं; तेव्हा तुमची 'संवेदनशीलता' सुट्टीवर होती? तुम्ही आज मणिपूरवर बोलता. कारण तुम्हाला तिथे राजकीय पोळी भाजायची आहे. तुम्ही हाथरस आणि उन्नाववर बोलता. कारण तुम्हाला मतांचे राजकारण करायचे आहे. पण तुम्ही हे विसरताय की, देश आता जागरूक झाला आहे. जनतेला आता कळले आहे की, 'महिला सन्माना'चा वापर केवळ निवडणुकीत मते मिळविण्यासाठी केला जातोय. प्रियांका वढेरांनी आणि त्यांच्यासोबत उबाठा गटाच्या नेत्यांनी आधी स्वतःच्या घराचे छत तपासावे, जिथे अनेकदा महिलांवर अन्याय करणाऱ्यांची पाठराखण केली जाते. ज्यांचा स्वतःचा इतिहास महिलांचा अपमान करण्याचा आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा राहिला आहे, त्यांनी मोदीजींवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. जनता हे सर्व पाहत आहे आणि येणाऱ्या काळात अशा ढोंगी राजकारण्यांना त्यांची जागा दाखवून देण्यास ती सज्ज आहे.

९२७०३३३८८६

### छोटी छोटी खुशीया...!

आनंद कुठे आहे आणि कसा आहे याचे उत्तर तो आपल्या आत आहे आणि अतिशय सुंदर आहे. असे असले तरी प्रत्येकाची आनंदाची व्याख्या मात्र भिन्न भिन्न आहे. लहान मूल जसे लहान लहान गोष्टीत आनंदी असते तसे मोठे झाल्यावर जमले पाहिजे. मोठे होत असताना मात्र लहान लहान गोष्टीत नाही तर मोठ्या गोष्टीत तो शोधला जातो आणि मिळाला नाही तर मन निराश होतं. नुकत्याच एका कार्यक्रमात, जाहिरातीत 'छोटी छोटी खुशीयां' साजरी कशी आणि का करायची हे सांगितले. जीवन सुंदर आहे, पण त्यात चढ-उतार हे येणारच हे निश्चित. त्यात आनंदाचे प्रत्येक क्षण जपले पाहिजे. त्यात त्याला कुटुंब, मित्र-मैत्रिणी, नातेवाईकांनी सहभागी करता आले पाहिजे. असे हे आनंदाचे क्षण कायम स्मरणात राहतात. जे पुढील आयुष्यात सकारात्मक दृष्टिकोन देऊन जातात. आज आनंद आहे, उद्या दुःख आहे हे तर येणारच; पण त्या दुःखाच्या क्षणी हे आनंदाचे क्षण सावरून घेतात आणि त्यामुळे आपणही लगेच सावरतो. खरे तर माणसाचा स्वभाव दुःख कुरवाळण्याचा आहे आणि आनंद विसरण्याचा आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा उत्सव करता यायला हवा तरच जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध संपन्न होईल. प्रयत्न करायला काही हरकत नाही. वेळ लागला तरी जमेल हे निश्चित.

**संगीता वाईकर**/ नागपूर, ९९२२५०४७९४

### नव्या स्वरूपातील तरुण भारत

गेल्या काही दिवसांपासून तरुण भारत वाचताना एक वेगळेपण जाणवायला लागले. म्हणून जरा जुने अंक आणि नवे अंक बारकाईने बघितले आणि मग वृत्तपत्राच्या मांडणीत झालेला बदल लक्षात आला. मांडणी अधिक आटोपशीर, सुटसुटीत आणि आकर्षक झाली असल्याचे लक्षात आले. शीर्षकाचा फॉन्ट बदलला आहे. त्यामुळे ठळकपणे बातम्या सहज लक्षात येतात. या बदलांमुळे तरुण भारत अधिक वाचनीय झाला आहे. यासाठी तरुण भारतचे हार्दिक अभिनंदन.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी** /९८२२५६९६४८

## वाचक पत्रे

### निद्रिस्त पालकांनो जागे व्हा...!

एप्रिल महिन्याचा शेवट होत आला आहे. विदर्भ उकाड्याने हैराण आहे. नागरिकांच्या आरोग्यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होत आहे. तरीही शाळा अजूनही सुरू आहेत. पालकांचे आपल्या मुलांकडे लक्ष नसते. मुले शाळेतून घरी येताना डोक्याला काहीही न बांधता उन्हातान्हात येतात. परिणामी ते आजारी पडतात. पालक मात्र आता शाळा बंद करावी यासाठी काहीही भूमिका घेताना दिसत नाही. परिणाम लहान मुलांना भोगावा लागत आहे. पालकांनो.. वेळीच जागे व्हा. शाळा संचालक आपली फी पूर्ण करण्यासाठीच इतक्या उन्हात शाळा सुरू ठेवत आहेत, हे लक्षात येत नाही का तुमच्या? मुले आजारी पडत असतानादेखील तुम्ही त्याकडे कानाडोळा का करताहात? एका पालकाने मागणी केली तर ती पूर्ण होत नाही, पण अख्खा पालक वर्ग पेटून उठला तर शाळेला मागणी करावेच लागते. जरा डोळे उघडा आणि आपल्या मुलांना या प्रचंड उन्हापासून वाचवा.

**अपर्णा अग्निहोत्री** / नागपूर

### प्रेरणादायी स्तुत्य भगवा उपक्रम

पुणे शहरात सकाळी आपण घरातून बाहेर पडल्यावर कोणत्याही मोठ्या सिग्नलला जरा थांबलो असता एक सुमधुर, स्फूर्तिदायी गाण्याची धून सहजच कानावर पडते. ती ऐकून आपणही आपसूकच ती धून मनाशी गुणगुणू लागतो. ज्या पराक्रमाने छत्रपती शिवाजी राजेंनी वाघनखांनी अफजल खानाचा कोथळा बाहेर काढून त्या हिरव्या कपटी देशद्रोह्याचा वध केला त्या शौर्याचे गुणगान गाणारा (अफजल खान वधाचा पोवाडा) पुणे महापालिकेच्या वतीने सिग्नलला सीसीटीव्ही, विद्युत खांबांवरील ध्वनिवर्धकांवरून सगळ्यांना ऐकवला जातोय. क्षणभरात सारा रोमांचकारी इतिहास आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो व एक प्रेरणेची, शौर्याची, स्फूर्तिदायी वीररसाची भगवी लकेर अंगातून सळसळून जाते. कळत-नकळत उराशी शिवरायांच्या त्या प्रचंड तेजोमय शौर्याचा अभिमान जागृत होतो. खरोखरीच सध्या जो हा एक प्रेरणादायी स्तुत्य भगवा उपक्रम राबविला जातोय तो कौतुकास पात्र आहे.

**आनंद बेंद्रे**/ पुणे

### सोन्याचे अंडे देणारी कोंबडी

नवीन रस्ते करणे व काही महिन्यातच त्या रस्त्याला परत खड्डे पडणे; लागलीच लाखांची टेंडर काढणे ही लाखाची गोष्ट सर्वसामान्य जनतेस काही नवीन नाही. तंत्रज्ञान एवढे विकसित झाले, मग चांगले रस्ते विकसित करायचे तंत्रज्ञान खरंच अवघड आहे का? महामार्ग असो, शहरी रस्ते असो, खेड्यापाड्यातील रस्ते असोत की गल्लीबोळ. कुठेही प्रवास करताना खड्डे कायमच आपल्या सोबतीत असतातच. पावसाळ्यात तर खड्ड्यांचे प्रताप प्रचंड असतात. सर्वसामान्यांसाठी खड्डे म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. शारीरिक व्याधी जडताहेत. प्रवासाचा वेळ प्रचंड वाढतो. रस्ते तयार करणे व त्याची दुरुस्ती करणे म्हणजे संबंधितांसाठी सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच आहे.

**लोकेश बापट**/ पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सरकारी कर्मचारी चार दिवसांपासून बेमुदत संपावर

## जिल्ह्यातील नागरिकांची शासकीय कामे खोळंबली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने १ नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित पेन्शन योजना, रिक्त पद भरती, बाह्यस्रोताद्वारे भरती बंद, आदी १८ मागण्यांसाठी २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिकांची शासकीय कामे खोळंबली आहेत.

सोलापुरातील कर्मचाऱ्यांनी आज चौथ्या दिवशी पुनम गेट येथे दहा ते दोन या वेळेत निदर्शने व सरकारविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी जुनी पेन्शन लागू करा, कंत्राटीकरण रद्द करा,आदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. भर उन्हात देखील महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी झालेल्या सभेत पाटबंधारे विभागाचे ज्योतीराम शिंदे, आयटीआय बार्शीचे बसवराज मोटे, संघटक किशोर साळवे, राज्य कामगार विमा योजनेचे प्रकाश चव्हाण, शासकीय तंत्रनिकेतनचे विटकर, महसूल संघटनेचे



रवी नष्टे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे काशिनाथ औरसंग, आयटीआय निदेशक संघटनेचे विशाल भांगे, नर्सेस फेडरेशनचे राम फलफले, पोलीस कार्यालयीन कर्मचारी संघटनेचे दीपक पुजारी यांनी मनोगत व्यक्त केले.

निमंत्रक अशोक इंदापुरे यांनी हा संप सरकारने लादला असून, सात महिन्यापासून संघटना सातत्याने विविध आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. बेमुदत संपाची नोटीस देखील दिली. परंतु कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे नाईलाजाने संप करावा लागत असल्याचे सांगितले. हा प्रश्न केवळ मुख्यमंत्रीच सोडवू शकत असल्याम ुळे त्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी बैठक घेऊन न्याय द्यावा, अशी म ागणी केली. राज्यभरात संपाची दखल आमदार सत्यजित तांबे वगळता अन्य कोणाही आमदाराने घेतली नाही याबद्दल कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

संपात सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, सहकार खाते, कोषागार पोलीस कार्यालयीन कर्मचारी संघटना, नर्सेस फ्रेडरेशन, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना सिव्हील, आय टी आय कर्मचारी संघटना व निदेशक संघटना' मेडिकल कॉलेज कर्मचारी संघटना' राज्य काम गार विमा हॉस्पीटल सघटना, शासकीय तंत्रनिकेतन कर्मचारी संघटना, भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, उच्चशिक्षण विभाग महिती कार्यालय, अन्न औषध विभाग् भूजल संरक्षण विभाग, वस्रोद्योग, लेखा परीक्षण आर्दीसह इतर काही कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी १०० टक्के सहभाग घेऊन संप सुरूच ठेवला.

सर्व कर्मचाऱ्यांचे समन्वय समितीचे निमंत्रक अशोक इंदापुरे, अध्यक्ष शंतनू गायकवाड, राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटना अध्यक्ष राजीव साळुंखे, सरचिटणीस अमृत कोकाटे, कोषाध्यक्ष नरेश बोनाकृती, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, संघटक किशोर सावळे यांनी आभार मानले. महाराष्ट्र राज्य कंत्राटी कर्मचारी संघटनेचे सचिन जाधव, जिल्हा परिषद लिपिक कर्मचारी संघटनेचे अविनाश गोडसे, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे दिनेश बनसोडे यांनी संपास पाठिंबा जाहीर केला.

## महत्वाचे...

### अल्पवयीन मुलीवर विनयभंग अॅट्रॉसिटी पॉक्सोप्रकरणी जामीन मंजूर

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला आहे. फिर्यादीचे तक्रारीनुसार ती व तिची मुलगी दि. ४ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता कपडे पुणे धण्यासाठी तळ्यावर गेले होते. कपडे धुऊन दुपारी तीन वाजता ती घरी आली असता मुलगी घरी दिसून आली नाही. फिर्यादीने आजूबाजूला शोध घेतला. शेखच्या वीटभट्टीवर गेल्यावर मुलगी तिथे दिसून आली. तिने आरोपीस विचारले असता आरोपीच्या घरा पाठीमागून फिर्यादीची मुलगी पळत आली. फिर्यादीने मुलीला तू इथे कशी आल्याबाबत विचारले असता तिने तू धुणे धुण्यासाठी गेल्यानंतर आरोपी घरी आला. मला मोटरसायकलवर बसवून येथे घेऊन आला व माझ्याशी छेडछाड केल्याचे सांगितल्याची तक्रार दाखल केली होती आरोपीच्यावतीने बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांच्या कोर्टात ऍड. आयेशा शेख यांनी जामीन अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी आरोपीच्या वकिलांचा व सरकारी वकिलांचा युक्तिवाद ऐकून आरोपीस वीस दिवसात जामीन मंजूर केला. याप्रकरणी आरोपीच्यावतीने ऍड. आयेशा शेख यांनी काम पाहिले.

### रिक्षाची दुचाकीला धडक; दोन तरुण जखमी

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

ऑटो रिक्षाने धडक दिल्याने दुचाकीवरील दोन तरुण जखमी झाल्याची घटना कुमठे गावाजवळ शुक्रवारी २४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता घडली. सागर अंबादास कांबळे (वय २५ वर्ष )आणि प्रतीक लक्ष्मण खडसोडे ( वय २३ वर्ष, दोघे रा. बेघर सोसायटी , कुमठा नाका सोलापूर ) अशी जखमी तरुणांची नावे असून ते दोघे शुक्रवारी सकाळी सोरेगाव कडून कुमठे गावाकडे दुचाकीवरून डबल सीट जात होते. कुमठे गावाजवळ समोरून येणारी रिक्षा (क्र एम एच १३ इ एफ ३९१२ ) ने धडक दिली . यात दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ गणेश कांबळे यांनी सकाळी दाखल केले.

### उधारीने पेट्रोल का भरत नाही म्हणून तरुणास चौघांकडून मारहाण

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

उधारीने पेट्रोल का भरत नाही असे म्हणून एका पंपावरील तरुणाला चार जणांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथील अभिनव हायवे स्टेशन पेट्रोल पंपावर गुरुवारी २३ एप्रिल रोजी रात्री घडली.हर्षवर्धन सुनील भांगे ( वय २३ वर्ष , रा. शेटफळ, तालुका मोहोळ ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो गुरुवारी अभिनव हायवे स्टेशन पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल भरत असताना उधार पेट्रोल का भरत नाही असे म्हणून त्याला शिवाजी पवार, अक्षय पवार, रोहित पवार व राहुल पवार यांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मार लागल्याने मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात शुक्रवारी दुपारी तो स्वतः दाखल झाला.

### सर्पदंश झालेल्या नळदुर्गच्या महिलेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

घरात सर्पदंश झालेल्या नळदुर्ग येथील महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजता मृत्यू झाला. बिस्मिल्लाबी बाबासाहाब नदाफ (वय ५१ वर्ष ,राहणार नळदुर्ग) असे त्या मयत महिलेचे नाव आहे. त्या २२ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता राहत्या घरात मध्ये काम करीत असताना त्यांना सापाने चावा घेतला होता . त्यामुळे त्यांना सोलापूरच्या एका खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी दुपारी दाखल करण्यात आले असता सदर महिलेचा अडीच तासात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### कळमण येथे ५४ वर्षीय इसमाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**



अज्ञात कारणावरून एका ५४ वर्षीय इसम ाने घरातील छताच्या लाकडीवाशाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण येथे आज शुक्रवारी सायंकाळी साडेचार वाजता उघडकीस आली. राजेश नवनाथ म ाळी ( वय ५४ वर्ष राहणार कळमण ) असे त्या मयत इसमाचे नाव आहे .घरातील सर्व लोक आज दुपारी कामानिमित्त बाहेर गेले असताना राजेश यांनी अज्ञात कारणावरून घरामध्ये गळफास लावून घेतला .सायंकाळी चार साडेचार वाजेच्या दरम्यान घरचे लोक घरी परतले तेव्हा तेव्हा ही घटना उघडकीस आली . ही माहिती समजतात सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार पी एन महिंद्रकर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी सात वाजता दाखल केला . मयत राजेश यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# शाश्वत शेतीसाठी हिरवळीची खते आवश्यक : डॉ. रणशूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

शेतकऱ्यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा योग्यरित्या वापर केल्यास पीक उत्पादनात वाढ होऊन जमिनीचे आरोग्य जपण्यास मदत होऊन शेतकऱ्यांचा रासायनिक खतांवर होणारा खर्च कमी होतो. तरी शेतकऱ्यांनी हिरवळीच्या खताचे महत्त्व जाणून त्याचा वापर व्यापक प्रमाणात आपल्या शेतीत करावा. तसेच शेतकऱ्यांनी माती परीक्षणावर आधारित एकात्मिक पद्धतीने खतांचे व्यवस्थापन केल्यास पीक उत्पादनावरील खर्चात बचत होते; अशी महत्वपूर्ण माहिती डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली.

संतुलित खतांचा वापर जनजागृती अभियानांतर्गत दि. २४ एप्रिल २०२६ रोजी मौजे तांबोळे, तालुका मोहोळ येथे शाश्वत शेतीसाठी हिरवळीची खते व पीक अवशेष पुनर्वापर बाबत शेतकऱ्यांसाठी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन विभागीय कृषी संशोधन केंद्र, सोलापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी केल्यानंतर ते शेतकऱ्यांशी संवाद साधत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मोहोळचे तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे उपस्थित होते.

या जनजागृती अभियानात वरिष्ठ शास्त्रज्ञ (मृदशास्त्र) डॉ.



आदिनाथ ताकटे यांनी एकात्मि क अन्नद्रव्य व्यवस्थापनामध्ये हिरवळीच्या खतांचे महत्त्व यावर मार्गदर्शन करताना जमिनीचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी व उत्पादकता वाढवण्यासाठी हिरवळीच्या खताचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले. तर कृषी हवामान शास्त्रज्ञ डॉ. शशीशेखर खडतरे यांनी हिरवळीच्या खतांची पिके व लागवड तंत्रज्ञान यावर म ार्गदर्शन केले. तसेच ऊस पिकांसाठी हिरवळीच्या खतांचे महत्त्व अत्यंत सोप्या भाषेत शेतकऱ्यांना सांगितले. वरिष्ठ शास्त्रज्ञ, (मृद व जलसंधारण अभि.) डॉ. सुहास उपाध्ये यांनी जमिनीची धूप थांबवण्यासाठी हिरवळीच्या खतांचे महत्त्व यावर विस्तृत विवेचन केले. अति पावसाद्वारे जमिनीचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी हिरवळीची पिके किती महत्त्वाची आहेत हे त्यांनी विशद केले. प्रमुख अतिथी निगडे यांनी खरीप हंगामापूर्वी हिरवळीची पिके अत्यंत महत्त्वाची असून, आपली माती जिवंत ठेवावयाची असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने हिरवळीच्या पिकांचा वापर केल्यास २५ ते ३० टक्के खर्चात बचत होऊ शकते असे विशद केले. कार्यक्रम ासाठी तांबोळे येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रगतशील शेतकरी बाबासाहेब चव्हाण यांनी हिरवळीच्या पिकांचे बियाणे कृषी विभागाकडून मि ळाल्यास शेतकरी मोठ्या प्रमाणात लागवड करतील असे नमूद केले. प्रास्ताविक डॉ. आदिनाथ ताकटे यांनी तर आभार मंडल कृषी अधिकारी सुहास कौलगे यांनी मानले.



सोलापूर : जक्कल मळा सात रस्ता येथे श्री शंकर महाराज पुण्यतिथी सोहळा शुक्रवारी उत्साहाने पार पडला. त्याप्रसंगी मंदिराला फुलांची सजावट करण्यात आली होती.

**नावात बदल**

माझे नांव **रमेश भरत फत्तेवाले** असे आहे. परंतु माझ्या पासपोर्टमध्ये नजरचुकीने **रमेश भरतसिंग फत्तेवाले** असे झालेले आहे. तरी **रमेश भरत फत्तेवाले** व **रमेश भरतसिंग फत्तेवाले** या दोन्ही नांवाचे मी एकच व्यक्ती आहे.

**नावात बदल**

माझे नांव **भरत भगवनसिंग फत्तेवाले** असे आहे. परंतु माझ्या पासपोर्टमध्ये नजरचुकीने **भरतसिंग भगवनसिंग फत्तेवाले** असे झालेले आहे. तरी **भरत भगवनसिंग फत्तेवाले** व **भरतसिंग भगवनसिंग फत्तेवाले** या दोन्ही नांवाचे मी एकच व्यक्ती आहे.

**नावात बदल**

माझे नांव **केशरबाई भरत फत्तेवाले** असे आहे. परंतु म ाझ्या पासपोर्टमध्ये नजरचुकीने **केशरबाई भरतसिंग फत्तेवाले** असे झालेले आहे. तरी **केशरबाई भरत फत्तेवाले** व **केशरबाई भरतसिंग फत्तेवाले** या दोन्ही नांवाचे मी एकच व्यक्ती आहे.

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ११०/२०२५

१. सानिया सैफअली बागवान (अर्जदार)
रा. गणेश नगर अकलूज ता. माळशिरस
(असल्यास, तर्फे वकीलमेघराज महेश आडके)

**विरुद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
तथा मुख्याधिकारी, न.प. वैराग (गैरअर्जदार)

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी आयनुर सैफअली बागवान, रा. गणेश नगर अकलूज ता. माळशिरस यांचा मौजे वैराग गोवर्धन हॉस्पिटल येथे वैराग ता. बार्शी या ठिकाणी दिनांक रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदणीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी आयनुर सैफअली बागवान यांचा दिनांक रोजी मौजे वैराग गोवर्धन हॉस्पिटल येथे वैराग ता. बार्शी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही /-
(एफ. आर. शेख)
तहसिलदार बार्शी

**NOTICE**

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

**Unaudited Half Yearly Financial Results of the Schemes of NJ Mutual Fund ("the Fund") for the half year ended March 31, 2026**

Investors may note that in accordance with Regulation 59 of the SEBI (Mutual Funds) Regulations, 1996, read with SEBI circulars issued in this regard from time to time, the unaudited half-yearly financial results of the schemes of NJ Mutual Fund for the half year ended March 31, 2026, has been hosted on the website of the Fund i.e www.njmutualfund.com in a user-friendly and downloadable format (spreadsheet) and on the website of Association of Mutual Funds in India ("AMFI") i.e. www.amfiindia.com.

For NJ Asset Management Private Limited
Investment Manager of NJ Mutual Fund
Sd/-
Vineet Nayyar
Director & Chief Executive Officer
(DIN: 10690316)

Date: April 24, 2026
Place: Mumbai

**For further details, please contact:** NJ Asset Management Private Limited (CIN U67100GJ2005PTC046959) **Registered office:** Block no. 601, 3rd floor, C Tower, Udhna Udyognagar Sangh Commercial Complex, Central Road No.10, Udhna. Surat - 394210. Gujarat. Telephone Number – 0261 6715601. **Corporate office:** Unit no. 101A, 1st floor, Hallmark Business Plaza, Bandra (East). Mumbai – 400051. Telephone number: 022 68940000 /1860 500 2888 / 040-49763510. **Email id:** customercare@njmutualfund.com **Website:** www.njmutualfund.com

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की,

जि. सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील मिळकत गट नं. ९४२/२ यापैकी प्लॉट नं. १६ याचे क्षेत्रफळ ४०७.१६ चौ.मी., याचा बिनशेती आकार रु. २६८-०० पैसे आहे. याचे मोजमाप पुर्व बाजु मी. २२.००, दक्षिण बाजु मी १७.३०, पश्चिम बाजु मी २४.४० व उत्तर बाजु मी. १७.८० यांसी चतु:सिमा पुर्वेस-लागु गट नं. ९४१, दक्षिणेस-लागु गट नं. ९४२/२, पश्चिमेस-बगिचा व उत्तरेस ९.०० मीटर रुंदीचा रस्ता याचे वागणुक व पाणी उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे येणेप्रमाणे बिनशेती प्लॉट मिळकत आतील तदंगभुत वस्तुसह वहिवाटीच्या हक्कासह

यात वर्णन केलेला प्लॉट मिळकत ही श्री महेश विलास जाधव, सौ. शारदा सोमनाथ सावंत, श्री मनोज विलास जाधव यांचे मालकी वहिवाटीची असून सदर प्लॉट मालकांनी सदरची मिळकत आमचे अशिहास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून तशी बोलणी करुन तसा लेखी ठराव केलेला आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिहास दिलेला आहे.

तरी सदर प्लॉटबाबत अन्य कोणाचे गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, अॅटचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत खालीलपत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर प्लॉट हे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरून आमचे अशील सदर प्लॉट मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार करतील मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे ही जाहीर नोटीस दिली, तारीख : २४/०४/२०२६.

(सही)
(अशिल)

(सही)
श्री. रोहन रणजीत स्वामी (ॲडव्होकेट)
जिल्हा व सत्र न्यायालय आवार,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. नं. ८२३७५०५००८
अशिला तर्फे ॲडव्होकेट

**सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलुज ता. माळशिरस जि. सोलापूर**

**जाहीर अंतिम फेर लिलाव**

तमाम लोकांस/जनतेस कळविणेत येते की, खालील नमुद केलेल्या थकबाकीदार/जामिनदारांकडून सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर या संस्थेच्या थकबाकी वसुलीपोटी त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या त्यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम १०७ (१०) अन्वये जप्त केलेली आहे. सदरहु मिळकत खाली नमुद केलेल्या दिवशी ठिकाणी खाली सही करणारे वसुली व विक्री अधिकारी सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर यांचे समक्ष जसे आहे तसे या तत्वानुसार जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदारांचे नाव | पत्ता | मिळकतदाराचे नाव | मिळकत ठिकाण | मिळकत क्रमांक | क्षेत्र हे.आर/चौ.मी. | दि. २८/०२/२०२६ अखेर येणे | फेर लिलाव दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **सुजाता प्रमोद क्षिरसागर**<br>जा. १) किर्ती प्रमोद क्षिरसागर<br>जा. २) जैनुद्दिन अकबर शेख<br>जा. ३) अनिल विनायक माने | अकलूज<br>अकलूज<br>अकलूज<br>अकलूज | प्रमोद बाबूराव क्षिरसागर (संमतीदार) | अकलूज ता. माळशिरस | ९६/१/ब/२/प/५ | १८५.९७.०० हे.आर. चौ.मी. | ६८८५३०/- | ११/०५/२०२६ वार : सोमवार |
| २ | **सौ. महानंदा नागनाथ जमदाडे**<br>जा. १) शांतय्या इरय्या हिरेमठ<br>जा. २) शिवानंद धोंडीराम खताळ | महाळूंग<br>अकलूज<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे | महाळूंग ता. माळशिरस | ८७५/१<br>८८७/१ | १.६० हे.आर<br>०.५७ हे.आर | २३४५९१८/- | ११/०५/२०२६ वार : सोमवार |
| ३ | **राजेंद्र नागन्नाथ जमदाडे (मयत) वारस महानंदा नागन्नाथ जमदाडे व नागन्नाथ माधव जमदाडे**<br>जा. १) हनुमंत निवृत्ती यादव<br>जा. २) धोंडीराव महादेव खताळ | महाळूंग<br>बिजवडी<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे व नागनाथ महादेव जमदाडे | महाळूंग ता. माळशिरस | ८७५/२ | ३.०० हे.आर | २१९८१५६/- | ११/०५/२०२६ वार : सोमवार |
| ४ | **माधव तुकाराम जमदाडे (मयत) वारस**<br>१. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागन्नाथ माधव जमदाडे<br>२. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे<br>जा. १) महानंदा नागन्नाथ जमदाडे<br>जा. २) शिवानंद धोंडीराम खताळ | महाळूंग<br>महाळूंग<br>२१ चारी माळीनगर | १. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागनाथ माधव जमदाडे<br>३. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे | महाळूंग ता. माळशिरस | ८८७/२ | ३.०० हे.आर | २३०८४५१/- | ११/०५/२०२६ वार : सोमवार |

**लिलावाचे ठिकाण** : सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**टिप -** लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील. कोणत्याही कारणाशिवाय लिलाव रद्द व तहकूल करण्याचा अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवले आहे.

**दिनांक : २५/०४/२०२६**
**ठिकाण : अकलूज**

शिक्का

सही/-
वसुली व विक्री अधिकारी
सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.
अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.


मो. ९६७३१६१६९०/ ८९८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## महत्त्वाचे

### शांभवी, दिव्यांशूचा सुवर्णभेद



**कैरो** : इजिप्तमधील कैरो येथे शुक्रवारी पार पडलेल्या आयएसएसएफच्या कनिष्ठ विश्वचषक (रायफल/ पिस्तूल/ शॉटगन) नेमबाजी स्पर्धेत, भारताच्या १० मीटर एअर रायफल मिश्र संघातील जोडी - शांभवी क्षीरसागर व दिव्यांशू दिवांगन - यांनी ४९९.९ या कनिष्ठ जागतिक विक्रमी गुणांसह विजेतेपद पटकावले. या विजयासह भारताने या स्पर्धेतील आपले चौथे सुवर्णपदक निश्चित केले. या जोडीने यापूर्वी पात्रता फेरीत एकत्रित ६३२.० गुणांसह अव्वल स्थान पटकावले होते. चीन तैपेईच्या त्साई चिएह-यिंग आणि चेन यू-आन या जोडीने ४९८.३ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर फ्रान्सच्या टिफेन पोमेस आणि गॅस्पार्ड लेस्युर या जोडीने ४३४.४ गुणांसह कांस्यपदक मिळवले. कनिष्ठ मुलांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल प्रकारात, समीरने पात्रता फेरीत ५७३ गुणांची कामगिरी करत अंतिम फेरीत स्थान मिळवले; या कामगिरीमुळे त्याला दुसरे स्थान प्राप्त झाले होते. ■

### तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यास तयार : ट्रिस्टन स्टब्स

**नवी दिल्ली** : जर संघाची मागणी असेल तर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यास आपली कोणतीही हरकत नाही. मी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आनंदाने तयार आहे, असे दिल्ली कॅपिटल्सचा मधल्या फळीतील फलंदाज ट्रिस्टन स्टब्स याने म्हटले आहे. आगामी पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात जर त्याला फलंदाजीच्या वरच्या फळीत स्थान मिळाले, तर कठीण प्रसंगी संघाचा डाव सावरण्याचा त्याचा पूर्वीचा अनुभव त्याला खूप उपयुक्त ठरेल. सहा सामन्यांतून तीन विजय मिळवणाऱ्या दिल्ली संघाचे लक्ष या स्पर्धेतील आपल्याला कामगिरीतील विसंगती दूर करण्यावर असेल. लखनौ व बंगळुरूविरुद्धच्या सामन्यांमध्ये दिल्लीला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावताना दाखवलेल्या शांत आणि संयमी वृत्तीमुळे स्टब्सने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या दोन्ही सामन्यांत त्याने अनुक्रमे ३९ (नाबाद) आणि ६० (नाबाद) धावांची खेळी केली होती. एकूणच, स्टब्सने सहा डावांमध्ये १९६ धावांची कमाई केली असून, त्याची सरासरी ६५.३ आणि स्ट्राईक रेट १३७ इतका राहिला आहे.

### साई सुदर्शनने मोडला ख्रिस गेलचा विक्रम

**बंगळुरू** : येथे शुक्रवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या आयपीएल सामन्यात गुजरात टायटन्सचा सलामीवीर साई सुदर्शनने आयपीएलमधील आपल्या २ हजार धावा पूर्ण केल्या. साई सुदर्शनने कृणाल पांड्याच्या गोलंदाजीवर डीप थर्ड मॅनच्या दिशेने अपरकट मारत थेट षट्कार वसूल केला आहे. त्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर, त्याने अधिक पारंपारिक पर्याय निवडला आणि त्या फिरकी गोलंदाजाला स्लॉग-स्वीप मारत आणखी एक षट्कार ठोकला. या षट्कारासह त्याने आयपीएलमध्ये आपल्या २००० धावांचा टप्पाही पूर्ण केला. अवघ्या ४७ डावांमध्ये हा टप्पा गाठताना, त्याने आयपीएलमध्ये सर्वात जलद २००० धावा करण्याचा विक्रम आपल्या नावे केला आहे. त्याने ख्रिस गेलचा विक्रम एका डावाने मोडीत काढला आहे. आरसीबीविरुद्धच्या या सामन्यात साई सुदर्शनने दमदार शतकही झळकावले.

### विश्वचषकासाठी अमेरिकेत जाणाऱ्या प्रवाशांना इशारा

**न्यूयॉर्क** : २०२६ च्या विश्वचषकासाठी अमेरिकेत प्रवास करणाऱ्या पर्यटकांना इतर मानवाधिकार उल्लंघनांसोबतच मनमानी अटक किंवा हद्दपारीचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा मानवाधिकार गटांनी दिला आहे. मेक्सिकोमध्ये ही क्रीडा स्पर्धा सुरू होण्याच्या दोन महिन्यांपेक्षा कमी कालावधीपूर्वी जारी करण्यात आलेल्या या इशाऱ्यावर अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियन आणि एनएएसीपी यांसारख्या अनेक गटांनी स्वाक्षरी केली आहे. ट्रम्प प्रशासनाकडून स्थलांतरितांवर होणारी व्यापक कारवाई आणि वांशिक अल्पसंख्याक व एलजीबीटीक्यू समुदायाच्या सदस्यांसाठी असलेल्या संघीय संरक्षणाची होणारी घसरण, या पृष्ठभूमीवर ही स्पर्धा आयोजित केली जात आहे. या सूचनेनुसार, चाहते, खेळाडू, पत्रकार आणि इतर अभ्यागतांना स्थलांतरितांच्या अटकेच्या ठिकाणी ठेवल्यास त्यांना वांशिक भेदभाव, इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी किंवा क्रूर किंवा अमानवीय वागणुकीचा धोका असू शकतो. स्थलांतरित समुदाय, वांशिक आणि जातीय अल्पसंख्याक गट आणि व्यक्तींना अमेरिकेत प्रवास करताना 'गंभीर हानी पोहोचण्याचा सर्वाधिक धोका' आहे. ■

# साई सुदर्शनचे दमदार शतक

## गुजरात टायटन्स ३ बाद २०५ ● शुभमन गिलसोबत १३२ धावांची सलामी भागीदारी



बी. साई सुदर्शन
धावा १००
चेंडू ५८
चौकार ११
षट्कार ५

◆ **बंगळुरू, २४ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्धच्या सामन्यात गुजरात टायटन्सचा सलामीवीर बी. साई सुदर्शनने बहारदार फलंदाजी करीत १०० धावांची देखणी शतकी खेळी केली. त्याच्या या शतकाच्या बळावर गुजरात टायटन्सने २० षटकांत ३ बाद २०५ धावा उभारल्या आणि आरसीबीसमोर विजयासाठी २०६ धावांचे लक्ष्य ठेवले.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. परंतु अपेक्षेप्रमाणे त्यांच्या गोलंदाजांना कामगिरी करता आली नाही. गुजरात टायटन्सचा सलामीवीर बी. साई सुदर्शन व कर्णधार शुभमन गिलने आरसीबीच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत चौफेर फटकेबाजी केली. ही सलामी जोडी फोडण्यासाठी आरसीबीने सहा वैविध्यपूर्ण गोलंदाजांचा वापर केला, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. १३ व्या षटकांदरम्यान गिल सुयश शर्माच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. त्याचा आखुड टप्प्याचा चेंडू फटकावण्याच्या नादात त्याने पडिक्कलकडे सोपा झेल सोपविला. शुभमन गिलने २४ चेंडूंत २ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ३२ धावांची खेळी केली. गिलने साई सुदर्शनसोबत ७६ चेंडूंत १३२ धावांची शतकी भागीदारी केली.

**सुदर्शन १०० धावांवर बाद**

बी. साई सुदर्शनने जोस बटलरच्या साथीने आपले वैयक्तिक शतक साजरे केले, मात्र शतक पूर्ण होताच तो हेझलवुडच्या गोलंदाजीला बळी पडला. हेझलवूडच्या हार्ड लेंथ चेंडूवर सुदर्शनने पुल शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला चेंडूचा अंदाज घेण्यास उशीर झाला आणि परिणामी त्याने गोलंदाजाकडेच झेल सोपविला. बी. साई सुदर्शनने ५८ चेंडूंमध्ये १०० धावा काढल्या, यात त्याने ११ चौकार व ५ षट्कार खेचलेत. साई सुदर्शन बाद झाला, तेव्हा गुजरातने १५.५ षटकांत २ बाद १६० धावांचा टप्पा गाठला. पुढे जोस बटलर भुवनेश्वर कुमारच्या यॉर्करवर हेझलवूडकडून झेलबाद झाला. बटलरने १६ चेंडूंत २५ धावांची भर घातली. त्यामुळे डावाच्या अखेरच्या टप्प्यात धावांचा वेग वाढू शकला नाही. मात्र, वॉशिंग्टन सुंदरने आपल्या डावाची सुरुवात एक षट्कार आणि एका चौकाराने केली. त्याच्या साथीला जेसन होल्डर होता. या दोघांनी नाबाद खेळी करीत गुजरात टायटन्सला २० षटकांत ३ बाद २०५ धावा रचून दिल्या. सुंदर १९ धावांवर, तर होल्डर २३ धावांवर नाबाद राहिले.

आरसीबीकडून भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड व सुयश शर्मा या तिघांनाच प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळाले. ◂(वृत्तसंस्था)


# दिल्ली 'उडता पंजाब'ला रोखणार?

◆ **नवी दिल्ली, २४ एप्रिल**

येथील शनिवारी दुपारच्या सत्रात अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स व पंजाब किंग्स यांच्यादरम्यान १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामाचा ३५ वा साखळी सामना खेळविला जाणार आहे. अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स संघ सध्या फॉर्मात व गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या पंजाब किंग्सला या हंगामातील त्यांचा पहिला पराभव चखावू शकेल का?

प्ले-ऑफमधील स्थानाच्या दिशेने वाटचाल करत असताना श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्स आपल्या विजयाची मालिका कायम राखण्याचा प्रयत्न करेल.

कर्णधार श्रेयस अय्यरने आपल्या फलंदाजीच्या जोरावर पंजाब किंग्स संघाचे नेतृत्व आघाडीवरून केले आहे. शिवाय पंजाबचे आघाडीचे तिन्ही फलंदाज सातत्याने धावा काढत आहेत. त्यांच्या गोलंदाजांनीही एकसंध संघ म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. जरी दिल्ली कॅपिटल्सच्या बहुतेक फलंदाजांनीही चांगली कामगिरी केली असली, तरी त्यांची ही कामगिरी सामूहिक स्वरूपात झालेली नाही. फलंदाजीच्या तुलनेत गोलंदाजी विभागाने अधिक सरस कामगिरी केली आहे. मात्र, कुलदीप यादवचा सध्याचा फॉर्म ही अजूनही चिंतेची बाब झालेली आहे.




श्रेयस अय्यर — अक्षर पटेल

सध्या, दिल्ली संघ (६ गुण) गुणतालिकेत सहाव्या स्थानावर असून, त्यांनी सहा सामन्यांपैकी तीन सामन्यांत विजय मिळविला आहे. दुसरीकडे, पंजाब किंग्स संघ (११ गुण) सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असून त्यांनी सहापैकी पाच सामन्यांत विजय मिळविला असून या स्पर्धेतील अजिंक्य राहिलेला हा एकमेव संघ आहे.

या सामन्यात श्रेयस अय्यर हा प्रमुख फलंदाज ठरू शकतो. या हंगामात त्याने १८२.४५ च्या स्ट्राईक रेटने २०८ धावा केल्या आहेत. पंजाब किंग्सचे वेगवान गोलंदाज विजयकुमार वैशाख व अर्शदीप सिंगने या हंगामात प्रत्येकी सहा बळी मिळविले आहेत, तर मार्को जॅनसेनच्या नावावर पाच बळी जमा आहेत.


समीर रिझवी (२०९ धावा) आणि केएल राहुल (२०५ धावा) हे या हंगामात दिल्ली कॅपिटल्सचे आघाडीचे फलंदाज आहेत. या दोघांचाही स्ट्राईक रेट १५० पेक्षा अधिक राहिला आहे. लुंगी नगिदी (७ बळी) हा दिल्ली कॅपिटल्सचा सर्वोत्तम गोलंदाज ठरला आहे .

अरुण जेटली स्टेडियमवरील खेळपट्टी सामन्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात फिरकी गोलंदाजांना अनुकूल असते, परंतु सामना जसजसा पुढे सरकतो तसतशी ती फलंदाजांसाठी अधिक सोयीस्कर बनत जाते. सामना दुपारी सुरू होणार असल्यामुळे मधल्या षटकांमध्ये फिरकी गोलंदाजांना खेळपट्टीकडून काही प्रमाणात मदत मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, मैदानाचे आकारमान लहान असल्यामुळे फलंदाजांना मोठे फटके खेळण्यासही त्याचा फायदा होईल. ◂(वृत्तसंस्था)

**आजचे सामने**

**दिल्ली कॅपिटल्स वि. पंजाब किंग्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**राजस्थान रॉयल्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



'भारत रत्न' मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा शुक्रवारी ५३ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. आपल्या लाडक्या सचिनला शुभेच्छा देण्यासाठी त्याच्या मुंबईतील निवासस्थानी चाहत्यांनी गर्दी केली, तेव्हा सचिननेही त्यांच्यासोबत केक कापला व सेल्फी काढून घेतला

# राजस्थानची नशीब बदलण्याची धडपड

◆ **जयपूर, २४ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आपल्या घरच्या मैदानातील कामगिरीचा पुरेपूर फायदा उठवण्यास आणि नशीब बदलण्यास यजमान राजस्थान रॉयल्स उत्सुक आहेत.

गुणतालिकेत सध्या राजस्थान १० गुणांसह दुसऱ्या, तर हैदराबाद ८ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.

या हंगामात सातत्याच्या अभावामुळे अनेक चढ-उतार अनुभवलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाने गुणतालिकेत चौथे स्थान पटकावले आहे. सवाई मानसिंग स्टेडियमवर यजमान संघ आपल्यावर पूर्ण ताकदीनिशी तुटून पडेल, याची हैदराबाद संघाला पूर्ण जाणीव आहे.




रियान पराग — ईशान किशन

बहरात असलेल्या सनरायझर्स हैदराबादविरुद्ध १३ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात हैदराबाद संघाने राजस्थान रॉयल्स संघा पूर्णपणे वर्चस्व गाजवत त्यांचा दारुण पराभव केला होता, तेव्हा शनिवारी होणाऱ्या आयपीएल सामन्यात राजस्थान रॉयल्स आपल्या घरच्या मैदानावर हैदराबादविरुद्ध आपले वर्चस्व सिद्ध करण्यास आणि जुन्या हिशोबांचा बदला घेण्यास नक्कीच उत्सुक असेल, कारण या सामन्यात दोन्ही संघांचे लक्ष अत्यंत महत्त्वाच्या गुणांवर केंद्रित असणार आहे.


संघाच्या मनात कदाचित बदल्याची भावना असू शकते; कारण १३ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात हैदराबादने त्यांचा दारुण पराभव केला होता. त्या सामन्यात प्रफुल्ल हिंगे याने आपल्या अविश्वसनीय कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सला ५७ धावांनी दणदणीत विजय मिळवून दिला होताआणि त्याची ती कामगिरी आता आयपीएलच्या इतिहासातील एका अविस्मरणीय घटनेचा भाग बनली आहे. ◂(वृत्तसंस्था)

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ, कसोटीपटू सदानंद मोहोळ यांच्या पुतळ्यांचे आज पुण्यात अनावरण

## क्रीडाक्षेत्रातील पितापुत्रांना मामासाहेब मोहोळ शैक्षणिक संस्थेची अनोखी मानवंदना

**पुणे, दि. २४ एप्रिल-**

स्वातंत्र्यसेनानी व कुस्तीमहर्षी स्व. मामासाहेब मोहोळ व त्यांचे पुत्र कसोटीपटू स्व. सदानंद मोहोळ यांच्या अध्याकृती पुतळ्याचे अनावरण शनिवार २५ एप्रिल रोजी पुण्याजवळील मुळशीत होणार आहे. क्रीडामहर्षी पितापुत्रांना मामासाहेब मोहोळ शैक्षणिक संस्थेकडून अनोखी मानवंदना एकत्रितपणे दिले जाणार आहे.

नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान पुणे व मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ संस्थेने या समारंभाचे आयोजन केले आहे. हा समारंभ २५ एप्रिलला सकाळी ११ वाजता मुळशीतील पिरंगुट येथील मामासाहेब मोहोळ संस्थेच्या आयटीआय सभागृहात होणार आहे.

स्वर्गीय मामासाहेब यांच्या पुतळ्याचे अनावरण जेष्ठ विचारवंत माजी आमदार उल्हास दादा पवार यांच्या तर स्व.सदानंद यांच्या पुतळ्याचे व सभागृहाचे अनावरण कसोटीपटू व भारतीय क्रिकेट निवड समितीचे माजी अध्यक्ष चंदू बोर्डे यांच्या हस्ते होणार आहे. माजी खासदार अशोक मोहोळ, नानासाहेब नवले, बाळासाहेब गांजवे, दिलीप बराटे, संग्राम मोहोळ, कुणाल मोहोळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मामासाहेब व सदानंद यांचे कार्याचा आदर्श नवीन पिढीपुढे राहावा या उद्देशाने संस्थेने मामासाहेब मोहोळ यांचा पुतळा पिरंगुट येथील विद्यालयात बसविण्यात आला आहे.

**सदानंद मोहोळांच्या स्मृती जागणार**

सदानंद नामदेव मोहोळ हे भारताचे मध्यम-वेगवान गोलंदाज होते. ते १९६० ते १९७१ पर्यंत प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणाऱ्या मोहोळ यांनी १९६७ मध्ये भारतीय संघासोबत इंग्लंडचा दौरा केला होता. मोहोळ रिव्हर्स स्विंगमध्ये कुशल होते. त्यांच्या पुतळ्याचे अनावरण चंदू बोर्डे यांच्या हस्ते होणार असल्याने त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीला शनिवारी उजाळा मिळणार आहे.

# संजूच धोनीचा खरा वारसदार



◆ **चेन्नई, २४ एप्रिल**

वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात संजू सॅमसनने नाबाद शतक झळकावले, त्याबद्दल टी-२० क्रिकेट विश्वात त्याचे इतके कौतुक का केले जात आहे. चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) संघासोबतच्या आपल्या पहिल्याच हंगामात संजू सॅमसनने दोन शतके झळकावून आपणच कॅप्टन कूल एम.एस. धोनीचा खरा वारसदार आहे, हे सिद्ध करत आहे.

संजू सॅमसनने केलेली कामगिरी केवळ त्याच्या फलंदाजीतील पराक्रमापुरतीच मर्यादित नव्हती; तर, परिस्थितीनुसार आपल्या डावाची गती ठरवत व संयम बाळगत त्याने जो अनुकरणीय परिपक्वपणा दाखवला, तो अधिक वाखाणण्याजोगा होता.

सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याला या हंगामात अद्याप सूर गवसलेला नाही. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात त्याला चांगली सुरुवात मिळाली होती, परंतु पुन्हा एकदा त्या सुरुवातीचे रूपांतर एका मोठ्या धावसंख्येत करण्यात तो अपयशी ठरला आणि बाद झाला. चेन्नईला जेव्हा एका नेतृत्वाची गरज होती, तेव्हा कर्णधार ऋतुराजपेक्षा संजू सॅमसनच अधिक उठून दिसला. जेव्हा दुसऱ्या बाजूने सीएसकेचे फलंदाज बाद होत होते, तेव्हा जबाबदारी स्वीकारणे व परिस्थितीनुसार खेळणे आपल्यासाठी महत्त्वाचे होते.

कोणताही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन घेऊन मैदानात उतरण्याची गरज नसत. तसेच, मी असाच खेळतो किंवा मला हेच करायचे आहे असे स्वतःला सांगत आधीच काही ठरवून ठेवण्याचीही आवश्यकता नसते, असेही तो म्हणाला.माझ्याकडे असलेला अनुभव आणि माझ्यावर सोपवलेली जबाबदारी पाहता, सामन्याची परिस्थिती समजून घेणे आणि संघाची नेमकी काय मागणी आहे हे ओळखणे हे माझे कर्तव्य ठरते. संघाच्या गरजेलाच सर्वोच्च प्राधान्य देऊन, त्यानुसार माझ्या खेळाची आखणी करणे हेच माझे ध्येय असते, असे सॅमसनने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# क्रीडा लेखकाच्या भेटीने भारावले विद्यार्थी

## लेखक संजय दुधाणे यांचा शिरवळ जि.प शाळेत सत्कार

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

पुस्तकातील धड्यामधील लेखकाच्या प्रत्यक्ष भेटीने दक्षिण सोलापूरमधील शिरवळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी भारावून गेल्याचे चित्र आज दिसून आले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त शिरवळ शाळेने लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ६ इयत्तेच्या मराठी पाठ्यपुस्तकातील लेखक संजय दुधाणे यांनी विद्यार्थ्यांची थेट संवाद साधून ऑलिम्पिकचे महत्त्व विशद केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिरवळचे सरपंच शरणप्पा गौडनवरू यांच्या हस्ते संजय दुधाणे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच बसवराज पाटील. पंचपा शावळ, हणमंत हसाळे, रेवनसिद्ध पाटील, शिवानंद पाटील, चंद्राम जनगोंडे, राजकुमार कुसगले, विजयकुमार कुसगले, मुख्याध्यापक रमेश माशाळे, मल्लिनाथ पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.

ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव या पाठाचे लेखक असणाऱ्या संजय दुधाणे यांनी खाशाबांच्या ऑलिम्पिक यशाला उजाळा दिला. खाशाबांनी ऑलिम्पिकमध्ये देशासाठी जिंकलेले पहिले पदक आजही प्रेरणदायी आहे असे सांगून दुधाणे पुढे म्हणाले की, खाशाबांना पद्मविभूषण पुरस्कार अद्याप न मिळणे ही देशाची शोकांतिका आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर तरी खाशाबांना पद्म पुरस्कार देऊन त्यांच्या अभूतपूर्व कार्याचा गौरव केला पाहिजे.



# दयानंदचे निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बी. के. पुजारी यांना त्रिवेणी जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि.२४ एप्रिल -**

येथील दयानंद महाविद्यालयातील निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बी. के. पुजारी यांना कोल्हापूर जिल्ह्यातील उत्तूर येथील त्रिवेणी सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा संस्थेतर्फे त्रिवेणी जीवनगौरव पुरस्कार नुकताच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडी येथे हा पुरस्कार त्यांना ज्येष्ठ लेखक रामभाऊ देशपांडे आणि ॲस्टर आधारचे डॉ. अजित कुलकर्णी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेडेकर शिक्षण समूहाच्या अध्यक्षा अंजना रेडेकर या होत्या .याप्रसंगी पार्वती -शंकर संस्थेचे समूह प्रमुख विश्वनाथ करंबळी ,माजी जि.प. सदस्य उमेश आपटे, आजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष वसंतराव धुरे ,उत्तूर जिल्हा परिषदेचे सदस्य शिरीष देसाई, सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयाचे निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रकाश भोसले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दरम्यान प्रा .पुजारी यांनी आपल्या सेवा काळात नऊ शिवछत्रपती पुरस्कार विजेते विद्यार्थी घडविल्याबद्दल त्यांच्या कार्याचे मान्यवरांनी कौतुक करून त्यांचा यथोचित सन्मान केला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## कल्याण डोंबिवली भाजपा गटनेते कांबळे यांचा सत्कार

**कुर्डूवाडी, दि. २४ एप्रिल-**

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या गटनेते पदी शशिकांत कांबळे यांची निवड झाल्या बद्दल त्यांचा म्हैसगाव येथील जब्बार महाजन यांनी त्यांच्या कार्यालयात जाऊन सत्कार केलेला आहे. म्हैसगाव तालुका माढा येथील मूळ रहिवासी असलेले शशिकांत कांबळे हे कल्याण डोंबिवली येथे काही वर्षांपूर्वी कामानिमित्त गेले होते तेथे त्यांनीच तेथे त्यांनी आपल्या काम ाचे बस्तान बसवले व जनसंपर्क वाढवला या जनसंपर्काच्या जोरावरती त्यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नगरसेवक पदाची उमेदवारी दिली व ते प्रचंड मताने विजयी झालेले आहेत. कल्याण डोंबिवली येथे नगरसेवकाच्या झालेल्या बैठकीमध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या शिफारशी नुसार व नगरसेवकांनी केलेल्या मागणी नुसार सुहास कांबळे यांची महापालिकेत भाजपच्या नगरसेवकाच्या गटनेते पदी निवड करण्यात आली आहे. तसेच नुकतीच त्यांची नवी मुंबई महापालिकेच्या भाजपाच्या पक्ष निरीक्षक पदी निवड करण्यात आलेली आहे. यानिमित्त म्हैसगाव येथील त्यांचे बालपणाचे मित्र जब्बार शेठ महाजन यांनी त्यांचा कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये जाऊन सत्कार केलेला आहे. यावेळी त्यांच्या सोबत समीर कोरबू, दादा पटेल उपस्थित होते.

## बार्शीत गुटखा व सुगंधी तंबाखूवर धाड; ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

शहरातील रिंगरोड चौक, आगळगाव रोड परिसरातील एका पान शॉपवर अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ एप्रिल रोजी रात्री ९:१५ च्या सुमारास रिंगरोड चौक येथील मे. श्री गणेश पान शॉप'वर ही कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या अन्नपदार्थांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त रामानंद उमाशंकर स्वामी यांनी ही तक्रार दाखल केली. या छाप्यात पोलिसांनी विविध कंपन्यांचे प्रतिबंधित पदार्थ जप्त केले आहेत यामध्ये विमल पानमसाला, गोवा १००० (लाल), पानबहार पानमसाला, राजनिवास पानमसाला, शॉट ९९९ आणि शॉट लक्झरी च्युईंग टोबॅको यांचा समावेश आहे. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत साधारण ३२,०७२ रुपये इतकी आहे. या प्रकरणी दुकान मालक अक्षय दीपक सरकाळे (वय ३२, रा. झाडबुके मैदान, बार्शी) याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७४, २७५, १२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या विविध कलम ान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## उळे ब्रिजवरील अपघातातील काटी सावरगावच्या जखमी वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या काटी सावरगावच्या वृद्धाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी रात्री मृत्यू झाला.अर्जुन पांडुरंग डोलारे ( वय ६५ वर्ष , रा. काटी सावरगाव , ता तुळजापूर )असे त्या मयत वृद्ध व्यक्तीचे नाव आहे . ते १९ एप्रिल रोजी सायंकाळी मुलगा दत्तात्रय डोलारे ( वय ३७ वर्ष) याच्या मोटार सायकलवर मागे बसून पत्नी सुनंदा डोलारे ( वय ६० वर्ष) सह ट्रिपल सीट सोलापूर कडून काटी सावरगाव कडे तुळजापूर रस्त्यावरून निघाले असताना वाटेत उळे ब्रिज वर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धक्का मारला . त्यामुळे नियंत्रण सुटल्याने दुचाकी बाजू च्या दुभाजकाला धडकली . यात वरील तिघेजण जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता वृद्ध अर्जुन डोलारे यांचा गुरुवारी रात्री मृत्यू झाला. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## खर्चाला पैसे न दिल्याने मुलाकडून फिनेल प्राशन

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**



खर्चाला पैसे न दिल्याने एका तरुण मुलाने फरशी पुसण्याचे फिनेल पिल्याची घटना जुना विडी घरकुल येथे शुक्रवारी २४ एप्रिल रोजी घडली. प्रवीण मोहन कंदीकटला (वय ३५ वर्ष, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर ) असे त्या मुलाचे नाव असून त्याने शुक्रवारी सकाळी ११ वाजता राहत्या घरात पैसे मागितले असता घरच्यांनी त्याला पैसे दिले नाही. या रागाच्या भरात त्याने फरशी पुसण्याचे फिनेल पिले. त्रास होऊ लागल्याने त्याला आई अनिता यांनी उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## निधन वृत्त...

### संदीप जव्हेरी



**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

रेल्वे लाईन्स येथील रहिवासी संदीप अरविंदभाई जव्हेरी (वय ५४) यांचे शुक्रवार २४ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने संध्याकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, २ लहान भाऊ, पत्नी, २ मुली असा परिवार आहे. जव्हेरी ॲडव्हर्टायझिंग सर्विसेसचे ते संचालक होते. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. ते श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर सेंटर, भारती विद्यापीठ माजी विद्यार्थी, सेंट जोसेफ प्रशाला माजी विद्यार्थी, रोटरी क्लब, असे अनेक संस्थेवर ते कार्यरत होते. सोलापुरातील जाहिरात क्षेत्रातील सावा या संघटनेचे ते माजी अध्यक्ष होते.

# महिला, मुलींच्या छेडछाडीला आता बसणार आळा

**क्युआर कोड आणि व्हॉटसअप नंबरच्या माध्यमातून महिला, मुलींना घरबसल्या करता येणार पोलिसांकडे तक्रार दाखल : उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे**

### निर्भया पथकाच्या माध्यमातून रोडरोमिओ तसेच टवाळखोरांवर केली जाणार कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ एप्रिल -**







महिला आणि मुलींची टिंगलटवाळी, छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओ तसेच टवाळखोरांना जरब बसविण्यासाठी पंढरपूर पोलिसांकडून महिला, मुलींनी आता घरबसल्या व्हॉटसअप नंबर आणि क्युआरकोडच्या माध्यमातून संबंधित टवाळखोर, रोडरोमिओ विरुध्द तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिसअधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

या सुविधे संदर्भात माहिती देताना उपविभागीय पोलिस अधिकारी डगळेयांनी सांगितले की, पंढरपूर शहर आणि तालुक्यात ज्या तरुण,मुली तसेच महिला आहेत त्यांच्यानिदर्शनास एखाद्या महिले विरुध्द छेडछाड, शारीरिक त्रास,मानसिक त्रास, पाठलाग किंवाइतर पॉक्सो आणि अन्य कलमान्वये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची जी खबर आहे ती जर पोलिसांकडूनदिलेल्या क्युआर कोड आणि व्हॉटसअप (नंबर ११२) वर दाखल करण्याची सुविधा उपल्ब्ध करुन देण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे ज्या महिलां तसेच मुलींकडून दाखल झालेल्या तक्रारीसंदर्भात पोलिसांकडून पुर्ण गोपनियता पाळली जाणार आहे. तक्रारी नंतर संबंधित मुली आणि महिलांच्या परस्पर पोलिसांकडून टवाळखोर किंवा रोडरोमि ओं विरुध्द कारवाई देखील केली जाणार असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी डगळे यांनी सांगितले.

याबरोबरचनिर्भयापथकांमध्येवेगवेगळ्या टिम कार्यरत करुन शहर आणितालुक्यातील वेगवेगळी महाविद्यालये,शाळा तसेच शहर आणि तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांकडून ठरविण्यात जे हॉटस्पॉट आलेले आहेत त्या ठिकाणी पोहचुन जास्तीत जास्तपिडीत महिला, मुलीं पर्यंत प्रोॲक्टीव्हपणे पोहचण्याचे, त्यांची सुरक्षा करण्याचाआम्ही विश्वास देतो असेही यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डगळे यांनी सांगितले.

### तक्रार दाखल करणाऱ्यांचे नाव गोपनीय राहणार

पंढरपूर पोलिसांकडून सुरु करण्यात आलेल्या क्युआरकोड तसेच या व्हॉटसअपनंबर तक्रार दाखल करणाऱ्या महिला किंवा मुलींना कोणत्याही प्रकारे भिण्याचे कारण नाही. कारण यावर तक्रार दाखल करणाऱ्या महिला आणि मुलींची नावे उघड केली जाणार नसल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

**निर्भया पथकाची २०१३ मध्ये स्थापना, आता पुर्नरचना**

निर्भया फंडची २०१३ मध्ये स्थापना झाली. त्यानंतर संपुर्ण भारतभरनिर्भया पथक स्थापन झाले. २०२२ मध्ये महाराष्ट्रामध्ये पहिले निर्भया पथक सुरु झाले.त्यानंतर संपुर्ण महाराष्ट्रा मध्ये उपविभागीय स्तरावर निर्भया पथक सुरु करण्यात आले.पंढरपूर शहरातील निर्भया पथकाची ९ एप्रिल २०२६ रोजी पंढरपूर पोलिसांकडूनपुर्नरचना करण्यात आलेली आहे. या पथकात एक महिला अधिकारी, दोन महिला आणि दोन पुरुष कर्मचारी असे पाच जण कार्यरत असणारे आहेत.येथील पोलिस निरीक्षक रावण मँडम यांना येथील पथकाचे प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्यांच्या सोबत दोन महिला पोलिस तसेच दोन पुरुष पोलिस कर्मचारी देण्यात आलेले आहे. या बरोबरच या पथकासाठी एक स्वतंत्र वाहनांची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# बोरामणी येथील दगडी चक्रव्युहाचा 'हेरिटेज टुरिझम' अंतर्गत विकास करण्याची गरज

### जिल्हाधिकारी कार्तिकेयनही करणार लवकरच पाहणी

### पुरातत्व विभागाचा पाहणी अहवाल गेला शासनाकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

सोलापूरपासून जवळच असलेल्या बोराम णी वनक्षेत्रात भारतातील सर्वात मोठा आणि २,००० वर्षे जुना दगडी चक्रव्यूह गेल्या ४ महिन्यापूर्वी सापडला आहे. जवळपास १५ घेरे असलेली ही दुर्मिळ वर्तुळाकार रचना प्राचीन रोमन व्यापारी मार्गाशी संबंधित असू शकते; हा शोध देशातील पुरातत्व इतिहासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक जया वाहणे यांनी याची पाहणी करून त्याचा अहवालही शासन स्तरावर पाठविला आहे. दरम्यान, शासनाने बोरामणी येथील दगडी चक्रव्यूहाचा 'हेरिटेज टुरिझम' अंतर्गत विकास करण्याची मागणी जिल्ह्यातील जाणकार नागरिकांतून होत आहे. यामुळेच या चक्रव्युहाची पाहणी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस हे करणार असून, त्यांच्या पाहणीनंतरच तेही टुरिझम पॉईंट निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

### देशभरातील पुरातत्त्व अभ्यासकांसाठी होईल संशोधन केंद्र

सध्या हा अमूल्य ऐतिहासिक ठेवा उघड्या माळरानावर असल्याने मानवी हस्तक्षेपापासून याला मोठा धोका आहे. त्याचे मूळ स्वरूप टिकवून ठेवण्यासाठी संरक्षक कुंपण उभारणे आवश्यक आहे. राज्य आणि केंद्रीय पुरातत्त्व विभागाने या स्थळाची तातडीने दखल घेऊन संरक्षित स्मारक म्हणून याची अधिकृत नोंद करावी. बोरामणीजवळील माळरानावरील हा चक्रव्यूह केवळ दगडांची मांडणी नसून, तत्कालीन मानवाच्या प्रगत भूमितीय ज्ञानाचा तो एक उत्तम नमुना आहे. वर्तुळाच्या दृष्टीने हा देशातील सर्वात मोठा चक्रव्यूह असल्याने देशभरातील पुरातत्त्व अभ्यासकांसाठी हे एक महत्त्वाचे संशोधन केंद्र बनू शकते, अशाही प्रतिक्रिया अनेक पर्यटकप्रेमींनी व्यक्त केल्या.

बोरामणी गवताळ सफारीच्या जवळ व तुळजापूर तालुक्यातील खडकी गावच्या हद्दीत आढळलेल्या दगडी चक्रव्यूहाची पाहणी करण्यासाठी अनेक पर्यटनप्रेमी दाखल होत आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्त्व विभागाकडून झालेल्या पाहणीवर अद्यापही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. हे चक्रव्यूह प्रसिद्धीस येऊन चार महिने झाले आहेत. या दगडी चक्रव्यूहाचा हेरिटेज टुरिझम अंतर्गत विकास केल्यास इतिहासप्रेमी आणि पर्यटकांची पावले बोरामणीकडे वळतील. यामुळे येथील गवताळ सफारीच्या पर्यटनात वाढ होईल तसेच या गावालाही वेगळी ओळख मिळेल. यातून स्थानिकांना रोजगाराची संधी मिळू शकेल, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

सोलापूर व धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणारा पुरातत्त्व ठेवा बोरामणी गावाजवळील माळरानावर आहे.

प्रशासकीयदृष्टीने ही जमिनी खडकी (ता. तुळजापूर) हद्दीत येते. या ठिकाणी अतिशय दुर्मिळ आणि प्राचीन असे वर्तुळाकार चक्रव्यूह आहेत. हे चक्रव्यूह वर्तुळाच्या दृष्टीने देशात सर्वात मोठे व क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचे आहे.

## बार्शीत वादळी वाऱ्यासह पाऊस, वीज पडून श्रीपतपिंपरी येथे एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

बार्शी शहर व परिसरात शुक्रवारी दि. २४ रोजी दुपारी वादळी वारा, ढगाचा गडागडाट आणि विज्यांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. मागील आठवड्यात बार्शी शहर व परिसरात उन्हाची तीव्रता चांगलीच वाढली होती. त्यामुळे अंगाची लाहीलाही होत होती. याच पावसात आज बार्शी तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे अंगावर वीज पडल्याने बाळासाहेब गरदडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

क्रक्र शुक्रवारी देखील सकाळपासून दुपारपर्यंत उन्हाची तीव्रता प्रचंड होती. परंतु दुपारी साडेतीन वाजल्यानंतर जोराच्या वाऱ्यासह ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला. यामुळे काहीकाळ वातावरणात गारवा निर्माण झाला होता या वातावरणामुळे दिवसभर उकाड्याने त्रस्त झालेल्या शहरवासीयांना मात्र चांगलाच दिलासा मिळाला.

शुक्रवारी दुपारी ४.३० ते ५ वाजताच्या दरम्यान पाऊस सुरु असताना श्रीपतपिंपरी येथील घाडगे अण्णा वस्ती येथे आंब्याच्या झाडाखाली बाळासाहेब तानाजी गरदडे (वय ४५, रा.श्रीपतपिंपरी) बसले होते. त्यावेळी गरदडे यांचा अंगावर वीज पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबत मंडळाधिकाऱ्यांनी ग्रामीण पोलिसांना खबर दिली असून शवविच्छेदनाच्या सूचना दिल्या आहेत. ढगांचा गडगड आणि विजांचा कडकडाट सुरु असताना झाडाखाली थांबणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या आठवड्यात दोन-तीन वेळ पाऊस झाल्याने ग्रामीण भागातील शेतक-यांचे मोठ्या प्रम ाणात नुकसान झाले आहे. आंबा, द्राक्ष व इतर फळ पिकांचे तसेच कांदा, कडबा आदींचेही नुकसान झाले आहे. तसेच काही भागात घरांवरील पत्रे व छप्पर यांचे नुकसान झाले आहे.

## विनाकारण सळईने मारून दुचाकी फोडली

### चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

रात्रीच्या सुमारास घरासमोर उभे राहून जोर जोरात शिवीगाळ करून दुचाकी फोडून नुकसान केल्या प्रकरणी चार जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजय मोहिते, रोहित मोहिते, गणेश मोहिते आणि प्रमोद म ोहिते अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत भगवान शिवाजी कांबळे (रा. २६७/५०, रविवार पेठ, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील आरोपी अजय मोहिते हा २० एप्रिल रोजी रात्री साडेदहा वाजता फिर्यादीच्या घरासमोर विनाकारण शिवीगाळ करत होता .याबाबत पत्नीने फोनवरून कल्पना दिल्याने फिर्यादी हा घरी आला असता आरोपी अजय याने फिर्यादीस तुला कसली मस्ती आली आहे मी तुझ्या घरासमोर थांबलो तर तुझ्या काय बापाचे बिघडले असे म्हणून आरोपीने लोखंडी सळईने डोक्यात मारुन फिर्यादीला जखमी केले .त्यानंतर आरोपीने फिर्यादीची दुचाकी (क्रं. एम एच ४८ एक्स २७२९ ) ची साईड ग्लास , हेडलाईट फोडुन नुकसान केले . सदरवेळी इतर आरोपीनी देखील फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .पोलीस हवालदार सय्यद हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात पुस्तक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय येथे जगप्रसिद्ध साहित्यिक, नाटककार विल्यम्स शेक्सपियर यांच्या जन्म दिनाच्यानिमित्त जागतिक पुस्तक दिन व त्यांना अभिवादन करुन वाचनालयात साजरा करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, वाचनालयाचे वाचक किरण वखारिया यांच्या हस्ते विल्यम्स शेक्सपियर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संचालक धिरज कुंकूलोळ यांनी केले. यावेळी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल शितल लुकडे, क्लार्क विराज पतंगे उपस्थित होते.

## प्रशासकीय कार्यालये तंबाखूमुक्त करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते वैजिनाथ धेडे यांचा पाठपुरावा यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**



जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ठिकाणे, शासकीय आणि निमशासकीय कार्यालये तंबाखू व तंबाखूच्या धुरापासून मुक्त करण्याच्या म ोहिमेला मोठे यश मिळाले आहे. कातेवाडी (ता. मोहोळ) येथील सामाजिक कार्यकर्ते वैजिनाथ औदुंबर धेडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने आता यावर कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

धेडे यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती की, शासकीय कार्यालयांमध्ये तंबाखू सेवनामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात आणि स्वच्छतेचाही फटका बसतो. या निवेदनाची दखल घेत सह दुय्यम निबंधक कार्यालय, अकलूज यांनी अधिकृत पत्रक काढून कार्यालय तंबाखूम ुक्त घोषित केले आहे. या संदर्भातील माहिती मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (मुंबई), जिल्हाधिकारी कार्यालय (सोलापूर) आणि उपविभागीय अधिकारी (माळशिरस) यांनाही कळवण्यात आली आहे. एका सामाजिक कार्यकर्त्याने दिलेल्या लढ्यामुळे शासकीय कार्यालयांमध्ये आता आरोग्यदायी आणि स्वच्छ वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. धेडे यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

**प्रशासनाने उचललेली पावले**

**दंडात्मक कारवाई:** कार्यालयाच्या दर्शनी भागात 'तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्यास २०० रुपये दंड आकारण्यात येईल' अशा आशयाचे फलक लावण्यात आले आहेत.

**कर्मचाऱ्यांवर बंधन:** कार्यालयीन वेळेत कोणतेही कर्मचारी किंवा अधिकारी पान, तंबाखू किंवा सुपारीचे सेवन करणार नाहीत, याची खात्री प्रशासनाकडून दिली गेली आहे.

**संपूर्ण परिसर मुक्त:** केवळ कार्यालयच नव्हे, तर कार्यालयाचा संपूर्ण परिसर 'तंबाखूमुक्त क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आला आहे. यामुळे या कार्यालयातील अधिकारी-कर्मचारीच नाहीतर येणारे लोकही तंबाखू खात नाहीत. यामुळे हा संपूर्ण परिसर आता चकाचक दिसू लागला आहे.

# गुळपोळी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

तालुक्यातील गुळपोळी येथे विश्वरत्न, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन बारामती नगरपरिषदेच्या विरोधी पक्ष गटनेत्या संघमित्रा चौधरी व काळूराम चौधरी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी संघमित्रा चौधरी यांचे स्वागत वैशाली चौधरी व शीतल गायकवाड यांनी केले.

मिरवणुकीचे उद्घाटन संघमित्रा चौधरी व काळूराम चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये ॲड. विवेक गजशिव, कृष्णा चौधरी, इंद्रजित चिकणे, अमोल नरखडे, शिरीष चिकणे, अशोक चिकणे, बापू राऊत उपस्थित होते. ही मिरवणूक भीम नगर, बस स्टँड, ग्राम पंचायत, विठ्ठल मंदिर व विविध चौकातून काढण्यात आली. भिमगीतांच्या तालावर भीमसैनिकांनी जल्लोषात नृत्य करत वातावरण दणाणून सोडले. सजवलेल्या बग्गीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आकर्षक मि रवणूक काढण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्लू स्टार मित्र मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र चौधरी, उपाध्यक्ष समाधान चौधरी, खजिनदार अर्जुन चौधरी, सचिव धनाजी चौधरी अतुल चौधरी , रणजित चौधरी, सचिन चौधरी, सुनील चौधरी, अमित चौधरी, कृष्णा चौधरी, विशाल चौधरी, लखन चौधरी, राहुल चौधरी, आनंद गायकवाड, अजय चौधरी, मोहन चौधरी, तानाजी चौधरी यांनी परिश्रम घेतले.





## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत कवठेकर प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ एप्रिल -**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे मागील फेब्रुवारी महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या इंग्रजी परीक्षेत पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित, कवठेकर प्रशालेच्या दोन विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांकाच्या श्रेणीत येत घवघवीत यश संपादन केले आहे.

प्रशालेची विद्यार्थिनी श्रावणी इनामदार हिने महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांक, तर आराध्या पवार हिने राज्यात तृतीय क्रमांक पटकाविला.

या यशाबद्दलचा गौरव सोहळा पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र.पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील,उपमुख्याध्यापिका विश्वासे, पर्यवेक्षक गडदे उपस्थित होते. प्रशालेच्या या यशाबद्दल पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा विणा जोशी, चेअरमन नानामालक कवठेकर, मानद सचिव सु.त्रि.अभ्यंकर व संस्थेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आनंद व्यक्त करत विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# राज्य शासनाच्या 'त्या' निर्णयामुळे जिल्हा परिषदेच्या प्रशासनासमोर नवा पेच

## मार्गदर्शक सूचना न मिळाल्यास बदली प्रक्रिया लांबणीवर?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २४ एप्रिल -**

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने जनगणनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती दिल्याने जिल्हा परिषद प्रशासनासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. मे महिन्यात नियोजित असलेल्या वार्षिक बदली प्रक्रियेवर या निर्णयाचा थेट परिणाम होण्याची शक्यता असून, प्रशासन संभ्रमावस्थेत असल्याचे दिसून येत आहे.

या आदेशानुसार जनगणना कार्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची बदली पुढील आदेशापर्यंत होणार नाही. मात्र, जनगणना प्रक्रियेत सहभागी नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत शासनाने अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नाही. त्यामुळे नेमक्या कोणत्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात? कोणत्या स्थगित ठेवाव्यात? याबाबत प्रश्न निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मे महिन्यात बदल्यांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागाने त्यासाठी प्राथमिक तयारी सुरू केली होती. मात्र जनगणनेसंदर्भातील शासन निर्णय आल्यानंतर संपूर्ण प्रक्रियेबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. शासनाकडून स्पष्ट मार्गदर्शक सूचना न मिळाल्यास बदली प्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात प्रामुख्याने ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षक, संस्थांमधील शिक्षकांची प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या याद्या दोन महिन्यांपूर्वीच अंतिम करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद किंवा महसूल विभागातील लिपिक वर्गातील एकाही कर्मचाऱ्याची अद्याप जनगणनेसाठी नियुक्ती करण्यात आलेली नाही.कार्यालयीन कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी लिपिकांची आवश्यकता असल्याने त्यांना सध्या या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्ष लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बदली प्रक्रियेबाबत शासनाने तातडीने स्पष्टता आणावी, अशी अपेक्षा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

### प्रशिक्षण नंतर घरगुती मोजणी

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी प्रगणक, पर्यवेक्षक यांसह अन्य असे सुमारे ७ हजार कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांना लवकरच प्रशिक्षण दिले जाणार असून त्यानंतर घरगुती मोजणी प्रक्रियेला प्रारंभ होईल. प्रत्येक प्रगणकाकडे सुमारे १५० ते १७० घरे सोपविण्यात आली आहेत. ही प्रक्रिया डिसेंबर २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे.

## महत्वाचे...



### माजी आमदार निर्मला ठोकळ यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा तथा माजी आमदार स्वर्गीय श्रीमती निर्मला ठोकळ यांच्या ८८ वी जयंतीनिमित्त बाळे येथील ठोकळ प्रशालेत मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याप्रसंगी प्रशालेचे शिक्षक लक्ष्मण आगलावे, सारंग पाटील, विजयकुमार लांडगे, कैलास देशमुख, लिपिक संतोष क्षिरसागर, शिपाई संतोष कासे उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री सारंग पाटील तर आभार विजयकुमार लांडगे यांनी मानले.



### जिजामाता शाळेत रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. २४ एप्रिल -**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा तथा माजी आमदार स्व. निर्मला शंकरराव ठोकळ यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त जिजामाता प्राथमिक शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ, संचालक किशोर पाटील, संचालक सत्वजय ठोकळ तसेच नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, नगरसेवक बिजू प्रधाने आदींच्या हस्ते स्वर्गीय निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन पुजारी व्ही. आर. प्रास्ताविक ए. ए. मुजावर, आभार मुळे एम. जी. यांनी मानले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप मान्यवरांचे हस्ते करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### एका तरुणावर चाकू हल्ला; दोघा जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

दोघा दारुड्यांनी विनाकारण एका तरुणावर चाकू हल्ला केला. यात तो तरुण जखमी झाला असून त्याचे नाव रोहित बाळू बनसोडे (वय-२०, रा.मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी राजू शामराव वाघमारे, विशाल राजु वाघमारे ( दोघेही रा.मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांच्या विरोधात जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहित बनसोडे हा बुधवारी मध्यरात्री प्रेम तोरणे, यशवंत राजगुरु या मित्रांसमवेत घरासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त मारलेला मंडप काढत होता. तेव्हा, राजू वाघमारे व विशाल वाघमारे हे दोघे दारुच्या नशेत त्याठिकाणी येऊन चाकुने रोहित बनसोडे याच्यावर वार केला. रोहित बनसोडे हा जखमी झाल्याचे पाहून ते दोघे घटनास्थळावरुन पळून गेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### दुचाकीचे सीट कव्हर फाडल्याच्या कारणावरुन मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

दुचाकीचे सीट कव्हर का फाडले असे म्हणून एका तरुणास चौघा जणांनी लाथाबुक्क्याने व फरशीने मारुन जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी त्या चौघा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. अनोज विजयकुमार जाधव (रा.रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यातील फिर्यादी रेल्वे लाईन येथे असताना पियुष फरड, प्रेम फरड, राहुल फरड आणि फ्रान्सिस स्वामी (सर्वजण रा.सोलापूर) हे चौघेजण दुचाकीचे सीट कव्हर का फाडले असे म्हणत शिवीगाळ व मारहाण केली. पोलिसात तक्रार दिली तर तुला बघुन घेईन अशी धमकी देत पळून गेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### सोलापुरात आज सुरेल संगीतमैफलीची मेजवानी

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

शहरातील संगीतप्रेमींसाठी राज स्टुडिओ सोलापूर व धनश्री ऑर्केस्ट्रा यांच्या संयुक्त विद्यमाने, भीमाशंकर भालके प्रस्तुत अलका याज्ञिक नाईट' हा बहारदार गीत-संगीताचा कार्यक्रम शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित केला आहे. कार्यक्रमात सोलापुरातील नामांकित व गुणी कलाकारांचा सहभाग असणार आहे. प्रेक्षकांना हिंदी चित्रपटसृष्टीतील गाजलेली गीते आणि सुरेल सादरीकरणाचा आस्वाद घेता येणार आहे. भक्ती महामुनी, धनश्री सरगुले, सायली साठे, अनिता अय्यर, साक्षी देवस्थळी, मेघा हुळळे-साळुंखे, अनुराधा गंगुल यांसह अनेक गायक-गायिका आपली कला सादर करणार आहेत. अतुल स्वामी, भीमाशंकर भालके, अशोक बिराजदार, विनायक सरगुले, राहुल कौलगुड, सनी भंडारी, भूषणकुमार स्वामी, भागवत जठार, राजकुमार कोकळगी, शिवदास भंडारी, प्रसाद भालके आदी कलाकारही या मैफलीत रंगत आणणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# समर्थ बँकेच्या निवडणुकीला हिरवा कंदील

## चार वर्षे रखडली होती निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

सोलापुरातील बहुचर्चित समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीस रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने हिरवा कंदील दर्शविला आहे. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने बँकेकडे मतदार याद्यांची मागणी केली असून, लवकरच प्रारुप मतदार यादी कार्यक्रम जाहीर होणार आहे.

मतदार यादी अंतिम झाल्यानंतर संचालक मंडळासाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. समर्थ बँकेच्या संचालक मंडळाची मुदत २०२२ मध्ये संपली होती. मात्र कोरोना, पावसाळा, अतिवृष्टी, लोकसभा व विधानसभा निवडणुका यांसह अन्य कारणांमुळे ही निवडणूक तब्बल चार वर्षे रखडली होती.

बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर आरबीआयने काही निर्बंध लावल्याने मध्यंतरी बँक चर्चेत आली होती. दरम्यान, समर्थ बँक विलीनीकरणाचा मुद्दाही समोर आला होता. आता निवडणुकीस परवानगी मिळाल्याने बँकेच्या कारभारात नव्या संचालक मंडळाची एंट्री होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

॥ अर्थ करी समर्थ ॥

### मतदार याद्यांची केली मागणी

समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीस आरबीआय आणि महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. त्यानुसार आम्ही बँकेकडे मतदार याद्यांची मागणी केली आहे, असे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सांगितले.

### ऑक्टोंबरमध्ये होणार निवडणूक?

पावसाळ्यापूर्वी मतदार यादी आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. परंतु ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास निवडणूक ऑक्टोबरमध्ये होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# ओबीसींची फरफट करत अस्मितेत झुंजवले जात आहे : बिंगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

ओबीसी समाजाची फरफट करत अस्मितेत झुंजवले जात आहे. अस्तित्वाचा खरा प्रश्न असताना त्यांना झुलवत ठेवले जात आहे. निसर्गवादी असलेल्या भोळ्या धनगर समाजाला हिंदुत्वाच्या नादी लावले जात आहे. त्यांचा वापर सत्तेसाठी केला जात आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष यशपाल बिंगे यांनी सोलापुरात केला.

ओबीसी जनसंवाद यात्रेच्या अनुषंगाने ते सोलापुरात आले होते. प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, भाजपा ओबीसी प्रवर्गातील लहान समाज घटकांना आकृष्ट करत आहे, ते षडयंत्र उघड करणे महत्त्वाचे आहे. खोटे आश्वासन देऊन धनगर समाजला झुलवत ठेवण्यात येत आहे.

ओबीसी समाज घटकांना शिष्यवृत्ती, फेलोशिप दिली जात नाही. लहान समाज घटकांसाठी महामंडळ घोषित करण्यात आले. मात्र त्यांची कार्यालय कुठे आहेत? असा सवालही उपस्थित केला.

बेरोजगारी वाढल्याने ओबीसी समाज विस्थापित होत आहे. आजवर धनगर आणि मराठा समाजात कधीही भांडणे झाली नव्हती. मात्र आता ते घडवण्यात येत आहे. ओबीसींचा राजकीय आरक्षणाचा प्रश्नही चर्चेला आला आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे नगरसेवक चेतन नरोटे उपस्थित होते.

# चारचाकीची दुचाकीला धडक; नांदेडच्या चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**



चारचाकीची दुचाकीला धडक बसून दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी नांदेड येथील एका चारचाकी चालकाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सत्यव्रत सिद्राम जिंदम (रा.शिवाजी नगर, नांदेड ) असे त्याचे नाव आहे.

याबाबत विशाल भानुदास क्षिरसागर (रा.गॅलेक्सी पनाश अपार्टमेंट, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझे वडील एम.एच.१३ डी.एन.६४८३ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन कामती येथून येत होते. बसवेश्वर नगर येथे ते आले असता एम.एच.२६ बी.सी.५०११ या क्रमांकाच्या चारचाकी चालकाने भरधाव येत दुचाकीला धडक दिली.

# जलतारा योजनेमुळे भूजल पुनर्भरणास चालना : जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलसाठा वाढविणे या उद्देशाने जलतारा योजना हाती घेण्यात आली आहे. घटत्या भूजलपातळीवर नियंत्रण मिळविण्यासाठी, नैसर्गिक जलस्तोत्रांच्या संवर्धनासाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. यामुळे भूजल पुनर्भरणास चालना मिळत आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी केले.

या योजनेअंतर्गत शेतजमिनीत किंवा योग्य ठिकाणी ५ फूट बाय ५ फूट आकाराचा व ६ फूट खोल खड्डा तयार केला जातो. त्या खड्डयात तळाशी मोठे दगड, त्यावर खडी, वाळू आणि मातीचे थर दिले जातात. या संरचनेमुळे पावसाचे किंवा साचलेले पाणी थेट जमिनीत झिरपते. परिणामी भूगर्भातील जलवाहिन्यांचे पुनर्भरण होते.



जलसंधारण अंतर्गत योजनांमुळे जमिनीची आर्द्रता टिकून राहते, मृदा धूप कमी होते. दीर्घकालीन पाणीटंचाईवर मात करण्यास हातभार लागतो. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसाठी ही योजना फायदेशीर मानली जाते. ही योजना कमी खर्चिक, सोपी आणि परिणामकारक असून शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.




# 'भगवंत महोत्सव'च्या माध्यमातून 'बार्शी'ला नवी दिशा देण्याचा संकल्प

- माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे प्रतिपादन
- मुख्यमंत्री फडणवीस मंगळवारी बार्शीत येणार
- 'ऑल दि बेस्ट' ठरला रंगतदार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

भगवंत महोत्सवाच्या माध्यमातून बार्शी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक विकासाला नवी दिशा देण्याचा संकल्प असून, श्री भगवंत मंदिरसह परिसराचा सर्वांगीण कायापालट करण्यात येणार आहे, अशी ग्वाही भगवंत महोत्सवाचे संकल्पक तथा माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी दिली.

बार्शी येथील श्री भगवंत महोत्सव अंतर्गत आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलताना ते पुढे म्हणाले, भगवंत प्रकटोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवार, २८ एप्रिल रोजी बार्शीत येणार आहेत. त्यांच्या आगमनामुळे तीर्थक्षेत्र विकासाला गती मिळेल.





नगरपालिका इमारत जुन्या सरकारी दवाखान्याच्या जागेत स्थलांतरित करुन सध्याची इमारत मंदिर परिसराच्या विकासासाठी वापरण्याचे नियोजन आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव यांनीही मनोगत व्यक्त केले.

भगवंत महोत्सवाच्या निमित्ताने सादर करण्यात आलेल्या 'ऑल दि बेस्ट' या गाजलेल्या मराठी विनोदी नाटकाने बार्शीकरांना खळखळून हसवले. हलक्या-फुलक्या कथानकासोबत उत्कृष्ट अभिनय, नेमकेपणा आणि अचूक कॉमिक टायमिंग यामुळे संपूर्ण कार्यक्रम रंगतदार ठरला.

देवेंद्र पेम लिखित व दिग्दर्शित या नाटकात मयूरेश पेम यांनी मुक्या मित्राची, मनमीत पेम यांनी बहिऱ्या मित्राची, तर निखिल चव्हाण यांनी आंधळ्या मित्राची भूमिका साकारली. झुई पेडखळे यांनी प्रमुख अभिनेत्रीची भूमिका साकारत प्रभावी उपस्थिती दर्शवली.

नाटकाची कथा तीन मित्रांभोवती फिरते. आंधळा, बहिरा आणि मुका असे हे तिघे एका मुलीच्या प्रेमात पडतात. स्वतःच्या उणिवा लपवून एकमेकांना मागे टाकण्याच्या प्रयत्नातून निर्माण होणारे गैरसमज, प्रसंग आणि विनोदी घडामोडी प्रेक्षकांना पोट धरून हसायला भाग पाडतात.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, 'भाजपा'चे युवा नेते ॲड.रणवीर राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, नगरसेवक विजय राऊत, शिवशक्ती बँकेचे अध्यक्ष डॉ.प्रकाश बुरगुटे, डॉ.गुलाबराव पाटील, डॉ.रोहन पाटील, डॉ.अमित पडवळ, संतोष शहा, गौतम कांकरिया, सिध्दार्थ शहा, डॉ.योगेश सोमाणी, गणेश नान्नजकर, दत्तप्रसाद पाटील, राहुल खुणे, मंदार कुलकर्णी, विशाल लगडे, राजाभाऊ सुरवसे, अरुण बारबोले, रमेश पाटील, संतोष निंबाळकर, असिफ तांबोळी, डॉ. संजय अंधारे, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी उपस्थित होते.

# भवानी पेठ, जिल्हा क्रीडा संकुल परिसरात अतिक्रमण विरोधात कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

शहरातील भवानी पेठ परिसरातील जय भवानी शाळेजवळील घोड्याच्या तबेलाचे अतिक्रमित पत्रा शेड महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने हटविले. त्याचबरोबर कुमठा नाका जवळील जिल्हा क्रीडा संकुल परिसरातील अतिक्रमित सहा पत्रा शेड निष्कासित करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई झाली.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणी अनधिकृतपणे पत्र्याचे शेड उभारून अतिक्रमण केले होते. यामुळे कामकाजात अडथळा निर्माण होत असल्याची नोंद प्रशासनाने घेतली होती. त्याअनुषंगाने सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने क्रीडा संकुल प्रशासनाच्या समन्वयाने संयुक्त मोहीम राबवत संबंधित सहा पत्राशेड निष्काशीत केले.

जेसीबीच्या साह्याने पत्रा शेड निष्काशीत केली. कारवाईदरम्यान परिसरात पोलिस बंदोबस्तही तैनात केला होता. सार्वजनिक जागेवर तसेच रस्त्याला अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे अतिक्रमण केल्याचे आढळल्यास जप्ती तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रामेश्वर येथे अखंड हरिनाम सप्ताह व अनुष्ठान यज्ञ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** तालुक्यातील मौजे रामेश्र्वर येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सुरु असलेल्या संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा भक्तिमय वातावरणात सुरू असून या सोहळ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड गुरुवारी आवर्जून सहभागी झाले व यज्ञात आहुती दिली. विश्र्वधर्मी डॉ. विश्र्वनाथजी कराड साहेब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचा शुक्रवारी वास्तुशांती सोहळा होत आहे.

गेल्या ५५ वर्षापासून सुरू असलेला संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात गेल्या १९ एप्रिल पासून सुरू झाला असून याची २६ एप्रिल रोजी ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहात शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा सुरू असून सप्ताहात काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, रामायण, हरिपाठ, किर्तन, हरीजागर असे दैनंदिन कार्यक्रम होत आहेत.



## विविध वृत्त...

## प्रवाशांचे अतोनात हाल

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लातूर ला औशातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या खूपच मोठी आहे त्यात नोकरदार ,विद्यार्थी, व्यापारी आदींचा समावेश आहे

हल्ली बस भाडे३६ वरून ४२ केले असले तरी बस फक्त शिवाजी चौका पर्यंत येत आहे, याविषयी कंडक्टर कडेचौकशी केली असता डिझेल भरावयाचे आहे त्यामुळे बस पुढे जात नाही . प्रवाशांना शिवाजी चौकातून मुख्य बस स्थानकाकडे जाण्यासाठी रिक्षाने १५ रु. देऊन जावे लागत असल्याने हा अतिरिक्त भार प्रवाशांवर दररोज पडत आहे

## बनावट ऑईल देऊन ३१ लाख रुपयांची फसवणूक

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** प्राण्यांच्या रोगावर उपयोगी असल्याचे भासवून २१ लिटर बनावट ऑईल विकत देऊन तब्बल ३० लाख ८५ हजार १०० रुपयांना एकाला गंडा घातल्याची घटना लातूरमध्ये घडली.

शहरातील व्यापारी दिनेश मांगीलाल बांगड (रा. मंठाळे नगर, लातूर) यांना आरोपी रवीकुमार, प्रीती नायर, पूनम गवारे व ज्ञानेश्र्वर सूर्यवंशी यांनी आम्ही जागतिक पातळीवरील नामांकित कपनीचे ऑईल विक्री करीत आहोत, ते ऑईल इतरत्र कुठेही उपलब्ध नाही', असे भासवून बांगड यांना तब्बल २१ लिटर ऑईल विकत घेण्यास भाग पाडले. त्यासाठी आरोपी रवी कुमारसह अन्य आरोपींनी त्यांच्याकडून ३० लाख ८५ हजार १०० रुपये घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली. बांगड यांच्याकडे सदर २१ लिटर ऑईल आल्यानंतर त्याचा कोणताही परिणाम जाणवत नव्हता. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे बांगड यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ गांधी चौक पोलीस ठाणे गाठले. त्यांच्या फिर्यादीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक लोहेकर हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लग्नात तुझ्या घरच्यांनी एक रुपयाही हुंडा दिला नाही, आता घराचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी पाच लाख रुपये व दोन तोळे सोने घेऊन येण्याची मागणी करीत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी आरोपी पतीसह सासू व सासऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मानसी मयुरेश जोशी (वय २४, रा. जुना सुभाष रोड बीड, हा. मु. नीला रेसिडेन्सी पापविनाश रोड, लातूर) हिला तिचा पती मयुरेश धोंडीराज जोशी, सासरे धोंडीराज जोशी व सासू मंजुषा धोंडीराज जोशी हे पैशासाठी त्रास देत होते. तुझ्या माहेरच्यांनी लग्नात एक रुपयाचाही हुंडा दिला नाही. आता घराचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी पैसे कमी पडत आहेत. हुंडा म्हणून तू माहेरच्यांकडून ५ लाख रुपये घेऊन ये, त्याचप्रमाणे लग्नासाठीची दोन तोळे सोने आणून दे, असे म्हणून पीडित विवाहिता मानसी हिचा पतीसह सासू व सासरेही छळ करीत होते. या छळाला कंटाळून मंजुषा हिने लातूरच्या भरोसा सेलकडे अर्ज केला. भरोसा सेलने आरोपींची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, हुंडा व सोने घेण्यावर ते ठाम होते. यामुळे शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल आहे.

## ३०० प्रगणकांना जनगणनेचे प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** तालुक्यात नियुक्त करण्यात आलेल्या जनगणना प्रगणक व पर्यवेक्षकांसाठी पहिल्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन स्वामी विवेकानंद महाविद्यालयात करण्यात आले होते. याचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रगणक समन्वयक अधिकारी विठ्ठल परब, तहसीलदार सौदागर तांदळे, निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे, जिल्हा समन्वयक बालाजी शेळके उपस्थित होते. प्राचार्य गोविंद शिंदे व मारुती सूर्यवंशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ३०० प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण झाले. ते १२ फिल्ड ट्रेनरने दिले.

यासाठी डिजिटल बोर्ड असलेल्या सहा कक्षाची व्यवस्था करण्यात आली. जनगणना दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्यात घर यादी बनविण्यात येणार आहे. याचे काम १६ मे ते १४ जून या कालावधीत होणार आहे. एक १ ते १५ मे या कालावधीत जनतेला स्वगणना करता येणार आहे. त्यासाठी संकेतस्थळाचा वापर करून प्रत्येकाने आपली गणना करावी, असे आवाहन रोहिणी नव्हे यांनी केले.

जनगणना करताना कोणताही भाग सुटणार नाही, कोणताही भाग दुबार होणार नाही, याची दक्षता घ्यावी, त्यासाठी हे ३ दिवसांचे प्रशिक्षण आहे, ते व्यवस्थित व्हावे, अशा सूचना तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केल्या. सदरील प्रशिक्षणासाठी संपत माने, सचिन पवार, मदन मलवाडे, सोपान बेंबडे यांनी परिश्रम घेतले.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची नूतन जिल्हा वकील मंडळाने घेतली भेट

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** राज्याचे माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची दि. २३ एप्रिल रोजी आशियाना निवासस्थानी नूतन लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संचालकांनी सदिच्छा भेट घेतली व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी वकील मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा वकिल मंडळाचे अध्यक्ष अँड. शिवकुमार जाधव, उपाध्यक्ष अँड. लहू चामे, सचिव अँड. येरटे, सहसचिव अँड. सिद्धेश्र्वर धायगुडे, ग्रंथालय सचिव अँड. आर्वीकर, कोषाध्यक्ष अँड. राठोड, महीला उपाध्यक्ष अँड. मंजुषा शिंदे, महिला सहसचिव अँड. श्रद्धा पाटील, स्वीकृत सदस्य अँड. शिंदे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड. जाधव, जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

## काँग्रेसने महिला आरक्षण धोरणास विरोध केल्याने येणाऱ्या काळात या विषयाला धरून आंदोलन करणार : प्रेरणा होनराव

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सतत महिलांचा हक्क डावलण्याचे काम केले आहे. काँग्रेसनेमहिला आरक्षण धोरणासविरोध केल्याने येणाऱ्या काळात या विषयाला धरून भाजप तीव्र आंदोलन करणार असल्याचे प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेच्या सदस्या प्रेरणाताई होनराव यांनीशुक्रवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केले.पंतप्रधानरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अर्थात महिला आरक्षण विधेयक मंजूर करून घेण्यासाठी तीन दिवसांचे




संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनात काँग्रेसने या विधेयकासविरोध दर्शवला. परिणामतः हे विधेयक फेटाळले गेले. संसदेत या विधेयकाबाबत चालू असलेली चर्चा आपण प्रेक्षक गॅलरीत बसून पाहिली , ऐकली असल्याचे सांगून प्रेरणा होनराव म्हणाल्या की, हे विधेयक फेटाळले गेले तो दिवस असंख्यमहिला भगिनींच्या दृष्टीने दिवस ठरला. या विधेयकासकाँग्रेसच्या श्रीमती सोनिया गांधी, प्रियांका गांधी यांनी विरोध दर्शविला . लोकसभेचे विरोधी पक्षनेते असणाऱ्या राहुल गांधी यांनी तर या विधेयकाबद्दल ब्र शब्दही उच्चारला नाही. त्यांनी उलट आपल्या बालपणीच्या आठवणीना उजाळा देण्याचे काम केले. तर राज्यातील महिला काँग्रेस खासदारांनी या आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे बोलून दाखविल्याचे ऐकून आपणास आश्र्चर्य वाटल्याचे होनराव म्हणाल्या.पंतप्रधान नरेंद्र मोदींना या विशेष अधिवेशनात हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये महिलांनाही संसद- विधिमंडळात ३३ टक्के आरक्षणा देऊन नारीशक्तीचा सन्मान करायचा होता. या विधेयकाचा लाभ देशातील सर्वच राजकीय पक्षात कार्यरत असणाऱ्या आमच्या महिला भगिनींना होणार आहे. महिलांचा हक्क दवाळण्याचाप्रयत्न या माध्यमातून झाला असला तरी आपण महिलांच्या हक्कासाठी येणाऱ्या काळात झगडत राहू.वर्ष २०२७ सालचा विकसित भारत महिलांच्या हक्क व अधिकारांनीपरिपूर्ण असलेला पाहायला मिळेल,असा विश्र्वासही प्रेरणा होनराव यांनी व्यक्त केला. २०११ सालच्या जनगणनेनुसार हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या निवडणुकीपासून माता - भगिनींना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न पंतप्रधान मोदींनी केला. मतदार संघांची पुनर्रचना होऊन या विधेयकामुळे सर्वसामान्यांना समसमान लोकप्रतिनिधी मिळणार आहेत. येणाऱ्या काळात यासाठी भाजप आंदोलन करणार असल्याचे प्रेरणा होनराव यांनी नमूद केले.लातूर शहर जिल्हा महिला भाजपच्या अध्यक्षा शीतल मालू, सरचिटणीस रागिणी यादव यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरसेविका शोभा मिरचे, स्वाती घोरपडे, जयश्री मोतीपवळे , चावले, शोभा कोंडेकर यांची उपस्थिती होती.

## लातुरात 'गो सन्मान आवाहन अभियान'चे आयोजन

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** भारतीय संस्कृतीचा मानबिंदू व प्राण मानली जाणारी गाय, ज्याला 'गोमाता' म्हणूनही ओळखले जाते. गोमातेला राष्ट्रमातेचा संवैधानिक दर्जा मिळावा आणि गोवंश हत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी या प्रमुख उद्देशाने देशभरात २७ एप्रिल रोजी व्यापक स्वरूपात 'गो सन्मान आवाहन अभियान' राबविण्यात येणार आहे.



या अभियानाअंतर्गत देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री व राज्यपाल यांना तहसीलदारामार्फत हजारो गोभक्तांच्या स्वाक्षरीसह निवेदन सादर करण्यात येणार आहे. या पार्श्र्वभूमीवर लातूर येथे आहेत. आयोजित गोभक्तांच्या बैठकीत निश्र्चित करण्यात आले. गो संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन दिंडीच्या स्वागतासाठी शहरातील प्रमुख रस्त्यांवर बॅनर्स लावण्यात येणार असून, सहभागी होणाऱ्या गोभक्तांसाठी विविध ठिकाणी शीतपेयाची व्यवस्था करण्यात येणार आहे. दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता येथील हनुमान चौक येथून 'गो सन्मान दिंडी'ची सुरुवात होणार आहे. या दिंडीत लातूरातील अनेक साधू-संत, कीर्तनकार तसेच टाळकरी मंडळी, महिला मंडळे भजन-कीर्तनाच्या माध्यमातून सहभाग नोंदविणार आहेत. गोमातेच्या सन्मानार्थ विविध घोषवाक्यांचे फलक हे दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरणार ही दिंडी हनुमान चौक, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लोकमान्य टिळक चौक मार्गे तहसील कार्यालयात विसर्जित होईल. येथे उपस्थित गोभक्त व साधुमंडळी हजारो स्वाक्षरींसह निवेदन तहसीलदार यांना सादर करतील. या भव्य 'गो सेवा-गो सुरक्षा-गो सन्मान' अभियानात लातूर शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गोभक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच, दिंडीत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी पांढरा गणवेश परिधान करावा, अशी माहिती या अभियानाचे प्रसिद्धी प्रमुख राजेश डुंगरवाल यांनी दिली.

## वृक्ष लागवड करून डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अस्थींचे विसर्जन




तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूरचे अध्यक्ष तथा माजी राज्यसभा सदस्य शिक्षण तज्ज्ञ, थोर विचारवंत डॉ. गोपाळराव पाटील यांचे दि. २१ एप्रिल रोजी निधन झाले. येथील जिजामाता कन्या प्रशालेत दि. २३ एप्रिल रोजी त्यांच्या अस्थींचे विसर्जन वटवृक्षाचे रोपण करून करण्यात आले.

स्व.डॉ.गोपाळराव पाटील यांचे शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय व राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान जिजामाता कम्प्रमुला, चातूर संत तुकाराम नॅशनल स्कूलमध्येही वृक्षारोपण संस्थेच्या संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या क्रीडा संकुलातही मान्यवरांच्या हस्ते डॉ. गोपाळराव पाटील त्यांच्या अस्थींचे विसर्जन वटवृक्षाचे रोपण करून करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य व मान्यवर उपस्थित होते. होते. त्यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक राहिले आहे. शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या प्रशालेत डॉ. गोपाळराव पाटील यांच्या स्मरणार्थ वट वृक्षाचे रोपण करून त्यांच्या अस्ति व रक्षा यांचे जमिनीत विसर्जन करण्यात आले. या वटवृक्षाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या संदेशाबरोबरच डॉ. गोपाळराव पाटील यांचे स्मरण व त्यांच्या कार्याची प्रेरणा सतत मिळत राहील यासाठी असा अनोखा उपक्रम प्रशालेच्या वतीने राबविण्यात आला. प्रशालेच्या विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रशालेचे पर्यवेक्षक संतोष गुरव यांच्या हस्ते प्रशालेच्या प्रांगणात वटवृक्षाचे रोपण करून डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अस्थी व रक्षा यांचे विसर्जन करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## महापालिकेची मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लातूर शहर महानगरपालिका, स्वच्छता विभागामार्फत दि. ५ एप्रिलपासून शहरातील मान्-सूनपुर्व नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आली असून शहरातील मोठे व छोटे नाले जेसीबीमार्फत साफ करुन कचरा उचलून घेण्याची कार्यवाही चालू आहे. आजतागायत ४ मोठे नाले व २० छोटे नाले जेसीबीमार्फत साफ करण्यात आले आहे.

तसेच दि. २३ एप्रिल रोजी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी मान्सून पुर्व नाले सफाईच्या कामाची पाहणी प्रभाग क्रमांक ४ मधील इस्लामपुरा झोपडपट्टी तसेच इस्लामपुरा काझी यांच्या शेतातील कच्चा नाला व रिंग रोड, सम्राट चौक, डि-मार्ट परीसराची पाहणी केली. पाहणी दरम्यान मान्सून पुर्व नाले सफाई करावयाच्या उपाय योजनेबाबत संबंधीताना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

## ५२ वर्षांनंतर सवंगड्यांच्या मैत्रीचा सुवर्णोत्सव



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लातूर : काळाच्या ओघात अनेक गोष्टी बदलतात पण मैत्रीचे बंध अधिक घट्ट होतात. याचाच प्रत्यय लातूरमध्ये आला. छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील १९७४ च्या 'यंत्र अभियांत्रिकी' बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ५२ वर्षांनंतर एकत्र येत मैत्रीचा सुवर्णोत्सव साजरा केला. येथील एका रिसोर्टमध्ये २१ ते २३ मार्च या कालावधीत आयोजित या स्नेहमीलन सोहळ्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला. या सोहळ्यात १९ वर्गमित्रांनी सहभाग घेतला. या सर्वांनी सिद्धेश्र्वर मंदिर, गंजगोलाई, दत्तमंदिर आणि अष्टविनायक मंदिराचे दर्शन घेऊन 'लातूर दर्शन' घडवले. या स्नेहसंमेलनात सुभाष वासडीकर, सुरेश अट्टल, सुधन आग्रवाल, सुरेश कुलकर्णी, दिगंबर कुलकर्णी, मधुकर कुलकर्णी, प्रभाकर उडाणशिव, सुभाष छल्लावार, विजय सुवर्णकार, सुरेश दाभाडकर, प्रमोद मायभाटे, काशिनाथ पाटील, विजय दोशी, मारुती लद्दे, हरिश्र्चंद्र कुलकर्णी, संभाजी सिंदगे, किशन कंदरफळे, माणिक वाघमोडे, सुभाष सुळे या मित्रांनी सहभाग घेतला.

## वैद्यकीय-इंजिनिअरिंग पलीकडेही करिअरच्या संधी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** जेएस-पीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने दहावी व बारावी वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणातील करिअर संधींसह इतर विविध क्षेत्रांतील करिअर संधींबाबत विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य गोविंद शिंदे यांनी शाळेच्या वतीने संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांना विविध नवीन विद्याशाखांची ओळख करून देत त्या माध्यमातून करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नियमित मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून पितांबरे आयएस इन्स्टिट्यूटचे संचालक प्रीतम पितांबरे यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणासोबतच एमपीएससी आणि यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्याच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## खरा विकास काय असतो हे भाजपाने दाखवून दिले

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यानंतर रेणापूर तालुका पोरका झाला होता. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या कार्यकाळात विकास शोधावा लागत होता मात्र केंद्रात, राज्यात परिवर्तन झाले आणि ग्रामीण भागात खरा विकास काय असतो हे विविध योजनेच्या माध्यमातून भाजपाच्या नेतृत्वातील सरकारने दाखवून दिले असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.



केंद्रीय निधी योजनेअंतर्गत रेणापूर तालुक्यातील कारेपुर सय्यदपूर धवेली कवठाळी आनंदवाडी ते राज्य रस्ता दरम्यानच्या २५ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांच्या शुभ हस्ते गुरुवारी सायंकाळी मौजे सय्यदपुर येथे झाले.

यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते बळीराम चप्पे हे होते. याप्रसंगी माजी आमदार त्रिंबकनाना भिसे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, रेणापूर पंस सभापती सौ. मोनिका सुर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई अकनगिरे, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, पंस सदस्या सौ. अंजली काळे, सौ. शितल राऊतराव भाजपाचे ओमप्रकाश गोडभरले, भागवत सोट, अनिल भिसे, सुरज शिंदे, सुकेश भंडारे, ॲड. दशरथ सरवदे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कारेपूर ते आनंदवाडी या दरम्यानच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने जनतेच्या मागणीमुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून निधी उपलब्ध करून रस्त्याच्या कामाचा आज प्रत्यक्षात शुभारंभ होतोय, तेही अठरा फुटाचा डांबरीकरणाचा रस्ता दर्जेदार होत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस वाल्यांनी मुरूमाचे एकही टोपलं टाकलं नाही. काँग्रेसच्या काळात विकासाची कामे शोधावी लागत होती मात्र शासनाच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी आणण्यात यश आले याचे मोठे समाधान आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



## संक्षिप्त...

## 'जागतिक वसुंधरा दिन' निमित्त भव्य स्वच्छता व जनजागृती अभियान



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि.२४ एप्रिल :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हाकेतांडा ता.रेणापूर जि.लातूर येथे 'जागतिक वसुंधरा दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, सुरेंद्र गोडभरले, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव,रेणापूर तालुका गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया,शिक्षण विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने यांच्या सूचनेनुसार शाळा परिसर व गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदान केले. कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वीमातेच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वच्छता रॅली काढून स्वच्छ गाव - सुंदर गाव, वृक्ष लावा, पृथ्वी वाचवा अशा घोषणा देत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक भाषणे व घोषवाक्ये सादर करून उपस्थितांना विचार करायला भाग पाडले.श्रमदान उपक्रमात शाळा परिसरातील कचरा गोळा करणे, प्लास्टिक मुक्ती अभियान, झाडांच्या परिसराची साफसफाई अशा विविध कामांचा समावेश होता. ग्रामस्थांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांसोबत हातभार लावला.

या प्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत आजची स्वच्छता ही उद्याच्या निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे असे सांगितले. विद्यार्थ्यांनीही स्वच्छता राखण्याचा व पर्यावरण जपण्याचा संकल्प केला.तसेच शाळेचे मुख्याध्यापक गणेश सावळकर, जाकीर शेख , बालाजी सावळकर यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून, स्वच्छता आणि हरित उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. तांड्यात सकरात्मक बदलाची सुरुवात झाली याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष त्र्यंबक राठोड, अंबादास राठोड, ,काशिनाथ राठोड, शिवाजी चव्हाण, विश्र्वनाथ राठोड, योगेश जाधव, हरिचंद्र राठोड, राजकुमार राठोड, मीरा राठोड, सुमनबाई राठोड, इत्यादीनी परिश्रम घेतले या उपक्रमाबद्दल रेणापूर केंद्राचे केंद्रप्रमुख गोविंद चौधरी,केंद्रीय मुख्याध्यापक गोपाळ पडिले, शिक्षण विस्तार अधिकारी संजय देशपांडे, यांनी कौतुक केले.

## व्ही. एस. पँथर्सतर्फे ७ व्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या भित्तीपत्रकाचे विमोचन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२४ एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ७ व्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या भिंतीपत्रकाचे विमोचन येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के उपस्थित होते. त्यांच्या हस्ते भिंतीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक रवि कुरील, संपर्कप्रमुख आनंद जाधव, मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे, विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ, विद्यार्थी आघाडी शहराध्यक्ष असद शेख, कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, जिल्हा उपाध्यक्ष आबा गायकवाड, तसेच विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सचिन मस्के म्हणाले, हे भिंतीपत्रक गावखेड्यांच्या शेवटच्या घरापर्यंत पोहोचले पाहिजे, जेणेकरून सर्वसामान्य

नागरिकांना या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची माहिती मिळेल. भिंतीपत्रक हे जनजागृतीचे प्रभावी माध्यम असून पदाधिकाऱ्यांनी ते प्रत्येकापर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान अनेक युवकांनी संघटनेत प्रवेश केला. त्यांचे स्वागत सचिन मस्के यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी चाकूर तालुका अध्यक्ष अजय वाघमारे, निलंगा तालुकाध्यक्ष धनराज सुरवसे, औसा शहराध्यक्ष महेश कांबळे, वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार, ऑटो युनियनचे गणेश कसबे, शहर उपाध्यक्ष संजय सुरवसे, तसेच करण कांबळे, प्रतीक कांबळे, नारायण चव्हाण, युनुस शेख, गौसदीन शेख, मोहन मस्के, राजू पठाण यांच्यासह जिल्हाभरातील अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भटक्या जाती, जमातींसाठी योजना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२४ एप्रिल :** विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक, सामाजिक उन्नतीसाठी स्थापन केलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. यात वडार, रामोशी, गवळी, नाथपंथीय, लोहार, विणकर समाजासाठी विविध महामंडळे असून, या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, १ लाख रुपये थेट कर्ज योजना आणि २५ टक्के बीज भांडवल योजना राबविल्या जात आहेत. प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्रादेशिक व्यवस्थापक पी. एम. झोंबाडे यांनी केले.

# विनापरवाना बॅनरबाजी करणाऱ्यांवर होणार १० हजारांची दंडात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि.२४ एप्रिल :** शहरातील विद्रुपीकरण रोखण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने नगर परिषद प्रशासनाने बॅनरबाजी संदर्भात अत्यंत कडक नियमावली जाहीर केली आहे. यापुढे शहरात कुठेही विनापरवाना बॅनर लावल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती आणि बॅनर प्रिंटरवर १० हजार रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



निलंगा नगर परिषद येथे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, मुख्याधिकारी आणि शहरातील सर्व प्रेस मालक बॅनर प्रिंटिंग व्यावसायिक यांची एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत शहराच्या शिस्तीसाठी काही महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले या

बैठकीत पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक या मुख्य चौकात बॅनर लावण्यासाठी आता २०१० ही साईज निश्र्चित करण्यात आली आहे. यापेक्षा मोठ्या आकाराचे बॅनर लावण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

या पुढे निलंगा येथील शिवाजी महाराज चौकात बॅनर लावण्यासाठी २०० रुपये कर (फी) भरणे अनिवार्य आहे.

शहरात अन्य कोणत्याही ठिकाणी बॅनर लावायचे असल्यास नगर परिषदेची रीत-सर परवानगी घेऊन आणि २०० रुपये फी भरूनच बॅनर लावता छत्रपती शिव-ाजी महाराज चौकातील 'मावळ्यांच्या' पुतळ्यासमोर बॅनर लावण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

परवान्याशिवाय बॅनर लावल्यास किंवा नियमापेक्षा जास्त मोठ्या आकाराचे बॅनर लावल्यास १०,००० रुपये दंड आकारला जाईल. बॅनर प्रिंटिंग करणाऱ्या व्यावसायिकांनी ग्राहकाकडे नगर परिषदेची परवानगी असल्याचे खात्री करूनच प्रिंटिंग करावे. नियमांचे उल्लंघन करून बॅनर छापल्यास आणि लावल्यास संबंधित मालकावरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. शहराचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी आणि रहदारीला अडथळा होऊ नये यासाठी हे नियम करण्यात आले आ-हेत. सर्व नागरिकांनी आणि राजकीय कार्यकर्त्यांनी नगर परिषदेला सहकार्य करावे, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल.असा इशारा नगर परिषद प्रशासनाने दिला आहे

## लातूरातील रिंगरोडचे काम तात्काळ सुरु करावे आ. अभिमन्यू पवार यांचा रस्ते व पुलांसाठी पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**

औसा **दि.२४ एप्रिल :** लातूर शहर व औसा मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव शरद



राजभोग व संबधित अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. यावेळी रिंगरोडसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीवरील रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्यासाठी,उजनी - ककासपुर रस्त्यावरील तेरणा नदीवर ब्रिज कम बंधारा पुल उभारण्यासाठी व राष्ट्रीय महामार्गापासून उजनी गावापर्यंत सिमेंट रस्त्याच्या कामाबद्दल चर्चा करण्यात आली.

या बैठकीत लातूर शहरासाठी प्रस्तावित ६० किमी रिंगरोड प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. यापैकी ४८ किमी भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित १२ किमीचे काम प्रलंबित आहे. संपादित जमिनीवरील रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे. तसेच उर्वरित भूसंपादन लवकर पूर्ण करावे.अशी मागणी आमदार पवार यांनी केली.याशिवाय, उजनी-ककासपूर रस्त्यावर तेरणा नदीवरील पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली असून ते ब्रिज कम बंधारा स्वरूपात उभारण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग ते उजनी गावापर्यंत सिमेंट रस्त्याचे काम मंजूर करण्याबाबतही चर्चा झाली.

औसा विधानसभा मतदारसंघातील काही जिल्हा मार्गांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी करण्यात आली. तसेच 'पुरहानी' अंतर्गत रस्त्यांची सुधारणा व पुलांची दुरुस्ती करण्यासाठी सादर प्रस्तावाला मंजुरी देण्यावरही भर देण्यात आला.या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संतोष शेलार आणि मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे लातूर आणि औसा परिसरातील वाहतूक सुविधा सुधारण्यास मोठी मदत होणार असून स्थानिक विकासाला चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

## गोठ्याला लागलेल्या आगीत सात जनावरे भस्मसात, दहा लाखाचे नुकसान, सहकार मंत्री पाटील यांनी केली १ लाख रुपयांची मदत

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि.२४ एप्रिल :** चाकूर तालुक्यातील जानवळ येथील एका शेतकऱ्याच्या गोठ्याला आग ला-गून त्या गोठ्यातील सात जनावरे भस्मसात झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी दुपारी दीडच्या सुमारास घडली असून त्या शेतकऱ्यांचे दहा लाख रुपयाचे आर्थिक नुकसान झाले आहे.यामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. दरम्यान राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शेतकऱ्याप्रति सहानुभूती दाखवीत वैयक्तिक १ लाख रुपयाची आर्थिक मदत केली आहे.



जानवळ येथील शेतकरी ज्ञानोबा भोजने यांचे गा-वापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावर गट नंबर ३५९ मध्ये अडीच एकर जमीन आहे. यामध्ये त्यांनी जनावरे बांधण्यासाठी व शेतीचे अवज-ारे ठेवण्यासाठी गोठा बांधला होता. गुरुवारी २३ एप्रिल दुपारी १ वाजून ४० मिनिटाला तळपत्या उन्हात गोट्याला अचानक आग लागून ३ जर्सी गायी, २ वासरे व २ गोरे तसेच २१ कट्टे सोयाबीन, विद्युत वायराचे बंडल, जनावरांचा कडबा व शेतीचे आवजारे जळून खाक झाले आहे. यामध्ये एक गोरे जवळपास ७० ते ८० टक्के भाजल्याने त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती ज्ञानोबा भोजने यांचा मुलगा शिवशंकर भोजने यांनी दिली. यामध्ये शेतकऱ्यांचे दहा लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी घटनास्थळाला भेट देत पाहणी केली असून भोजने या शेतकऱ्याला वैयक्तिक १ लाख रुपये मदत करून प्रशासनातील अधिकारी यांना सदरील शेतकऱ्याला योजनेच्या माध्यमातून शासनाकडून गोठा व दुधाळ जनावरे देण्यात यावे असे सांगितले. यावेळी तहसीलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जिल्हा परिषद कृषी सभापती कविताताई गोरे, रणजित पाटील, सरपंच भागवत कुसंगे, दत्ता पवार, प्रा.यादव कर्डीले, उमेश कर्डीले, पशुसंवर्धन अधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम



**तभा वृत्तसेवा**

औसा **दि.२४ एप्रिल :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्या-पीठ लोणेरे व्दारा घेण्यात आलेल्या बि. टेक. प्रथम वर्षाचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे. या हिवाळी परिक्षेत औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्र्वेश्र्वर शिक्षणप्रसारक मंडळ द्वारा संचलित विश्र्वेश्र्वरय्या इन्स्टिट्यूट आफ इंजिनिअरिंग अण्ड टेक्नालाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या वर्षीही घवघवीत यश मिळवून यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

कॉम्प्युटर सायन्स अण्ड इंजिनीअरिंग (आर्टिफिशीयल इंटेलिजन्स अण्ड डाटा सायन्स) विभागातुन श्रावणी मुंजाळ ८.६१गुण घेत प्रथम आली आहे. स्नेहल बारबोले ८.०४ व्दितीय तर मधुरा नागराळे ७.८९ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे. सिव्हील इंजिनीअरिंग शाखेतुन सुदर्शन पारवे ८.४१ गुण घेऊन प्रथम, ऋतुजा पवार ७.७२ तर माहेश्र्वरी कांबळे ७.५९ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स अण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातून रक्षा माने ८.४१ सि.जी.पी.ए. गुणांकनाने प्रथम, सुमती मिरगळे ७.७६ व्दितीय तर नंदिनी माळी ७.७२ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे.

या यशाचे गमक विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे शैक्षणिक वातावरण आहे. महाविद्यालयात नियमित शैक्षणिक उपक्रम, अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग, प्रात्यक्षिकांवर भर आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्य प्रशांत धाराशिवे, विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. चंद्रशेखर चरकपल्ले, प्रा. पिंड, प्रा. उदय खामकर उपस्थित होते. तसेच प्रा. अश्र्विनी धाराशिवे, प्रा. श्रध्दा बिडवे प्रा. हेंगणे, प्रा. प्रसाद चंदनशिवे, प्रा. सादिया कुरेशी सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले आहे.

## सानिया सारबान यांचे राष्ट्रीयस्तरावरील निबंध स्पर्धेत उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि.२४ एप्रिल :** तालुक्यातील औराद शहा-जानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील सानिया महताब सारबान (बी. कॉम.द्वितीय वर्ष) यांनी राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक संपादन करत उज्ज्वल यश मिळविले. इंदिरा गांधी (वरिष्ठ) महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड येथे दि.२३ रोजी आयोजित पारितोषिक वितरण समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुर्गेश रवंदे यांच्या हस्ते सानिया सारबान यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व एक हजार रूपयाचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सानिया सारबान यांच्यासमवेत मा.दी.मं. महाविद्यालयाच्या वतीने डॉ.प्रदीप पाटील उपस्थित होते.




महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीच्या निमित्ताने इंदिरा गांधी (वरिष्ठ) महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड व डॉ.आंबेडकर फाऊंडेशन, नवी दिल्ली (सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत स्वायत संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धे त 'सामाजिक समतेचे अग्रदूत : क्रांतीसूर्य महात्मा फुले' या विषयावर सानिया सारबान यांनी मराठी भाषेत आपला निबंध लिहून सादर केला होता.

शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे, डॉ.सचिन हंचाटे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.विनोद चिंते, डॉ.रितेश व्यास, डॉ.सत्यशीला जोंधळे, डॉ.अश-ोक नारनवरे, डॉ.भगवान कदम यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सानिया सारबान यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## विश्व हिंदू परिषदेकडून जाहीर निषेध

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि.२४ एप्रिल :** राज्यातील नाशिक, अमरावती व पुणे येथे घडलेल्या घटनांच्या निषेधार्थ उदगीर येथे विविध सामाजिक व धार्मिक संघटनांच्या वतीने शुक्रवारी निषेध मोर्चा काढून उपजिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन सादर करण्यात आले. संबंधित घटनांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कडक व प्रभावी कायदा करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शहरातील दुधी हनुमान मंदिर येथे सकाळी १०.३० वाजता सर्व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र जमले. त्यानंतर घोषणाबाजी करत मोर्चाच्या स्वरूपात उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्थान करण्यात आले. मोर्चामध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. विश्र्व हिंदू परिषदेचे प्रांत कार्यकर्ते संतोषजी कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी ह.भ.प. उद्धव महाराज हैबतपुरे, नगरसेवक मनोजदादा पुदाले, राजकुमार हुडगे, आनंद बुंदे, उत्तराताई कलबुर्गे, शामलाताई कारामुंगे, पांढरेताई, अमोल अणकल्ले, मोतीलाल डोईजोडे, प्रशांत मांगुळकर, रामचंद्र बिरादार सर, सचिन साबणे, कैलास पाटील, डॉ. रवी मुळे, श्रीनिवास सोनी, सतीश राजेंद्र पाटील, कृष्णा बोईनवाड, प्रमोद शेटकार, सुरेंद्रभाई अक्कणगिरे, रामेश्र्वर चांडेश्र्वरे, परिमल बेद्रे, शिवकुमार उपरबावडे, प्रशांत घोलप, विजयकुमार स्वामी, अनिल पंचाक्षरी, नवनाथ गायकवाड, विक्रम हलकीकर, शुभम सुपारे, प्रशांत ममदापूर, सागर पांढरे, शिवा आडे, राजेश शेटकार, आनंद महामुनी, ओमप्रकाश तानशेट्टे, श्रीपाद करंजीकर, बालकुंदे सर, दिनेश देशमुख देवनाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# समाज हितासाठी लिंगायत समाजाने एकसंघ होणे काळाची गरज. प्रा.मनोहर धोंडे

**तभा वृत्तसेवा**

**शिरुर अनंतपाळ दि.२४ एप्रिल :** लिंगायत समाजाने एकत्र येऊन येणा-या जनगणनेमध्ये विरशैव लिंगायत धर्म असे नोंद करावे असे आवाहन अखिल भारतीय शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले.ते शिरूर अनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्र्वर चौक येथे अखिल भारतीय विरशैव लिंगायत संघटनेच्या वतीने भव्य लिंगायत समाज मेळावा व लातूर जिल्ह्यातील नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विजयी झालेल्या लिंगायत (उपजातीसह) नुतन लोकप्रतिनिधींचा सत्कार समारंभ शिवा संघटनेच्या वतीने आयोजित मेळाव्यात बोलत होते.

संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी व्यासपीठावर खासद-ार डॉ.शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला या वेळी व्यासपीठावर आचार्य गुरूराज स्वामी महाराज अहमदपूरकर, शंकरलिंग शिवाचार्य महाराज,किर्तन केसरी भगवंतराव पाटील चाभंरगेकर,ड संभाजीराव पाटील,ड जयश्रीताई पाटील,डॉ.अरविंद भातांब्रे,डॉ.बाळासाहेब पाटील,नगराध्यक्षा चंद्रकला शिवणे, राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता



खंकरे, सरचिटणीस उमाकांत शेटे आदी मान्यवर उपस्थित होते .

पुढे बोलताना श्री प्रा. धोंडे म्हणा-ले जनगणनेच्या वेळी जातीची नोंदीच्या रखाण्यासमोर लिंगायत शब्द जोडून आपापली उपजात नोंद करावी अक्षयतृतीयाला देशभरात महात्मा बसवेश्र्वर यांची शासकीय जयंती साजरी करा व कर्नाटकातील बालकल्याण या ठिकाणी महात्मा बसवेश्र्वर यांनी १२ व्या शतकात मुळ. अनुभव मंटपम व परशू कट्टा मुक्त करावे व जगभरातील पर्यटकांना पहाण्यासाठी खुला करावे या दोन मागण्या करिता शिवा संघटना दिल्ली येथील ताल कटोरा स्टेडियमवर जानेवारी २०२७ मध्ये भव्य मोर्चा काढणार असल्याचे सांगितले लिंगायत समाजाने एकजूट होणे ही काळाची गरज आहे. कारण हा समाज सामाजिक, धार्मिक, राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. महात्मा बसवेश्र्वराच्या समतावादी तत्त्वज्ञानाचा वारसा सांगणारा हा समाज आपल्या मूळ ओळखीसाठी आणि हक्कासाठी संघटित होणे आजच्या काळाची गरज आहे. असे प्रतिपादन अखिल भारतीय शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मनोहर धोंडे यांनी केले. ते पुढे बोलताना म्हणाले की, लिंगायत हा हिंदू धर्मातील एकेश्र्वरवादी पंथ असून तो स्वतंत्र आहे. असे मानले जाते. अनेक लिंगायत अनुयायी लिंगायत धर्म हा हिंदू धर्माहुन वेगळा असल्याचे प्रतिपादन करतात. आणि त्यासाठी स्वतंत्र धार्मिक दर्जा मिळण्यासाठी एकत्रित येण्याची गरज आहे. लिंगायत समाज हा कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सिमा भागात लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा आहे. या समाजाला आपले हक्क, आरक्षण आणि सरकारी योजनांचा लाभ मिळवून घेण्यासाठी एकसंध राजकीय शक्ती म्हणून उभे राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. महात्मा बसवेश्र्वर यांनी अठराव्या शतकात समता, कष्टाचे महत्त्व (कायक) आणि समतेचे महत्त्व सांगितले. या पुरोगामी विचारांचे जतन करण्यासाठी समाजाला एकत्रीकरण आवश्यक आहे.

लिंगायत समाजात वीरशैव, लिंगायत अशा विविध पोटजाती असून, अनेकदा मतभेद दिसून येतात. या सर्व उपजातींनी आपल्यातील भेद विसरून लिंगायत म्हणून एकजूट दाखवणे काळाची गरज आहे,

## भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या कारच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

बसवराज लिंबराज मेनकुदळे (वय ३४, रा. बारूळ, ता. तुळजापूर) हे दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी मोटरसायकल (क्र. एमएच १४ जी १७४१) वरून जात असताना कार (क्र. एमएच १४ बीआर १४९७) चालकाने समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात मेनकुदळे यांचा मृत्यू झाला.



तसेच दुसरी मोटरसायकल (क्र.एमएच २५ एम ९११४५) चालक शिवराज माणिक भुजबळ (वय ३०, रा. वडगाववाडी, ता. लोहारा) यांनाही धडक बसून ते गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर कार चालकाने जखमींना उपचारासाठी न नेता घटनास्थळावरून पळ काढला.

या प्रकरणी सोनाली बसवराज मेनकुदळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


# तुळजाभवानी मंदिरात नियमभंग; पुजाऱ्यावर ५ वर्षांची प्रवेशबंदी

### सुरक्षा कंपनीला दंड...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या नियमांचे उल्लंघन करून अतिरिक्त सिंहासन पूजा केल्याप्रकरणी संबंधित पुजाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे. पुजारी अभिजीत कुतवळ यांना ५ वर्षांसाठी मंदिर प्रवेशबंदी घालण्यात आली असून, मंदिरातील खासगी सुरक्षा रक्षक कंपनीला १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

मूर्तीची झीज टाळण्यासाठी दररोज सकाळी ५ आणि सायंकाळी २ अशा मर्यादित सिंहासन पूजांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. मात्र दि. २१ एप्रिल रोजी सकाळच्या वेळेत नियम मोडून सहावी सिंहासन पूजा करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. सिंहासन



पूजेसाठी असलेल्या दीर्घ प्रतीक्षेमुळे हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

या घटनेच्या वेळी सुरक्षा निरीक्षक, सहायक सुरक्षा निरीक्षक, धार्मिक व्यवस्थापक आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. त्यामुळे संबंधित सर्वांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी मंदिर प्रशासनाने सुरक्षा निरीक्षकांकडून लेखी खुलासा मागवला आहे. त्यानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांनी दिली. दरम्यान, पुरातत्त्व विभागाने मूर्तीच्या संरक्षणासाठी कडक नियम लागू केले आहेत. यामध्ये अभिषेक पूजेवर निर्बंध, शुद्ध हळद-कुंकू व दहीचाच वापर, मुलायम कापड व ब्रशचा वापर तसेच अभिषेकावेळी मूर्तीवर चांदीचे आवरण घालण्याचे निर्देश आहेत. नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे कडक कारवाई करण्याची मागणीही पुढे येत आहे.

या प्रकरणामुळे मंदिरातील व्हीआयपी पास व्यवस्था आणि नियमांची अंमलबजावणी पुन्हा ऐरणीवर आली असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रांजणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.२४ एप्रिल -**

कळंब तालुक्यातील रांजणी येथे दि.२३ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, गणेश पवार, शफिउल्ला पटेल, मतीन पटेल आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जयंतीनिमित्त सजवलेल्या रथातून मुख्य चौकातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत ढोल-ताशे, लेझीम व झांज पथकांसह चवदार तळे, भगवान गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकर यांचे देखावे सादर करण्यात आले होते.

## मूर्ता शिवारात विद्युत टॉवर कापून १.२० कोटींचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील मूर्ता शिवारात विद्युत टॉवरचे लोखंडी खांब कापून सुमारे १ कोटी २० लाख रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तसेच खंडणीची मागणी केल्याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याप्रकरणी निखली भगवान पाटील (रा. मूर्ता, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



खंडणीप्रकरणी गुन्हा दाखल

फिर्यादी पार्थ जनकराव त्रिवेदी (वय ३०, व्यवसाय - इलेक्ट्रिक इंजिनियर, मूळ रा. सुरेंद्रनगर, गुजरात; सध्या लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हा प्रकार उघडकीस आला.

दि.२२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजण्यापूर्वी आरोपीने मूर्ता शिवारातील गट नं. २९७/२ मधील शेतात फिर्यादीकडे आणखी १० लाख रुपयांची खंडणी मागितली. पैसे न दिल्यास विद्युत टॉवर कापून नुकसान करण्याची धमकी दिली.

त्यानंतर टाटा पॉवर रिन्युएबल एनर्जी लिमिटेड कंपनीचा १३२ के.व्ही. क्षमतेचा विद्युत वाहक टॉवर सुरू स्थितीत असतानाही आरोपीने गॅस कटरच्या सहाय्याने टॉवर क्रमांक २१ चे चारही लोखंडी खांब कापले.

या प्रकारामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि.२३ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०८(२), ११०, ३२४(५), १२५ तसेच कलम १३९, १४० भारतीय विद्युत अधिनियम आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## धाराशिवात जात पंचायत प्रकरण; मारहाण व जबरदस्तीने ६० हजार उकळल्याचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्यात जात पंचायत बसवून महिलेस व तिच्या मुलास मारहाण करून जबरदस्तीने पैसे उकळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सागरबाई जगु पवार, ज्योती ज्योतीराम पवार, ज्योतीराम जगु पवार व प्रियंका गणेश पवार (रा. जुना बसडेपो, दुध डेअरी पाठीमागे, धाराशिव; सध्या पंचनगर, घाटकोपर, मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी गायत्री शाम चव्हाण (वय ३५) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी तुझा मुलगा आमच्या देवाच्या कार्यक्रमात जेवला, त्यामुळे आमच्यावर देव कोपला व आमच्या मुलाचा अपघात झाला असा आरोप करत त्यांना तेरखेडा येथील लक्ष्मी पारधी पिडी येथे नेले.

तेथे जात पंचायत बसवून फिर्यादी व तिच्या मुलास शिवीगाळ करत चप्पलने मारहाण करण्यात आली.

तसेच फिर्यादी व तिच्या मुलास दोषी ठरवत २ लाख ५५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्यापैकी तत्काळ ६० हजार रुपये न दिल्यास उचलून नेऊन जिवे मारू अशी धमकी देत जबरदस्तीने ६० हजार रुपये उकळल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि. २० एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## वंदना हुंडेकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**



येथील वंदना प्रतापराव हुंडेकर वय ६९ वर्षे यांचे अल्पशा आजाराने दि.२४ एप्रिल शुक्रवार रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पाश्चात एक मुलगा दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर तुळजापूरात अंत्यसंस्कार करण्यात आले. एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रवीण प्रतापराव हुंडेकर यांच्या त्या मातोश्री होत्या.

## धाराशिवात 'आपदा मित्र' प्रशिक्षणाला वेग; 'सखी' उपक्रमातून महिलांना नवे बळ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

आपत्तीच्या काळात तात्काळ व परिणामकारक प्रतिसाद देण्यासाठी 'आपदा मित्र' स्वयंसेवकांचे प्रशिक्षण धाराशिव येथे वेगाने सुरू असून, यामध्ये 'सखी' प्रशिक्षण उपक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे महिला सक्षमीकरणासोबतच आपत्ती व्यवस्थापनातील त्यांच्या सहभागालाही चालना मिळत आहे.




प्रशिक्षणादरम्यान वरूडा रोडवरील धरण परिसरात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्रशिक्षण अधिकाऱ्यांनी पूरस्थितीत बचावकार्य, पाण्यात अडकलेल्या व्यक्तींना सुरक्षित बाहेर काढणे, दोरीच्या साहाय्याने रेस्क्यू तंत्र तसेच प्राथमिक उपचार यांचे सविस्तर मार्गदर्शन केले. या सरावामुळे प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष परिस्थितीत काम करण्याचा आत्मविश्वास मिळत आहे. 'सखी' प्रशिक्षणांतर्गत महिलांना स्वसंरक्षण, आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णयक्षमता आणि इतरांना मदत करण्याचे कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे महिलांची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका अधिक सक्षम होत असल्याचे दिसून येत आहे.यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करत होते. 'आपदा मित्र' आणि 'सखी' या दोन्ही गटांतील प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

## राष्ट्रीय भू-अलंकरण दिनानिमित्त तुळजापूरात आकर्षक रांगोळी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

राष्ट्रीय भू-अलंकरण दिनानिमित्त तुळजापूर येथील डुल्या मारुती मंदिर परिसरात संस्कार भारती संयोजन समितीच्या वतीने आकर्षक व देखणी रांगोळी साकारण्यात आली. विविध रंगांच्या माध्यमातून साकारलेल्या या रांगोळीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

संस्कार भारतीच्या वतीने दरवर्षी २२ एप्रिल रोजी देशपातळीवर राष्ट्रीय भू-अलंकरण दिन साजरा केला जातो. याच अनुषंगाने धाराशिव जिल्हा समितीच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर येथे हा उपक्रम पार पडला. यावेळी नगरसेविका प्रगती कदम



यांनी शहरवासीयांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास प्रांत सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी, दृश्य विधा प्रमुख शेषनाथ वाघ, प्रांत चित्रकला प्रमुख पद्माकर मोकाशे, जिल्हा उपाध्यक्ष प्रफुल्ल कुमार शेटे, विनोद खपले, कालिदास कदम, बंडोपंत पाठक, बाळासाहेब शामराज, हनुमंत साठे, विवेकानंद कनगरकर, अविनाश धट आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान गीत गायनही सादर करण्यात आले. आभार प्रदर्शन संगीता रसाळ यांनी केले.

संस्कार भारतीकडून देण्यात आलेल्या रांगोळीच्या प्रारूपानुसार अध्यक्ष अपर्णा शेटे, जिल्हा भू-अलंकरण प्रमुख लक्ष्मीकांत सुलाखे व पद्माकर मोकाशे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कलाकारांनी रांगोळीचे रेखाटन केले. यामध्ये प्रफुल्ल कुमार शेटे, माधुरी कनगरकर, गीता व्यास, गीता रसाळ, रतन मस्के, महेश कुलकर्णी, अविनाश धट, डॉ. सतीश महामुनी यांचा सहभाग होता. तसेच तालुक्यातील कलाकारांनी संस्कार भारतीचे सभासद होण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले.

## प्रतिबंधित गुटखा विक्रीप्रकरणी दोघांवर गुन्हा

**ढोकी, दि.२४ एप्रिल -**

प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३५ वाजण्याच्या सुमारास पळसप येथे ढोकी पोलीस पथकाने कारवाई करताना राजाभाऊ व्यंका माळी व सलीम आलम शेख (वय ४३, दोघे रा. पळसप, ता. जि. धाराशिव) यांच्याकडून विमल पान मसाला, व्ही-१ टोबॅको, बादशहा गुटखा, लक्झरी टोबॅको, के.एम-१ जाफरानी जर्दा असा एकूण १२,११० रूपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त केला.

## नळदुर्गात एसटी स्मार्ट कार्डच्या नावाखाली लूट; अधिकृत काउंटर सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

नळदुर्ग शहरात एसटीच्या स्मार्ट कार्ड काढण्याच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा प्रकार समोर आला असून ही लूट थांबवण्यासाठी बसस्थानकात तात्काळ अधिकृत स्मार्ट कार्ड काउंटर सुरू करण्याची मागणी होत आहे.





महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सवलतीच्या प्रवाशांसाठी स्मार्ट कार्ड सुरू करण्याची घोषणा केली आहे. मात्र, सर्व पात्र प्रवाशांकडे स्मार्ट कार्ड येईपर्यंत त्यांच्याकडे कार्ड नसले तरीही पूर्वीप्रमाणे सवलत मिळत राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तरीदेखील सोशल मीडियावर ठरावीक तारखेनंतर स्मार्ट कार्ड नसल्यास सवलत मिळणार नाही, अशा अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परिस्थितीचा फायदा घेत काही खाजगी एजंट स्मार्ट कार्ड काढण्यासाठी तब्बल ३०० रुपये आकारत असल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात स्मार्ट कार्डसाठी अधिकृत शुल्क किती आहे, हे महामंडळाने स्पष्टपणे जाहीर करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

त्यामुळे नळदुर्ग बसस्थानकात अधिकृत स्मार्ट कार्ड काउंटर तात्काळ सुरू करून नागरिकांची होणारी लूट थांबवावी, अशी जोरदार मागणी होत आहे. या काउंटरमुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

## तेरमध्ये जागतिक पुस्तक दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२४ एप्रिल -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील नरसिंह वाचनालयात गुरुवार, दि.२३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

या निमित्ताने वाचनालयाच्या वतीने तेर येथील पत्रकारांचा 'गोरोबाकाका' चरित्रग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी वाचन संस्कृती जपण्याचे आणि पुस्तकांशी नाते दृढ करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास गोरख माळी, इरशाद मुलानी, बापूराव नाईकवाडी, विकास भोरे, साहेबराव सौदागर, हनुमंत कोळपे, ग्रंथपाल मीना वडवले, स्वाती भक्ते, संगीता वैद्य, अश्विनी कोल्हे, बालिका भक्ते, सारिका पसारे तसेच वाचनालयाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माझा प्रभाग-माझी जबाबदारी उपक्रमांतर्गत पहिला जनता दरबार

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२४ एप्रिल -**

माझा प्रभाग - माझी जबाबदारी हे ब्रीद वाक्य घेऊन भूम नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक अनिल शेंडगे यांनी शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच जनता दरबार आयोजित केला. या दरबारात नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेत त्या अल्पावधीत सोडवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रविवार, दि.१९ एप्रिल रोजी जनशक्ती नगर विकास आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक अनिल नामदेव शेंडगे व नुरजहा महमद इसाक मणियार यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. जनता दरबारात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपापल्या समस्या लेखी स्वरूपात सादर केल्या.

प्रत्येक तक्रारीचे निराकरण लवकरच करण्यात येईल, असा विश्वास दोन्ही नगरसेवकांनी दिला.




यावेळी नगरसेवक शेंडगे यांनी विरोधकांवर टीका करताना, त्यांच्या कार्यकाळात विकासकामांपेक्षा ठेकेदारांना पोसण्यावर भर दिला गेला, असा आरोप केला. शौचालयांसाठी मोठ्या निधीचा वापर दाखवला गेला, मात्र प्रत्यक्षात स्वच्छतेचा अभाव असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जनता दरबारात नागरिकांनी घंटागाडीची वेळ, नाल्यांची स्वच्छता, अंडरग्राउंड ड्रेनेज, झाडांच्या फांद्या छाटणे, काँक्रीट रस्ते, भाजीपाला विक्रेत्यांची व्यवस्था, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, आठवडी बाजारातील अस्वच्छता, खेळाचे मैदान, धोकादायक पेवर ब्लॉक रस्ते, सीसीटीव्ही कॅमेरे, घरकुल योजना, तसेच बंद पडलेले वीज दिवे अशा विविध समस्यांचा पाढा वाचला.

प्रत्येक नागरिकाची समस्या लक्षपूर्वक ऐकून घेत, विकासात्मक मुद्द्यांवर पुढील जनता दरबारात ठोस कार्यवाही दिसून येईल, असा ठाम विश्वास शेंडगे यांनी व्यक्त केला. या उपक्रमाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून महिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती.

या कार्यक्रमास नगरसेवक यशवंतराजे थोरात, अनिस शेंडगे, नुरजहा मणियार, विठ्ठल बागडे, चंद्रमणी गायकवाड, रूपेश शेंडगे, दिलीप शाळू महाराज, केशव दाते, इसाक बागवान, नामदेव शेंडगे, शंकर खामकर आदी उपस्थित होते.

## वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ तातडीने सुरू करा; शासनाकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ तातडीने कार्यान्वित करावे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेतर्फे जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

दि.१० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता. राज्यातील सुमारे तीन लाख विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेने गेल्या पंधरा वर्षांपासून या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला आहे. शासनाने मंडळाला मान्यता दिली असली तरी अद्याप शासन निर्णय जारी झालेला नसून मंडळ प्रत्यक्षात कार्यान्वित झालेले नाही.

या पार्श्वभूमीवर संघटनेने उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे लवकरात लवकर शासन निर्णय काढून मंडळ सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी केली. आपले निर्णयक्षम नेतृत्व, जलद कार्यपद्धती आणि सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका पाहता आमच्या अपेक्षा आपल्याकडूनच आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी संघटनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष प्रदीप नागदे, रोहित थोरवे, गणेश भातुसे यांच्यासह रमेश बसगुंडे, विकास मदने, लहू पडवळ, सुरज बागल, दादासाहेब ननावरे, अशोक दुबे, मोहन वाघमोडे, हुसेन नूरसे, सुरेंद्र सकरगी, विलास मुळीक यांच्यासह आदि उपस्थित होते.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# चालत्या ट्रकमधून हरभऱ्याचे ११ कट्टे चोरी

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.२४ एप्रिल -**

चालत्या मालवाहू वाहनातून हरभऱ्याची चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत शिवराज धनराज थळकरी (वय ३०, रा. युसुफ वडगाव, ता. केज, जि. बीड) यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

थळकरी हे आयशर गाडी (क्र. एमएच १४ ईएम ०५२३) मधून नाफेड खरेदी केंद्र, 



शिंगोली (ता. कळंब) येथून हरभऱ्याचे ३६० कट्टे लातूर येथील वखार महामंडळाच्या गोदामात साठवण्यासाठी नेत होते.

दरम्यान, दि. १९ एप्रिल रोजी दुपारी १२ ते २० एप्रिल पहाटे १ वाजेच्या सुमारास ढोकी-पळसप पाटी परिसरात अज्ञात चोरट्यांनी चालत्या वाहनावर चढून ताडपत्री फाडली व ११ कट्टे (किंमत सुमारे ३२ हजार ३१२ रूपये) चोरून नेले.

या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# धाराशिवच्या औद्योगिक क्रांतीचा श्रीगणेशा

**▶▶ १५,४३० कोटींचा संरक्षण प्रकल्प उभारणार... ▶▶ ग्लोब फोर्ज लि. कंपनी करणार गुंतवणूक...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची घडामोड घडत असून कौडगाव परिसरात ग्लोब फोर्ज लिमिटेट (पूर्वीची निबे लिमिटेड) कंपनीकडून तब्बल १५,४३० कोटींची गुंतवणूक करून संरक्षण क्षेत्रातील भव्य उत्पादन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे धाराशिव आणि अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यांच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

या संदर्भात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील औद्योगिक वातावरणात मोठा बदल होणार असून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. धाराशिव जिल्हा केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता आता 'संरक्षण उत्पादन केंद्र' म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारच्या पाठबळामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा मोठा प्रकल्प जिल्ह्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, 



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे आभार मानले.

दरम्यान, या प्रकल्पामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. उद्योग, पायाभूत सुविधा आणि सेवा क्षेत्रातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक इतिहासात हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सतत केलेल्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शेतातील राजमा पीक जाळून २ लाखांचे नुकसान

**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

शेतातील उभ्या पिकाला आग लावून मोठे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संदीप शिवाजी गायकवाड (रा. गुंफावाडी, ता. जि. लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि.२२ एप्रिल पहाटेच्या सुमारास जागजी शिवारात फिर्यादी सचिन गायकवाड (वय ४२, रा. गुंफावाडी) यांच्या राजमा पिकाला आरोपीने आग लावली. यामध्ये स्प्रिंकलरचे १० पाइप, २ ताडपत्री व इतर साहित्य जळून सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाले.

## तामलवाडीत पोलिसांची धाडसी कारवाई; ४६ ग्रॅम एमडीसह दोघे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे पोलिसांनी धाडसी कारवाई करत दोन आरोपींना ४६ ग्रॅम एमडी (ड्रग्ज) सह ताब्यात घेतले. ही कारवाई तामलवाडी पोलिसांनी सोलापूर पोलिसांकडून मिळालेल्या गुप्त माहितीनुसार केली.



पुणे येथून कारद्वारे ड्रग्ज तस्करी होत असल्याची माहिती सोलापूर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी तामलवाडी पोलिसांना सतर्क केले. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या पथकाने परिसरात नाकाबंदी केली. पोलिसांना पाहताच संशयितांनी कारला यू-टर्न घेत तामलवाडी गावाच्या दिशेने पळ काढला.

या दरम्यान मुख्य आरोपी तोसिफ फरीद सय्यद (रा. कसबा पेठ, पुणे) हा कारमधून उतरून ज्वारीच्या शेतात पळून गेला, तर दुसरा आरोपी सुफयान शब्बीर फलारी (रा. पुणे) याने कार पिंपळा गावाच्या दिशेने नेली. मात्र, रस्त्यात कार बंद पडल्याने त्याने वाहन सोडून शेतात लपण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम राबवत दोघांचाही पाठलाग केला. कर्मचारी उमेश माने व गोपाळ सलगर यांनी सुमारे दोन किलोमीटर पाठलाग करून तोसिफ सय्यद याला पकडले. तो तामलवाडीतील पाणपोईजवळ पाणी पिताना नागरिकांच्या सतर्कतेमुळे ओळखला गेला. तर सुफयान फुलारी हा शेतातील विहिरीत लपून बसलेला आढळून आला, त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

आरोपींकडून ४६ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले असून दोघांनाही पुढील तपासासाठी सोलापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यापूर्वीही तामलवाडी परिसरात ड्रग्ज प्रकरण उघडकीस आले होते. त्यामुळे तुळजापूर तालुक्यात ड्रग्ज तस्करीचे जाळे सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत असून, पोलिसांकडून तपास अधिक तीव्र करण्यात येत आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### मोफत पाणपोयीचा शुभारंभ

**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

अक्षय तृतीया निमित्ताने तुळजापूर येथे एकनाथ फाउंडेशन यांच्या वतीने श्री तुळजाभवानी मंदिर येथे येणाऱ्या भाविकांसाठी मोफत पाणपोयी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना दिलासा देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी रवींद्र इंगळे, विकास जाधव, दीपक थोरात, प्रफुल्ल कुमार शेटे, लक्ष्मण माळी यांच्यासह ज्ञानेश्वर गवळी, अहमद अन्सारी, सचिन टेले, सुरज बागल, सतीश फत्तेपुरे, श्रीकांत कदम आदी उपस्थित होते.



### डॉक्टरांकडून ३०० पुस्तकांचे वाटप

**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जागतिक पुस्तक दिन निमित्त वाचन संस्कृतीला चालना देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम म्हणून बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या वतीने ३०० पुस्तके भेट देण्यात आली. जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेने ही पुस्तके अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्याकडे सुपूर्त केली. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय खुणे, सचिव डॉ. नितीन भोसले यांच्यासह डॉ. अभय शहापूरकर, डॉ. संजय सोनटक्के, डॉ. श्रीनिवास हंबिरे, डॉ. अभिजीत बागल आणि डॉ. अक्षय देशमुख उपस्थित होते. मान्यवरांनी या उपक्रमामागील सामाजिक जाणीव व शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित केली. बालरोग विभागातील डॉ. मनोज घोगरे, डॉ. शाम चौधरी आणि डॉ. निलोफर भोरी यांनी पुस्तके स्वीकारत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल, असे मत व्यक्त केले.

### ८० रुग्णांची तपासणी

**भूम, दि.२४ एप्रिल -**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन व नीती आयोगामार्फत फिरता दवाखाना मार्फत दि.२४ रोजी भूम तालुक्यातील ईट येथील बसस्थानक येथे सकाळी १० वाजता रुग्णाची मोफत तपासणी करण्यात आली. हा दवाखाना दोन दिवस सुरु असून यास राष्ट्रवादीचे सुनील देशमुख, बाबा भोसले यांनी या फिरत्या दवाखान्यात भेट दिली. यावेळी डॉ. मकबूल हनुरे, आरोग्य सेवक विकास खराडे, मोहन लोहार, राहुल जाधव, सिद्धेश्वर चौरे,आदी उपस्थित होते. या दवाखान्यात लॅब द्वारे तपासणी करण्यात आली शुगर एक्स-रे बीपी तपासून मेडिकल औषधे वाटप करण्यात आली. यावेळी आशा कार्यकर्ते वैशाली हाडुळे, छाया गायकवाड, मनीषा राऊत, निर्णला तमंचे, सत्यभामा कळसकर, आदिंनी परिश्रम घेतले.

### गोवंशीय वासरांची अमानुष वाहतूक

**परंडा, दि.२४ एप्रिल -**

गोवंशीय वासरांची निर्दयीपणे कोंबून वाहतूक करताना एकाला पोलिसांनी पकडल्याची घटना घडली 



आहे. याप्रकरणी तोफीक निसार मुलानी (वय ३५, रा. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास करमाळा-धाराशिव रोडवर रोसा गावाजवळ पिकअप (क्र.एमएच १२ डीटी ११२२) मधून ४० गोवंशीय वासरे कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती परंडा पोलिसांना मिळाली. तपासणीदरम्यान वासरांचे तोंड व पाय बांधून कमी जागेत कोंबून अमानुषरीत्या वाहतूक केली जात असल्याचे आढळले. पोलिसांनी सुमारे २ लाख रुपये किमतीची वासरे व ९ लाख रुपये किमतीचे वाहन असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## भूम तहसील कार्यालयात राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेत अनियमिततेचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२४ एप्रिल -**

भूम तहसील कार्यालयात राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीत अनियमितता झाल्याचा आरोप भारतीय काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून योजनेची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी तहसीलदार जयवंत पाटील यांना निवेदन देऊन करण्यात आली.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मार्च अखेरीस मंजूर झालेल्या ६ प्रस्तावांपैकी केवळ २ प्रस्ताव ऑनलाइन प्रणालीत दिसत असून उर्वरित ४ प्रस्ताव तांत्रिक अडचणीमुळे गायब झाले आहेत. परिणामी, मंजुरी मिळूनही संबंधित लाभार्थी कुटुंबांना आर्थिक मदतीपासून वंचित राहावे लागत आहे.

आर्थिक वर्ष संपल्याने निधीअभावी परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. या कुटुंबांनी कमावता सदस्य गमावल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने तांत्रिक त्रुटी दूर करून प्रलंबित लाभार्थ्यांना निधी वितरित करावा, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. दरम्यान, या मागणीसाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भूम, परंडा, वाशी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष मोईज सय्यद शेखापुरकर यांनी दिला आहे.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विलास शाळू, एन.एस.यू.आय.चे जिल्हाध्यक्ष ॲड. मुशरफ सय्यद, सोपान वरवडे, ॲड. सोहेल शेख, उमेश ढगे, रमेश पवार, अमोल वाघमारे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी...!

## केंद्राच्या निर्णयाने लाभार्थ्यांना दिलासा; पण अंमलबजावणीत अडथळे

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ एप्रिल -**

लाखो गरजू कुटुंबांच्या अन्नसुरक्षेशी थेट संबंधित असलेल्या धान्य वितरणाबाबत केंद्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एप्रिल, मे आणि जून २०२६ या तीन महिन्यांचे धान्य आगाऊ उचलून एकत्रित वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना तात्पुरता दिलासा मिळणार असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी समोर येत असल्याचे चित्र आहे.

रास्तभाव दुकानांमध्ये धान्याचा पुरेसा साठा नसल्यामुळे अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना वेळेवर धान्य मिळण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने प्रथम एप्रिल महिन्याचे धान्य वाटप करण्यावर भर द्यावा, त्यानंतरच मे व जून महिन्याचे धान्य वितरित करावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, कार्डधारकांना एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे गहू व तांदूळ एकाचवेळी देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानावर जाण्याची गरज भासणार नाही. मात्र, सध्या पॉस मशीनवर तीन महिन्यांचा डेटा उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांना सध्या एप्रिल महिन्याचेच धान्य घ्यावे 




लागत आहे.

केंद्र सरकारकडून प्रति व्यक्ती दरमहा ५ किलो गहू व तांदूळ मोफत दिले जातात. पॉस मशीनद्वारे अंगठा पडताळणी करून धान्य वाटप केले जाते.

आगामी गहू खरेदी हंगाम लक्षात घेऊन केंद्राने राज्यांना तीन महिन्यांचे धान्य आगाऊ उचलण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून गोदामांमध्ये नवीन धान्य साठवण्यासाठी जागा उपलब्ध होईल.

या विशेष निर्णयामुळे ग्रामीण व शहरी गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेशन कार्डधारकांमध्ये या निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले जात असले, तरी वितरण व्यवस्थेतील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महिला विधेयकावरून ठराव; काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महिला विधेयकाला विरोध केल्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस व त्यांच्या सहयोगी पक्षांच्या भूमिकेचा निषेध व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात आला.

दि.२१ एप्रिल रोजी पार पडलेल्या नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा ठराव मांडण्यात आला. सभेच्या शेवटी भाजपाचे गटनेते दत्तात्रय दासकर यांनी लोकसभेत मांडण्यात आलेल्या महिला विधेयकास काँग्रेसने विरोध केल्याचा मुद्दा उपस्थित करत निषेधाचा ठराव सभागृहात मांडला. यावेळी त्यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण, प्रगती आणि स्वावलंबनासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने लोकसभेत महिला विधेयक मांडण्यात आले होते.

मात्र, काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांच्या विरोधामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या महिलांविरोधी भूमिकेचा निषेध करण्याचा ठराव सभागृहात सादर करण्यात आला. दरम्यान, हा ठराव भाजप व शिवसेनेच्या सदस्यांच्या पाठिंब्याने मंजूर करण्यात आला.

सभेस नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपाध्यक्ष नय्यर जहागिरदार, सभापती तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, सुमन ठाकूर, तसेच रीजवान काझी, निरंजन राठोड, प्रविण गायकवाड, नगरसेविका राणी सुरवसे, छमा राठोड, मिनाक्षीताई काळे, साक्षी नळदुर्गकर आदी उपस्थित होते.

## नळदुर्ग बसस्थानकातील 'हिरकणी कक्ष' वापराविना

### महामंडळाची योजना फसल्याची चर्चा...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

नळदुर्ग बसस्थानकात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने उभारलेला 'हिरकणी कक्ष' गेल्या पाच वर्षांपासून अक्षरशः धुळखात पडलेला असून त्याचा वापरच झालेला नसल्याचे समोर आले आहे. ज्या उद्देशाने हा कक्ष उभारण्यात आला, तोच उद्देश साध्य न झाल्याने ही योजना अपयशी ठरल्याची चर्चा रंगू लागली आहे.

महामंडळाने राज्यातील बसस्थानकांमध्ये मातांना आपल्या बालकांना स्तनपान करता यावे, यासाठी 'हिरकणी कक्ष' उभारण्याचा उपक्रम राबवला होता. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या कक्षांचा वापरच होत नसल्याने उभारणीवर झालेला खर्च वाया गेल्याचे चित्र आहे. नळदुर्ग 




बसस्थानकातही अशीच परिस्थिती दिसून येत आहे.

नळदुर्ग बसस्थानक हे राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे ठिकाण असून परिसरातील ५० ते ६० गावांसाठी हे मध्यवर्ती स्थानक आहे. राज्य तसेच परराज्यात जाणाऱ्या बसगाड्यांमुळे येथे नेहमीच प्रवाशांची मोठी वर्दळ असते. असे असतानाही येथे उभारलेल्या 'हिरकणी कक्षाचा' गेल्या पाच वर्षांत वापर झाला नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या योजनेत आवश्यकतेचा पुरेसा विचार न करता कक्ष उभारण्यात आल्याचा आरोप होत असून, केवळ ठेकेदारांना लाभ मिळवून देण्यासाठीच ही कामे करण्यात आली अशीही टीका होत आहे. त्यामुळे या योजनेवरील खर्च पाण्यात गेल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

नळदुर्गप्रमाणेच राज्यातील इतर अनेक बसस्थानकांमध्येही 'हिरकणी कक्ष' वापराविना पडून असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या योजनेचे पुनरावलोकन करून कक्षांचा योग्य उपयोग होण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# तुळजापूरातील रस्ते घेतायत मोकळा श्वास : अतिक्रमणाविरोधी शहरात मोठी कारवाई

**▶▶ अतिक्रमण मोहिमेमध्ये व्यापाऱ्यांचे नुकसान...! ▶▶ व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण... ▶▶ चार दिवस मोहिम सुरु राहणार...**





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

शहरात वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी नगरपरिषदेने दि.२३ एप्रिल रोजी मोठी अतिक्रमणविरोधी मोहीम राबवली. भवानी रोड, महाद्वार रोड, तुळजाभवानी मंदिर परिसर तसेच खडकाळ गल्ली येथे व्यापाऱ्यांनी रस्त्यावर केलेली अनधिकृत अतिक्रमणे व बांधकामे हटविण्यात आली.

या मोहिमेसाठी नगरपरिषद प्रशासनाने जेसीबी, ट्रॅक्टरसह मोठा फौजफाटा तैनात केला होता. नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण तसेच मंदिर प्रशासनाचे कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागातून सकाळपासून कारवाईला सुरुवात करण्यात आली.

पूर्वीच सात दिवसांची नोटीस देऊनही अनेक व्यापाऱ्यांनी अतिक्रमणे कायम ठेवली होती. त्यामुळे अचानक सुरू झालेल्या या मोहिमेमुळे व्यापाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला.

कारवाईदरम्यान काही व्यापाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनावर पक्षपातीपणाचा आरोप करत तोंड पाहून अतिक्रमण काढण्यात आले अशी प्रतिक्रिया दिली. नगराध्यक्ष स्वतः उपस्थित राहिल्यानेही काही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या मोहिमेत दुकानांसमोरील ओटे, पानसळ्या, बोर्ड व मांडणी यावर जेसीबी फिरवल्याने अनेक व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, अतिक्रमणे हटवल्यानंतर शहरातील रस्ते मोकळे झाल्याने वाहतुकीला दिलासा मिळाला असून रस्ते अधिक रुंद दिसू लागले आहेत.

ही मोहीम पुढील चार दिवस सुरू राहणार असल्याची माहिती मिळत असून व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.